


महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१४ ■ नाशिक, गुरुवार, दि. १ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## उद्या अंक नाही

**गांवकरी**

**महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त दैनिक गांवकरी कार्यालयास आज गुरुवार ( दि.१ मे ) रोजी सुट्टी असल्याने शुक्रवार ( दि. २ मे) चा अंक प्रसिद्ध होणार नाही, याची आमचे असंख्य ग्राहक, वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.**

**-संपादक**

# जातनिहाय जनगणना होणार

## केंद्रीय कॅबिनेटचा निर्णय; विरोधकांच्या टीकेला उत्तर

**मुंबई : देशात गेल्या काही वर्षांपासून होत असलेल्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीला केंद्रातील मोदी सरकारने हिरवा कंदील दर्शवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली.**

भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०२१ ला जनगणना होणे अपेक्षित होते, मात्र त्यावेळी कोरोना संसर्गामुळे जनगणना करण्यात आली नव्हती. आता यापुढे जी जनगणना होईल ती जातनिहाय जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना काँग्रेसवर देखील टीका केली. काँग्रेसने केवळ सर्वेक्षण करून घेतल्याचे म्हटले आहे. वैष्णव म्हणाले की, १९४७ नंतर जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. काँग्रेसने जातनिहाय जनगणनेऐवजी जातनिहाय सर्वेक्षण केले. जातनिहाय जनगणना मूळ जनगणनेत समाविष्ट झाली पाहिजे. जातनिहाय जनगणना काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या लाभापर्यंत मर्यादित ठेवत होती, असंही वैष्णव यांनी म्हटले आहे.

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय मानला जात आहे. तर, विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या टीकेलाही या निर्णयातून मोदी सरकारने उत्तर दिले आहे. मात्र, सरकार जातनिहाय जनगणना करू शकत नाही, असं प्रतिज्ञापत्र सरकारने सुप्रीम कोर्टात यापूर्वी सादर केले होते. आता केंद्रीय कॅबिनेटच्या बैठकीत हा निर्णय कसा झाला, बिहार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. त्यामुळेच १९४७ पासून देशात जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. जातजनगणना करण्याऐवजी जात सर्वेक्षण करण्यात आले. /-...४




### आरक्षणाची मर्यादा वाढवावी : सपकाळ

केंद्र सरकारने हा निर्णय घेतला असेल तर स्वागत आहे. हा निर्णय प्रचाराच्या पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. यासोबत आरक्षणाची मर्यादा वाढवण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. संघाने आगामी काळात त्यांचा सरसंघचालक ओबीसी समाजातील करावा, असे देखील सपकाळ म्हणाले. सर्वांचा समावेश व्यवस्थेत असावा, ही भूमिका आणि भावना असल्याचे ते म्हणाले.

# राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ अध्यक्षपदी जोशी

## पहलगाम हल्ल्यानंतर मोदींचा निर्णय

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्यासोबत मंडळात एकूण ७ सदस्य असतील. तिन्ही सैन्यांतील निवृत्त अधिकाऱ्यांना बोर्डात समाविष्ट करण्यात आले आहे.



सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत आणि मंडळाची कमान माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांच्याकडे सोपवली आहे. माजी वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल पीएम सिन्हा, माजी दक्षिणी आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल ए. के. सिंग आणि रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना हे लष्करी सेवेतील निवृत्त अधिकारी देखील या मंडळाचा भाग असतील. राजीव रंजन वर्मा आणि मनमोहन सिंग हे भारतीय पोलिस सेवेतून निवृत्त झाले आहेत. बी. व्यंकटेश वर्मा हे सात सदस्यांच्या मंडळावर निवृत्त परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

### पंतप्रधान मोदींचा बैठकांचा धडाका

पंतप्रधान यांनी त्यांच्या निवासस्थानी बोलावलेली सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची बैठक दुपारी संपली. सीसीएस बैठकीसोबत पंतप्रधानांच्या निवासस्थानी राजकीय व्यवहार मंत्रिमंडळ समिती व आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समिती या दोन समित्यांच्या बैठका बोलावण्यात आल्या.

## महत्त्वाचे ▶▶▶▶

### अमूल दूध २ रुपयांनी महागले

**नवी दिल्ली :** अमूलने दुधाच्या किमतींत वाढ करण्याची घोषणा केली आहे. देशभरात दुधाच्या किमतीत प्रतिलिटर २ रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे अमूलने सांगितले. नवीन दर आज सकाळपासून म्हणजेच १ मे पासून लागू होतील. खेडा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेडने जारी केलेल्या निवेदनात दुधाच्या दरात वाढ झाल्याची माहिती देण्यात आली. अमूल दुधाच्या नवीन किमती देशभरातील पॅकवर छापल्या जातील आणि त्या विक्री किंमती म्हणून विचारात घेतल्या जातील, असे निवेदनात म्हटले आहे.

### लाडक्या बहिणींना आज मिळणार पैसे

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या एप्रिल महिन्याच्या हप्त्याची रक्कम पात्र महिलांच्या खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाकडून अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर ही रक्कम वर्ग करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये तर, पीएम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान निधीचा लाभ घेणाऱ्या महिलांना ५०० रुपयांचा हप्ता दिला जात आहे.

### पुण्यात मेडिकल कॉलेजमध्ये रॅगिंग

**पुणे :** येथीले ससून रुग्णालयाशी संलग्न बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये दोन निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याची माहिती उजेडात आली आहे. मंत्रालय स्तरावर विद्यार्थ्यांच्या नातेवाइकांनी तक्रार केल्यानंतर चक्र फिरली आणि कॉलेज प्रशासनाने अँटी रॅगिंग समितीची बैठक आयोजित केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये तक्रारदार विद्यार्थ्यांकडून आणि ज्याच्या विरोधात तक्रार आहे या विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली आहे. या प्रकरणाचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणात दोषींवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### कुकडेच्या बँकेतून करोडोंचे व्यवहार

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचा माजी पदाधिकारी शंतनू कुकडे याच्या बँक खात्यात करोडो रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. कुकडे याच्या बँक खात्यातून पुणे शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांच्या नावावर गेल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे पोलिसांनी राष्ट्रवादी पक्षाचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांचा जबाब नोंदवला आहे. नेमके हे पैसे कशासाठी कुकडेने मानकर यांना दिले याची चौकशी सुरू आहे. कुकडे याच्यासह त्याच्या मित्रांना एका परदेशी महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. कुकडे याच्यावर याआधी लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शस्त्रसंधीचे उल्लंघन होताच भारतीय सैन्याचे चोख प्रत्त्युतर

## पाक रेंजर्सनी चौक्या सोडल्या, झेंडेही उतरवले

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला असून, पाकिस्तानी सैन्याकडून सीमारेषेवर कुरघोडी सुरू होती. याला भारतीय सैनिकांनी प्रतिउत्तर देताच पाकिस्तानी सैन्यालाही धडकी भरली असून, जम्मू-काश्मीरच्या बॉर्डरवर पाकिस्तानी सैन्यांनी गोळीबार थांबवला आहे.



पाकिस्तानकडून सातत्याने होणाऱ्या शस्त्रसंधीचं उल्लंघन किंवा सीमारेषेपलीकडून होणाऱ्या घुसखोरीवर भारतीय सैन्याकडून चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानी रेंजर्संना प्रत्त्युतर दिल्याने पाक सैन्य बिथरले आहे. सीमारेषेवरील काही पाकिस्तानी सैन्याने चौकी सोडून पळ काढला आहे. चौक्यांवरील पकिस्तानी झेंडेदेखील खाली उतरवण्यात आले आहेत. सीमारेषेवरील २० चेक पोस्टवर जोरदार चकमक झाली. पाकिस्तानकडून हा गोळीबार होत असून, भारतीय सैन्य दलही आत घुसून जशास तसे प्रत्त्युतर देत आहे. सीमारेषेवरील नौशेरा, सुंदरबनी, अखनूर, बारामूला आणि कुपवाड या सीमारेषेला लगत असलेल्या प्रदेशात ही चकमक सुरू आहे. भारताकडून कोणत्याही क्षणी एअर स्ट्राइक होऊ शकतो, या भीतीमुळे पाकिस्तानने इस्लामाबाद आणि लाहोरसाठी २ मेपर्यंत नोटम म्हणजे नो टू एअरमॅन जारी केले आहे. त्यानुसार, आता हे दोन्ही राज्य नो फ्लाय झोन करण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रदेशातून कुठलीही हवाई वाहतूक होणार नाही, कुठलेही विमान व हेलिकॉप्टर उड्डाण करणार नाही.

### जरांगे यांचा पुन्हा उपोषणाचा इशारा

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले असून, २९ ऑगस्टला मुंबईत धडक देऊन आमरण उपोषणाला सुरुवात करणार आहेत.

माध्यमांशी बोलताना जरांगे म्हणाले, आंदोलनाची पुढील टप्प्याची रूपरेषा काय असेल ती आज सांगत नाही. समाजाला माहिती आहे, मी जे पाऊल उचलेल ते तुमच्या हिताचे उचलतो. २८ ऑगस्टला मी उपोषण करणार. तुम्ही सगळ्यांनी फक्त मला सोडायला आले तरी बास. दोन वर्षे झाले आम्ही संयमाने घेत आहोत. मागील उपोषण सोडताना चार मागण्या तत्काळ अंमलबजावणी केली जाईल, असे सांगितले होते. आज तीन महिने पूर्ण झाले, कुठल्याही मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही. संयम तरी किती दिवस धरायचा. मुंबईत गेल्याशिवाय पर्याय निघत नाही हे आमच्या लक्षात आले आहे. मुंबईत आमरण /-...४

# कोलकाता येथे हॉटेलला लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू

## जीव वाचवण्यासाठी छतावरून मारल्या उड्या

**नवी दिल्ली :** मंगळवारी रात्री कोलकात्यातील फलपट्टी मच्छुआ भागातील हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला तर २२ जणांना वाचवण्यात यश आले आहे. काही लोक अजूनही आत अडकल्याची भीती व्यक्त होत असून, १४ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.


मंगळवारी रात्री सव्वाआठ वाजता ऋतुराज हॉटेलमध्ये ही आग लागली. माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिस पथके घटनास्थळी पोहोचली आणि बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत अपघाताच्या चौकशीसाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे. हॉटेलच्या चौथ्या मजल्यावर बसवलेल्या वीज मीटरमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग



लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. अनेक लोक जीव वाचवण्यासाठी हॉटेलच्या छतावरून आणि खिडक्यांमधून उड्या मारताना दिसले. केंद्रीय मंत्री आणि बंगाल भाजप अध्यक्ष सुकांत मजुमदार यांनी अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. ते म्हणाले की, मी राज्य प्रशासनाला बाधित लोकांना तत्काळ वाचवण्याची आणि त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची विनंती करतो. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अग्निसुरक्षेचे कडक नियम बनवावेत.

# देवेन भारती मुंबईचे नवे पोलीस आयुक्त

**मुंबई :** भारतीय पोलीस सेवेतील वरिष्ठ अधिकारी देवेन भारती यांच्याकडे मुंबई पोलिस आयुक्त पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. विवेक फणसळकर पोलिस आयुक्तपदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.



सन १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले देवेन भारती हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय समजले जातात. वर्ष २०१४ ते २०१९ पर्यंत देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री असताना देवेन भारती हे पोलीस सहआयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) होते. भारती मूळचे बिहारमधील दरभंगा येथील आहेत. त्यांनी झारखंडमधून मॅट्रिक केले आणि दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवी प्राप्त केली. त्यांनी मुंबईत डीसीपी, झोन ९ आणि डीसीपी गुन्हे शाखा म्हणून काम केले. अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा आणि त्यानंतर सहपोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) पदावर ते होते. ते राज्यातील पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) आणि महाराष्ट्र एटीएसचे प्रमुखदेखील होते. महाविकास आघाडी सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर त्यांची राज्य सुरक्षा महामंडळात अतिरिक्त महासंचालक म्हणून बदली करण्यात आली होती.

# अंबेजोगाई येथील युवकाचा रामकुंड परिसरात बुडून मृत्यू

**पंचवटी : वार्ताहर**



बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील युवक आपल्या कुटुंबासहित नाशिकमध्ये देवदर्शनासाठी आला असता, रामकुंडाजवळील छोट्या पुलाजवळून पाण्यात दिवे सोडण्यासाठी उतरत असताना पाय घसरल्याने बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला. बालाजी रामभाऊ मुळे (वय २७) असे या युवकाचे नाव आहे.

मंगळवारी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. त्यानंतर त्याचा शोध घेतला असता बुधवारी (दि. ३०) दुपारी दीड वाजता त्याचा मृतदेह अग्निशमन दलाला लक्ष्मीनारायण घाटाजवळील केवडीबनसमोरील नदीपात्रात आढळून आला. बालाजी मुळे हा त्याच्या कुटुंबासोबत नाशिकला देवदर्शनासाठी आला होता. रामकुंडाजवळील छोट्या पुलाच्या खालून वाहणाऱ्या वेगवान प्रवाहाच्या भागातील पात्रात तो दिवे सोडण्यास उतरत असताना त्याचा पाय घसरला आणि प्रवाहात तो वाहून गेला. रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध घेतला. पाणवेली मोठ्या प्रमाणात वाहून आल्याने त्यात तो अडकला तर नसेल ना, याचा शोध घेत पात्रातील साठलेल्या पाणवेली जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आल्या. मात्र, त्याचा शोध लागला नाही. बालाजी मुळे हा त्र्यंबकेश्वर, वणी येथून दर्शन घेऊन रामकुंडावर आला होता. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी व एक मुलगा आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस अखेर वर्षा बंगल्यावर

## अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधत पूजा करून सपत्नीक गृहप्रवेश

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. महायुती सरकारमधील एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, पण ते वर्षा बंगल्यावरच राहत होते. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे सागर बंगल्यावरच राहत होते. त्यातच मुख्यमंत्री वर्षा बंगल्यावर राहायला कधी जाणार, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला होता. आता अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधत त्यांनी वर्षा बंगल्यावर गृहप्रवेश केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ट्विटर अकाउंटवरून वर्षा बंगल्यावरील गृहप्रवेशाचे फोटो शेअर केले आहेत. आजच्या शुभमुहूर्तावर वर्षा या निवासस्थानी आम्ही छोटीशी पूजा करीत गृहप्रवेश केला. आजच्या दिवशीची आणखी एक अत्यंत आनंदाची बातमी, आमची सुकन्या दिविजा ही १० वीच्या बोर्ड परीक्षेत ९२.६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे, अशी माहिती अमृता फडणवीसांनी दिली. माझ्या मुलीची १० वीची परीक्षा असल्याने वर्षा



बंगल्यावर राहायला गेलो नाही. माझी परीक्षा झाल्यानंतर आपण वर्षा बंगल्यावर राहायला जाऊया, असे दिविजा हिने तिचे वडील देवेंद्र फडणवीस यांना म्हटले होते. त्यामुळे लेकीच्या परीक्षेचा विचार करूनच मुख्यमंत्र्यांनी वर्षा बंगल्यावर लगेचच जाणे टाळले होते. यासंदर्भात एका मुलाखतीत त्यांनी माहितीदेखील दिली होती.

एकनाथ शिंदेंनी वर्षा बंगला सोडल्यानंतर मला तिथं जायचं आहे, तिथं बंगल्यावर काही छोटी-मोठी कामेही होणार आहेत. माझी मुलगी १० वीमध्ये शिकत आहे, ती म्हणाली की, माझी परीक्षा /-...४


## जाहीर निवेदन /घोषणा

**उत्पादन खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे दि. ०१/०५/२०२५ पासून आमच्या विडीचे दर खालीलप्रमाणे करण्यात आले आहेत. तरी ग्राहक बंधुंनी त्याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे. सदर दर G.S.T करासहित आहेत.**

| | |
|---|---|
| साबळे 24000 विडी बॉक्स | ₹ 21,744=00 |
| साबळे किरकोळ 1000 विडी | ₹ 936=00 |
| साबळे 25 विडी बंडल | ₹ 26=00 |
| राजकमल 18000 विडी बॉक्स | ₹ 15,678=00 |
| राजकमल किरकोळ 1000 विडी | ₹ 900=00 |
| राजकमल 25 विडी बंडल | ₹ 25=00 |
| मोहिनी 18000 विडी बॉक्स | ₹ 14,418=00 |
| मोहिनी किरकोळ 1000 विडी | ₹ 828=00 |
| मोहिनी 25 विडी बंडल | ₹ 23=00 |

**नकली मालापासून सावधान**

नकली (ड्युप्लिकेट) बिडी दुकानात ठेऊन त्या मालाची विक्री करणे हा फार मोठा कायदेशीर गुन्हा आहे. या गुन्ह्यासाठी सेक्शन 101, 102, 103, आणि 104 ट्रेड मार्केट ॲक्ट 1999 आणि अंडर सेक्शन ६३ आणि ५५ कार्पोराईट ॲक्ट आणि सेक्शन इंडियन पिनल कोड कलम ४२० व ३४ तसेच ट्रेड ॲण्ड मर्कटाईल ॲक्ट १९५८ चे कलम/७८ अन्वये बनावट बिडी तयार करणे किंवा त्याची विक्री करणे हा शिक्षा पात्र गुन्हा आहे. या गुन्ह्याखाली सहा महिने ते तीन वर्षे कैद व रू. ५०,०००/- ते २,००,०००/- (रूपये पन्नास हजार ते रूपये दोन लाख) दंड होतो.

**साबळे वाघीरे आणि कं. प्रा. लि.**

व्यवस्थापन कार्यालय :- साबळे हाउस, ४०८/४-५, गुलटेकडी, पुणे ३७.
सेल डेपो:- पुणे, मुंबई, पनवेल, नाशिक, अहमदनगर, जालना, सोलापूर, कराड
फोन : ०२०-२४२७३७९४/९५/९६
मुख्य कार्यालय : १०५ भवानी पेठ, पुणे.

नकली माल विकणाऱ्यांची माहिती देणाऱ्यास योग्य इनाम दिले जाईल

महत्त्वाचे



### सकल हिंदू समाजातर्फे देवळ्यात कडकडीत बंद, मूक मोर्चा

**देवळा :** पहलगाम येथील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ येथे सकल हिंदू समाजातर्फे बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बंदमध्ये अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच व्यवहार ठप्प झाले होते. देवळा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र जमा झाले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ शोकसभा घेण्यात आली. त्यानंतर सकाळी ११ वाजता शहरातून निषेध मोर्चा काढण्यात आला. निषेध मोर्चात सकल हिंदू समाज, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह काही मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. यावेळी देवळा पोलिसांना निवेदन देण्यात आले.




### केजीएन ग्रुपतर्फे हल्ल्याचा निषेध

**निफाड :** पहलगाम हल्ल्याचा उगावच्या मुस्लिम बांधवांनी हाताला काळी पट्टी बांधून निषेध केला. नमाजनंतर एकत्रित येऊन पाकिस्तानचा व दहशतवादी मुर्दाबादच्या घोषणा दिल्या. याप्रसंगी हाजी शरीफ शेख, हाजी रशीद शेख, कासम शेख, युनूस तांबोळी, दस्तगीर पिंजारी, अश्फाक तांबोळी, अब्दुल शेख, अमजद शेख, जहांगीर शेख, अमन तांबोळी, सुभान तांबोळी, अर्शद तांबोळी, सत्तार शेख, बिलाल सय्यद, सांडू तांबोळी, इतर सदस्य मुस्लिम बांधव उपस्थित होते. तरुणांनी निषेध करण्यासाठी लक्षणीय उपस्थिती दर्शवली. परत असे हल्ले सहन केले जाणार नाही व भारत सरकारला आमचा पूर्ण पाठिंबा आहे, असे यावेळी सांगितले.



### कुंडाणे-शेरी-सलायबन ते विखारा पहाड रस्ता दुरुस्त करावा

#### महंत गणेशनाथ महाराज यांची मागणी

**सोग्रस :** चांदवड तालुक्यातील कुंडाणे-शेरी-सलायबन ते विखारा पहाड येथील श्री गुरू गोरक्षनाथ महाराज मंदिरापर्यंतचा रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे विखारा पहाड येथील श्री गुरुगोरक्षनाथ मंदिराचे महंत योगी गणेशनाथ महाराज यांनी निवेदनाद्वारे केली आहे. विखारा पहाड येथील श्री गुरू गोरक्षनाथ महाराज मंदिराच्या परिसरात चांदवड-देवळा विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या आमदार निधीतील विकासकामांच्या माध्यमातून भाविकांसाठी सभागृह, सभामंडप, पेव्हर ब्लॉक बसविणे, विजेची सुविधा, भक्तनिवास, संत निवास, इत्यादी लाखो रुपयांची कामे झाली आहेत. विखारा पहाड येथील गुरू गोरक्षनाथ महाराज मंदिरातील या विविध कामांमुळे येथे भाविकांसाठी अतिशय चांगली सुविधा निर्माण झाली आहे. विखारा पहाड येथील मंदिरापासून ते पायथ्यापर्यंतचा रस्ता हा जोरदार पावसामुळे अक्षरशः वाहून गेला आहे. रस्त्यावर दगडगोटे व ओहळ, नाले पडलेले आहेत. आमदार डॉ. राहुल आहेर यांनी त्यांचे आमदार निधीच्या विकासकामांच्या माध्यमातून कुंडाणे-शेरी-सलायबन ते विखारा पहाड येथील श्री गुरू गोरक्षनाथ मंदिरापर्यंतचा रस्ता हा दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी विखारा पहाड येथील श्री गुरू गोरक्षनाथ मंदिराचे महंत योगी गणेशनाथ महाराज व त्यांचे भक्त मंडळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.




### उमराणे येथे गौरव रथ यात्रेचे जल्लोषात स्वागत

**देवळा :** राष्ट्रवादी गौरव रथ कलश यात्रेचे देवळा तालुक्यातील उमराणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांतिक सदस्य व देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती योगेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. धोडप किल्ल्यावरून आणलेली माती मंगल कलश यात्रेत सहभागी झालेले अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ, आमदार दिलीप बनकर, आमदार पंकज भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार यांच्या उपस्थितीत प्रांतिक सदस्य योगेश आहेर, यशवंत सिरसाठ, जगदीश पवार व तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दान करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांतिक सदस्य व देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, जिल्हा उपाध्यक्ष जगदीश पवार, तालुकाध्यक्ष यशवंत सिरसाठ, युवक तालुकाध्यक्ष तेजस अहिरे, देवळा नगरपंचायतीचे गटनेते संतोष शिंदे, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब मगर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष अतुल आहेर, देवळा शेतकी संघाचे माजी चेअरमन कैलास देवरे, संचालक नानासाहेब देवरे, नाना अहिरराव, बाजार समितीचे संचालक भाऊराव नवले, भाऊसाहेब वाघ आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिरचीचे आगार म्हणून ‘खानगाव’ येतेय नावारूपास

## पाच वर्षांत ७७ कोटी सात लाख ७५ हजार रुपयांची उलाढाल

**लासलगाव : समीर पठाण**

**लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची आशिया खंडातील कांद्याची नामांकित बाजारपेठ ही ओळख स्थापना होऊन ७८ वर्षे पूर्ण झाले तरी कायम आहे. कांद्याबरोबरच द्राक्ष आणि आता मिरचीचे आगार म्हणून येथून सात किलोमीटरवरील बाजार समितीचे खानगाव नजीक तात्पुरते खरेदी केंद्र नावारूपास येत आहे.**

गेल्या पाच वर्षांत या खरेदी केंद्रावर ८ लाख ७४ हजार ४६२.०६ क्विंटल मिरची व द्राक्षमणी, भाजीपाला आवक होऊन १६७ कोटी ३८ लाख १४ हजार ५८९ इतक्या रुपयांची उलाढाल झाली. त्यात मिरचीची दोन लाख ९१ हजार ६०२ क्विंटल आवक होऊन ७७ कोटी सात लाख ७५ हजार रुपयांची उलाढाल झाली आहे. लासलगाव बाजार समितीने खानगाव नजीक येथे २००२ मध्ये तात्पुरते खरेदी केंद्र सुरू केले. सुरुवातीला १२ वर्षे येथे केवळ द्राक्षमणी लिलाव होत. २०१४ मध्ये निफाड तालुक्यातील उत्तरपूर्व भागात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे द्राक्षबागांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी द्राक्षांऐवजी मिरची पिकाकडे वळले. मिरची लागवडीची सुरुवात सारोळे खुर्द या गावातून झाली. ती इतक्या झपाट्याने वाढत गेली आणि काही वर्षांत खानगाव नजीक येथे मिरची





केंद्र उभारणीसाठी परिसरातील मिरची उत्पादकांनी मागणी केली. त्यास लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने प्रतिसाद दिल्याने मुंबई, पुणे, संभाजीनगर, नाशिक, नंदुरबार, महाराष्ट्रातील मोठे मिरचीचे व्यापार केंद्राप्रमाणे मिरची विक्रीचे हब निर्माण होत आहे.

लासलगाव बाजार समितीचे खानगावनजीक खरेदी केंद्र येथे लिलाव झाल्यानंतर ठसकेबाज लवंगी मिरची, साधी मिरची आणि उपाहारगृहात अत्यावश्यक झालेली ढोबळी मिरची, शेडनेटमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये जाणारी लाल, पिवळी, हिरवी, ढोबळी मिरची असे मिरचीचे बहुविध प्रकार आता लासलगाव मार्गे लंडन, ओमान, कतार, दुबई, जर्मनीसह संपूर्ण जगात पोहोचत आहे. सन २०२० पासून या खरेदी केंद्रावर भाजीपाला लिलावाला सुरुवात होऊन आता प्रामुख्याने हिरवी मिरची विक्रीचे हब झाल्याने भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. निफाड व चांदवड तालुक्यातून तसेच नांदगाव, येवला, वैजापूर या तालुक्यातून हिरवी मिरचीची मोठ्या प्रमाणात आवक होत असते. त्यात प्रामुख्याने हिरवी मिरची, सिमला मिरची, बलराम, ज्वाला, ज्वेलरी, सितारा हे मिरचीचे वाण विक्रीसाठी येत असतात.

> खानगावनजीक खरेदी केंद्र सुरू झाल्यापासून द्राक्षमण्यांबरोबरच मिरची पिकाला चांगला भाव मिळत असल्याने परिसरात मिरची उत्पादकांचा मिरची उत्पादन घेण्याकडे कल वाढला आहे. यामुळे दरवर्षी आवकदेखील वाढत आहे. उत्पादक, व्यापारी, कामगार घटकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा लासलगाव बाजार समितीचा प्रयत्न असून, खानगावनजीक खरेदी केंद्रासाठी साडेतीन हेक्टर जागा संपादित करण्याचा बाजार समिती संचालक मंडळाचा शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे.
>
> **– डी. के. जगताप** (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव)

# बिबट्याच्या बंदोबस्तासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढवा

## माजी आमदार धनराज महाले यांची मागणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात वनारवाडी



शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात २१ वर्षीय तरुणीचा बळी गेल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे वनविभागाने याबाबत कठोर पाऊले उचलून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी माजी आमदार धनराज महाले यांनी केली आहे.

धनराज महाले यांनी चव्हाण वस्तीवर जाऊन कुटुंबीय, नातेवाइकांची भेट घेत सांत्वन केले. त्यांनी सांगितले की, तालुक्यात अनेक ठिकाणी वाड्यावर राहणाऱ्या कुटुंबांना महावितरण कंपनीकडून सिंगल फेज विजेची सोय नसल्यामुळे अंधाराचा सामना करावा लागत आहे. हे कुटुंब रात्रीच्या वेळी पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी घराबाहेर पडू शकत नाही. ज्या-ज्या ठिकाणी बिबट्याचे वास्तव्य आहे, अशा ठिकाणची लहान मुले शाळेत जाण्यातसुद्धा घाबरतात. अनेक ठिकाणी शाळकरी मुलांवर बिबट्याने हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पालकांसह विद्यार्थ्यांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या बंदोबस्तासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढवून ज्या ठिकाणी जास्त बिबट्याचे वास्तव्य आहे त्या ठिकाणी पिंजरे बसून त्यामध्ये भक्ष्य ठेवावे, जेणेकरून बिबटे जेरबंद होऊन बिबट्याचे वाढते हल्ले कमी होतील. वनविभागाने यावर त्वरित कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी माजी आमदार धनराज महाले यांनी केली आहे.

# शिवछत्रपती परिवारातर्फे भास्करगडावर स्वच्छता मोहीम

## भरउन्हात सत्तर मावळे, रणरागिणींकडून गड संवर्धन

**भरवस फाटा : वार्ताहर**

राजा शिवछत्रपती परिवार, नाशिक, पुणे, नांदेड व परभणी तसेच पुरातत्त्व व वनविभाग नाशिक अंतर्गत आयोजित किल्ले भास्करगड (ता. त्र्यंबकेश्वर) येथे विभागीय संयुक्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेत पूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ७० मावळे, रणरागिणी व बालमावळे सहभागी झाले होते.

प्रथमतः शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. या परिवाराचे संस्थापक सुनील सूर्यवंशी यांची ही ९ वर्षांपूर्वीची संकल्पना होती की, गडकिल्ले महाराष्ट्राची अस्मिता अन् ते वाचले पाहिजे, त्यांचे सवर्धन झाले पाहिजे. आज राजा शिवछत्रपती परिवार हा महाराष्ट्रात २८ जिल्ह्यांत गडकिल्ल्यांची साफसफाई करत असतो. नाशिक विभागाने त्यासाठी त्र्यंबकेश्वरजवळील अतिशय दुर्गम भास्कर गडकिल्ल्याची निवड करून पूर्ण वर्षात प्रत्येक महिन्याच्या एक रविवार निवडून तिथे श्रमदान व




स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला होता. त्याच अनुषंगाने रविवारी ही मोहीम घेण्यात आली व दिवसभर तेथे स्वच्छता केली. या मोहिमेत भरउन्हात किल्ल्यावर असलेल्या पाण्याच्या टाक्यातील दगड-माती बाहेर काढली व त्यांना नवसंजीवनी दिली. तसेच सर्पकार आकाराच्या कातळत कोरलेल्या पायऱ्या पूर्ण बुजलेल्या होत्या. त्यातील दगड-माती बाजूला करून पायरी मार्ग मोकळा केला. तसेच तेथील पाण्याची छोटी-मोठी तलावाची साफसफाई केली. खाली उतरतेवेळी प्लास्टिक कचरा जमा केला.

पुणे विभागाचे प्रमुख गोपीचंद खळदकर यांनी यावेळी आवाहन केल की, गडकिल्ले हे आपला वारसा आहे. ते जपणे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी गडकोटांवर फिरायला जाताना तेथील ऐतिहासिक वास्तूची जपणूक करा, तसेच सोबत घेतलेले पाणी बाटली, कुरकुरे व इतर प्लास्टिकच्या पिशव्या गडकोटावर न टाकता कचराकुंडीमध्ये टाका किंवा सोबत परत घेऊन यावे. नाशिक परिवाराचे विभागप्रमुख विकास भोसले यांनी गडकिल्ले संवर्धन करणे तसेच तेथे स्वच्छता राखणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, प्रत्येकाने महिन्यातील एक दिवस गडकिल्ले संवर्धन व स्वच्छता करण्यासाठी द्यावा, असे आवाहन केले.

# साडेसतरा गुंठे जमीन प्रामाणिकपणे परत

## सोमठाणे येथील धोक्रट कुटुंबाचा समाजापुढे आदर्श

**निफाड : प्रतिनिधी**

जमीन मोजणीमध्ये साडेसतरा गुंठे क्षेत्र जादा आल्याने ते लगतच्या शेतकऱ्यास प्रामाणिकपणे परत करण्यात आल्याची घटना सोमठाणे येथे घडली आहे.

सिन्नर तालुक्यातील सोमठाणे येथील गोदावरी उजव्या कालव्यालगत मधुकर सूर्यभान धोक्रट यांची साडेदहा एकर जमीन आहे. त्या जमिनीलगत २८३ व व २८४ हे छोटे भूमापन गट असून, सोमठाणे येथील रामेश्वर सोपान कोकाटे व ज्योती रामेश्वर कोकाटे या पती-पत्नीच्या नावावर साडेसहा एकर जमीन आहे. धोक्रट कुटुंब त्यांच्या व्यवसायामुळे पूर्वी अनेक वर्षे ही शेती करत नव्हते. त्यामुळे ही सर्व शेती १५ ते २० वर्षे पडीक होती. जमिनीची वहिवाट नसल्यामुळे सर्व गटातील बांध वेडेवाकडे झाले होते. त्यामुळे त्या क्षेत्रातील निशाणी दिशा, बांध, वाटा या काही समजत नव्हत्या. त्यामुळे याची खात्री करण्यासाठी या जमिनीची रामेश्वर कोकाटे यांनी भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून घेतली. त्यावेळी मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार साडेसतरा गुंठे क्षेत्र हे धोक्रट यांच्याकडे निघाले असल्याचे सांगितले. त्यामुळे सोमठाणे येथील मेडिकल व्यावसायिक मधुकर सूर्यभान धोक्रट यांनी सदरची जमीन मोजणीबाबत कुठल्याही प्रकारे अपील न करता मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार रामेश्वर सोपान कोकाटे यांना साडेसतरा गुंठे जमीन क्षेत्र बांध टाकून काढून दिली आहे. धोक्रट कुटुंबीयांची सदर गटात वडिलोपार्जित शेती आहे व आजच्या परिस्थितीत सोमठाणे येथे २५ ते ३० लाख रुपये एकर जमिनीचा भाव आहे. परंतु समाजामध्ये एक वेगळा आदर्श निर्माण व्हावा हे विचार मनात ठेवून सदरच्या गटात अतिरिक्त निघालेली साडेसतरा गुंठे जमीन रामेश्वर कोकाटे यांना कुठलाही वादविवाद न करता मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार रामेश्वर कोकाटे यांना परत दिल्याचा आदर्श धोक्रट कुटुंबीयांनी समाजापुढे उभा केला आहे.

> कुणाच्याही खोट्या मालमत्तेचा मालक होणे आपल्या कुटुंबाला आवडणार नाही. म्हणूनच वडिलांनी साडेसतरा गुंठे जमीन रामेश्वर कोकाटे यांना परत करून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. समाजाने आपसात वाद न करता सामंजस्याने व तडजोडीने वागल्यास आपापसातील वाद कमी होण्यास मदत होणार आहे.
>
> **– डॉ. रोहित मधुकर धोक्रट**



# गुंजाळनगरच्या उपसरपंचपदी शीतल गुंजाळ बिनविरोध

**देवळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील गुंजाळनगर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका शीतल योगेश गुंजाळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामपंचायतीचे उपसरपंच विनोद आहेर यांनी राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर उपसरपंचपदाच्या निवडीसाठी सरपंच शरद गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक घेण्यात आली, यावेळी निर्धारित वेळेत उपसरपंचपदासाठी शीतल गुंजाळ यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड झाल्याची घोषणा ग्रामविकास अधिकारी राजेंद्र ठाकरे यांनी केली. शीतल गुंजाळ यांची उपसरपंचपदी निवड होताच समर्थकांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करत एकच जल्लोष केला. यावेळी ग्रामपंचायत सदस्या स्वाती गुंजाळ, जिजाबाई गांगुर्डे, आशाबाई जाधव, कमळाबाई माळी, सदस्य सुनील पगारे, शंकर वाघ, पोलिसपाटील योगेश गुंजाळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. नवनियुक्त उपसरपंच शीतल गुंजाळ यांचे आमदार डॉ. राहुल आहेर, नाफेडचे संचालक केदा आहेर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, मविप्रचे संचालक विजय पगार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाऊसाहेब पगार, शेतकी संघाचे व्हा. चेअरमन रवींद्र जाधव, वाजगावचे माजी उपसरपंच दीपक देवरे, कनकापूरचे उपसरपंच जगदीश शिंदे आदींनी अभिनंदन केले.

# शिष्यवृत्तीत एन.व्ही.पी. इंग्लिश मीडियमचे १८ विद्यार्थी पात्र

**लासलगाव : वार्ताहर**

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यावर्षी नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या विद्यार्थ्यांनी आपली यशाची परंपरा कायम राखली.

या परीक्षेत इयत्ता आठवीतील स्वरा किशोर बूब, सई किरण बोराडे, रितिका राजेंद्र थोरात, क्षमा जितेंद्र ओस्तवाल, अनुजा संतोष गुजर व अमृता राजेश सुरसे, इयत्ता ५ वीतील किमया रामनाथ भडांगे, अनुष्का अनिल कोटकर, स्वरा अमरीश वडनेरे, प्रांजल नितीन चौधरी, आराध्य दीपक माहेवार, राम योगेश देवढे, पूर्वेश मनोज कुऱ्हे, पार्थ गणेश वाकचौरे, रितेश ताराचंद लिलानी, फैज मेहबूब काद्री, राघव विपुल वर्मा व समर्थ समाधान कापसे आदी विद्यार्थी पात्र ठरले असल्याची माहिती शाळेच्या प्राचार्या शीतल आचार्य यांनी दिली.

यशस्वी विद्यार्थ्यांना उपप्राचार्य मीनल होळकर, विभागप्रमुख नीता जेजुरकर, तुकाराम केदारे, मंजू वाधवा, विषय शिक्षक आशा जाधव, अर्चना कुलकर्णी, निर्मला मोरे, प्रियदर्शनी गायकवाड, वैशाली कासव, अश्विनी खांगाळ, शीतल शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले.

# सहकारी, नागरी पतसंस्थांमध्ये सिबिल स्कोअरची सक्ती ?

## सहकार विभागाकडून चाचपणी ; अनियमित कर्जवाटपाला बसणार आळा

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

राष्ट्रीयीकृत व मोठ्या सहकारी बँकांप्रमाणे सहकारी पतसंस्था, नागरी बँका, क्रेडिट सोसायट्यांना कर्जवाटप करताना सिबिल रिपोर्टची सक्ती करण्याच्या हालचाली सहकार विभागात सुरू आहेत.

अनियमित कर्जवाटपाच्या स्पर्धेमुळे व सहकारी पतसंस्थांमध्ये येईल त्याला कर्ज दिले जात असल्याने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे या संस्था अडचणीत येतात आणि मग ठेवीदारांची ससेहोलपट होते. परिणामी, नाशिक जिल्ह्यातीलही अनेक सहकारी पतसंस्था शेवटच्या घटका मोजत आहे तर अनेक संस्थांचे अस्तित्व तळागाळात गेले आहे. त्यामुळे ठेवीदारांची मोठी रक्कम अडकून पडल्याची उदाहरणे आहे. यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांप्रमाणे येथेही सिबिल रिपोर्टची सक्ती करण्याबाबत विचार सुरू आहे.

सुरुवातीच्या काळात अनेक बँकांनी त्याकडे दुर्लक्ष केले, पण थकबाकीचा टक्का वाढल्यानंतर २०१५ पासून सर्वच राष्ट्रीयीकृत बँका सिबिल रिपोर्टचे पालन करीत आहेत. अनेक नागरी बँका, पतसंस्था, क्रेडिट सोसायटीमध्ये सिबिल रिपोर्ट बंधनकारक नसल्याने येईल त्याला कर्ज दिले जाते. त्यातून सभासदाकडे थकबाकी वाढीस लागत आहेत आणि ठेवीदार अडचणीत येतो. यासाठी पतसंस्था, क्रेडिट सोसायट्यांना सिबिल रिपोर्टची सक्ती करण्याबाबत सहकार विभागात गांभीर्याने चर्चा सुरू झाली आहे. सिबिल स्कोअर ३०० ते ९०० अंकांपर्यंत असतो. यादरम्यान असलेला आकडा तुम्ही कर्ज घेण्यास योग्य व्यक्ती आहात की नाही हे ठरते. किमान ७०० च्या वर आपला सिबिल रिपोर्ट असणे गरजेचे आहे. यापूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी केली, यावर आपला सिबिल रिपोर्ट ठरतो. सिबिल रिपोर्टसाठी कोणत्याही कर्जाचा हप्ता वेळेवर भरावा लागतो. मुदतीत कर्ज भरले तरी तुमच्या सिबिलवर परिणाम होतो, पण हा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. क्रेडिट कार्ड मर्यादा ३० टक्क्यांपेक्षा कमी रक्कम वापरावी, अन्यथा सिबिल स्कोअरवर परिणाम होतो. क्रेडिट कार्ड बंद केल्यानंतर तुमचा क्रेडिट वापर गुणोत्तर वाढतो, सिबिल स्कोअर कमी होतो.

> सामान्य सभासद, खातेदार यांना सहजगत्या कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या नागरी व सहकारी पतसंस्था आहे. येथे संचालक मंडळ व व्यवस्थापक समितीला वाटल्यास कर्ज वितरण केले जाते. येथे सिबिल स्कोअर चेक केला जात नाही व तसा रिपोर्ट घेतला जात नाही. त्यामुळेच ज्याची कुठेच पत नाही अशा सभासदांनासुद्धा कर्ज वितरण केले जाते. एका अर्थाने त्या सभासदास आर्थिक मदतीच्या हिशेबाने सहकार्य केले जाते. पतसंस्थांना सिबिल रिपोर्टची अट लागली तर गोरगरिबांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सहकार विभागाने सध्यातरी सिबिल रिपोर्ट आवश्यक करु नये.
>
> **– राजेंद्र बोरगुडे,** संचालक, ला.कृ.उ.बा. समिती

# पालकमंत्रिपदाचा तिढा सुटता सुटेना?

## मुख्यमंत्र्यांनी दत्तक घेतलेले नाशिक पालकमंत्र्यांविना

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्य सरकार स्थापन होऊन पाच महिने उलटून गेले तरी नाशिक जिल्ह्याला अद्याप पालकमंत्रिपद मिळू न शकल्याने जनतेमध्ये नाराजी आहे. महायुतीतील रस्सीखेचमुळे पालकमंत्रिपदाचा तिढा सुटायचे नाव घेत नाही.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. या यशानंतर महायुतीत खातेवाटपावरून चांगलीच रस्सीखेच झाली. त्यामुळे सरकार स्थापन होण्यास विलंब झाला त्याचाच कित्ता पुढे पालकमंत्रिपदाच्या वाटपावरुन रंगला. राज्यातील पालकमंत्रिपदाचा तिढा सोडवण्यासाठी महायुती सरकारने काही ठिकाणी सहाय्यक पालकमंत्री या पदाची निर्मिती केली, यावर देखील महायुतीतील तिढा संपला नाही.

पालकमंत्रिपद जाहीर झाल्यानंतर नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरुन मित्रपक्षांच्या नेत्यांकडून नाराजी व्यक्त केल्यानंतर अखेर नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्यात आली.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे २०२७ साली सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पालकमंत्रिपदावर प्रत्येक पक्षाकडून दावा सांगण्यात येत असल्याने महायुतीत पालकमंत्रिपदावर एकमत होऊ शकले नाही, मात्र सरकार स्थापन होऊन पाच महिने झाल्यानंतरही जिल्ह्याला पालकमंत्री नसल्याने नाशिककर नाराजी व्यक्त करत आहे. तर सिंहस्थाच्या नियोजनाच्या बाबतीही पालकमंत्री नसल्याने अडसर होत असल्याची भावना नाशिककर व्यक्त करत आहे.

जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटत नसल्याने अखेर गिरीश महाजन यांच्याकडे कुंभमेळा मंत्रिपद देण्यात आले. गिरीश महाजन कुंभमेळा मंत्री म्हणून सिंहस्थाच्या बैठकांना हजेरी लावत आपल कर्तव्य पूर्ण करत असले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घेतलेले नाशिक अजून किती दिवस पालकाविना असणार, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.

महायुती सरकारमध्ये समन्वय नाही. सिंहस्थासाठी मोठा निधी मिळणार असल्याने या मोहातून कोणीही पालकमंत्रिपद सोडायला तयार नसल्याने पालकमंत्रिपदाचा तिढा सुटत नाही. सिंहस्थाच्या निमित्ताने शहराचा विकास होणार आहे. श्रेय घेण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्षांकडून पालकमंत्रिपदावर दावा केला जात आहे. जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती आहे. अशी स्थिती नाशिक जिल्हावासीयांच्या समस्या सोडविण्यासाठी पालकमंत्री असायला हवा.

**-ॲड. आकाश छाजेड** (काँग्रेस शहराध्यक्ष )

पालकमंत्रिपदाचा प्रश्न वरिष्ठ पातळीवरील आहे. यासंदर्भात महायुतीचे मुख्य नेते चर्चा करून निर्णय घेतील. महायुतीत यासंदर्भात कोणतेही मतभेद नाहीत. कुंभमेळ्याच्या नियोजनाच्या दृष्टिकोनातून कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन लक्ष घालून आहेत. त्यामुळे आम्हाला अपेक्षा आहे की, गिरीश महाजनच पुन्हा पालकमंत्री व्हावेत.

**– प्रशांत जाधव (शहराध्यक्ष, भाजपा)**

देवेंद्र फडणवीस यांच्या दत्तक घोषणेवर नाशिककरांनी भाजपाच्या पारड्यात २०१७ मनपा निवडणुकीत भरभरून मतदान टाकले. त्यानंतरच्या निवडणुकीत देखील नाशिककरांनी भाजपावर विश्वास दाखवला. असे असताना नाशिकला पालकमंत्री न देणे म्हणजे जनतेच्या मतांची प्रतारणा आहे.

**– सुदाम कोंबडे (मनसे शहराध्यक्ष)**

### या कारणाने पालकमंत्रिपदाला महत्त्व

* २०२७ साली होणार कुंभमेळा
* सिंहस्थासाठी येणारा निधी
* प्रशासनावर पकड ठेवण्यास मदत
* नाशिक राज्यातील प्रमुख शहरांपैकी एक शहर
* अगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

### या कारणावरून पालकमंत्रिपदाचा तिढा

* सिंहस्थाच्या दृष्टीने पालकमंत्रिपद भाजपाला हवे
* मागील पंचवार्षिकप्रमाणे शिवसेनेला पालकमंत्रिपद मिळावे यासाठी शिवसेना आग्रही
* जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार असल्याने राष्ट्रवादीचाही पालकमंत्रिपदावर दावा
* महायुतीत वर्चस्वाची लढाई
* सिंहस्थातील विकासकामांवरून श्रेयवादाची आतापासूनच लढाई

जिल्ह्याला पालकमंत्री लवकर जाहीर करा, अशी आम्ही प्रथम मागणी केली होती. मार्च महिन्यात नाशिक दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनादेखील निवेदन देत पालकमंत्रिपदाचा तिढा लवकर सोडवत नाशिककरांना दिलासा देण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र, महायुतीच्या नेते जनतेचे प्रश्न सोडवण्यापेक्षा स्वतःच्या फायद्याचे राजकारण करण्यात व्यस्त आहेत.

**- डी. जी. सूर्यवंशी (जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गट)**

## महत्त्वाचे



### नासाका विद्यालयात भरला संस्कारवर्ग

**नाशिकरोड : प्रतिनिधी** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारा संस्कारवर्ग सलग तिसऱ्या वर्षी नासाका विद्यालयात भरला. पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात आयोजित या संस्कार वर्गात तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. राजेश्वर शेळके यांनी व्यायामाचे प्रकार आणि गरज, श्लोक, सुंदर हस्ताक्षर, मातापित्यांसह गुरुंचे महत्व याबद्दल हसत-खेळत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारोप सत्रास श्रीमंतश्री नर्सरीचे संचालक कवी शरद आडके, ज्येष्ठ कामगार नेते प्रशांत कापसे मंचावर उपस्थित होते. शाळेतील संस्काराची शिदोरी आयुष्यभर पुरते. संस्कारांचे महत्व अनन्यसाधारण असल्याने ग्रामीण भागात अशा संस्कार वर्गांची खऱ्या अर्थाने गरज आहे, असे विचार पाहुण्यांनी मांडले. मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांसह इतर सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. निवडक विद्यार्थ्यांनी अनुभवकथन केले. मुख्याध्यापक अरुण पगार यांनी स्वागत केले. संयोजक रवींद्र मालुंजकर यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक विभागप्रमुख कैलास लहांगे यांनी आभार मानले.

### विंचूरला विजेचा लपंडाव

**विंचूर : प्रतिनिधी** गेल्या तीन ते चार महिन्यांपासून विंचूरला दर तास अर्धा तासाने विजेचा लपंडाव सुरू आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहे . विजे अभावी फॅन, कुलर असून अडचण नसून खोळंबा ठरत आहे. विजेच्या नित्याच्या विज समस्येला वैतागलेल्या येथील काही सधन कुटुंबांनी घराच्या छतावर सोलर पॅनल बसविले. काहींनी इन्व्हर्टर बसविले. तर काहींनी नाशिक सारख्या शहराकडे पलायन केले. मात्र सर्वसामान्य नागरिकांना महावितरणचा छळ सोसल्या वाचून गत्यंतर नाही. दुरुस्तीच्या नावाखाली आठवड्यातून एक दोन दिवस अर्धा अर्धा दिवस विज पुरवठा खंडित केला जातो.त्या व्यतिरिक्त दर अर्ध्या पाऊण तासाच्या अंतराने दिवसातून दहा ते पंधरा वेळेस विज गायब होते ते वेगळेच. त्यामुळे विजेवर चालणारे व्यवसाय व ऑनलाइन व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचे व्यवसाय विजेअभावी ठप्प तर होतातच. त्याचबरोबर नागरिकांनाही उकाडा सहन करत विजेची वाट बघत तिष्ठत रहावे लागते. विजेच्या कमी जास्त दाबामुळे ऑनलाईन व्यावसायिक, बँका, पतसंस्थांचे संगणक, संगणकांचे सी.पी.यू. सारख्या उपकरणांमध्ये बिघाड होत आहेत. शेतकऱ्यांनाही द्राक्ष बाग, भाजीपाला आदी पिकांना तीव्र उन्हामुळे वेळोवेळी पाणी भरावे लागते. परंतु शेतकरी विहिरींवर जाऊन विद्युत पंप सुरु करून बारं देण्यासाठी पिकापर्यंत येईस्तोवर विज गुल झालेली असते. फक्त वीजबिल वसुली पुरतेच असलेले महावितरण याची भरपाई करणार का? असा सवाल नागरिकांच्या वतीने उपस्थित केला जात आहे.

### गोरोबाकाका यांची पुण्यतिथी साजरी

**सातपूर :** खान्देश-विदर्भ कुंभार समाज विकास समिती, नाशिक आयोजित संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी व प्रस्तावित मंदिराचा भूमिपूजन सोहळा प्रदेश सरचिटणीस मनसे, माजी सभागृहनेते दिनकर पाटील यांच्या हस्ते छत्रपती महाराज चौक, सातपूर येथे करण्यात आला. यावेळी युवा ऊर्जा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमोल पाटील, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष शरद आहेर, कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, सोमनाथ सोनवणे, तुळशीराम मोरे, आप्पासाहेब जोरवेकर, पुंडलिक सोनवणे, नितीन माळी, गोकुळ सोनवणे, बाळासाहेब जोरवेकर, गणेश आहेर, गुलाबराव पाटील, जगदीश मोरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाळासाहेब मंगळकर, रामदास वांगेकर, रमेश बेदरकर, मधुकर मोरे, शांताराम जाधव, रवींद्र वांगेकर, राजेंद्र सरोदे, हरिदास गवळी, निलेश मायकर, तसेच समाजबांधवांनी सहकार्य केले.

### युवकाकडून विद्युत पुरवठा खंडित

**सिडको : विशेष प्रतिनिधी** वडाळा गावातील काही टवाळखोर युवकांनी विद्युत यंत्रणेशी छेडछाड करून संपूर्ण गावाचा वीजपुरवठा खंडित केला. वडाळागावातील १०० फुटी रोड येथील रिक्षा स्टँडवरील विद्युत खांबावरील उच्चदाबाच्या विद्युत वाहिनीवर काही युवकांनी जाणून बुजुन विद्युत तारा फेकल्या. त्यामुळे अनेक ठिकाणी स्पार्क होऊन पूर्ण गावाचा विद्युत पुरवठा खंडित झाला. दरम्यान महावितरणकडून तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून, याप्रकरणी पोलिसांकडून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### मित्रविहारतर्फे व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी** मित्र विहार स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आणि नाशिक जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या सहकार्याने मित्र विहार स्पोर्ट्स क्लब येथे दि. ०१ ते ३१ मेदरम्यान व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबिराचे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात वय वर्षे ०७ ते १७ वर्षे वयाचे खेळाडू सहभागी होऊ शकतात. या शिबिरात राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक राजेंद्र शिंत्रे, हिरामण वाघचौरे, ज्ञानेश्वर धात्रक, श्याम ओक, प्रमोद जाधव, समीर घुगे मार्गदर्शन करणार आहेत.

## नाशिक-कोलकाता हवाईसेवा सुरू करा

### नाशिकच्या बंगाली समाजातर्फे खा. वाजेंना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये पन्नास हजारांहून अधिक बंगाली परिवार राहत असून, त्यांना त्यांचे मूळ गाव कोलकाता तसेच पश्चिम बंगालमधील विविध शहरांना जाण्यासाठी नाशिक ते कोलकाता अशी थेट हवाईसेवा सुरू करावी, तसेच मुंबई-कोलकाता दुरांतो एक्सप्रेसला नाशिकमध्ये थांबा द्यावा, अशा विनंतीचे निवेदन बंगाली अड्डा या बंगाली समाजाच्या नाशिकमधील संस्थेतर्फे खा. राजाभाऊ वाजे यांना देण्यात आले.



याबाबत अधिक माहिती देताना बंगाली अड्डा चे अध्यक्ष डॉ संदीप रॉय म्हणाले की नाशिकहून कोलकत्ता ला जाण्यासाठी थेट हवाईसेवा असावी, अशा विनंती इंडिगो व एअर इंडिया या विमान कंपन्यांना याआधी करण्यात आली आहे .या विनंती वर इंडिगो आणि एयर इंडिया सकारात्मक असून लवकरच ही हवाई सेवा सुरु होण्याची शक्यता आहे. तश्या प्रकारचा मेल देखील या विमान कंपन्यांकडून आला आहे.

यासोबतच मुंबईहून कोलकाताला जाण्यासाठी दुरांतो की जलद रेल्वे आहे.

सध्या दुरांतो एक्सप्रेसला नाशिक येथे थांबा नाही. हा थांबा असल्यास अनेकांची सोय होईल तसेच नाशिकहून कोलकता, नागपूर, रायपूर येथे जाण्यासाठी अजून एक रेल्वे उपलब्ध होईल. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या सेवा सुरू झाल्यास लाखो भाविक तर नाशिक मध्ये येतीलच सोबतच दोन्ही शहरांमधील व्यवसाय देखील वाढीस लागेल असेही डॉ. संदीप रॉय यांनी नमूद केले. नाशिक ते कोलकता हवाई तसेच रेल्वे मार्गाने प्रभावीपणे जोडण्यासाठी नाशिकचे खा राजाभाऊ वाजे यांना दिलेल्या निवेदनास खा. वाजे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचेही डॉ. रॉय यांनी सांगितले. निवेदन देताना बंगाली अड्डा तर्फे सौमित्र मुखर्जी, मृदुल देव व सुरजीत सेनगुप्ता देखील उपस्थित होते.





## कॉपर प्लेट्स चोरी करणारी टोळी जेरबंद

### गुन्हे शाखा युनिट-२ ची मोठी कामगिरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर एमआयडीसी भागातील एरियन फिनिशिंग्स प्रा. लि. कंपनीतून कॉपर पार्ट्सची चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीचा पर्दाफाश करत गुन्हे शाखा युनिट-२ ने ४ लाख २१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करत आरोपींना जेरबंद केले.

फिर्यादी गणेश शिवाजी सूर्यवंशी (रा. पिंपळगाव खांब) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक २६ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास त्यांच्या कंपनीतील कॉपर पार्ट्स चोरीस गेले होते. याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गोपनीय माहितीच्या आधारे, आरोपी रोहित गवई व विवेक बत्तीसे हे शरणपूर रोडवरील बेथेल नगर येथे असल्याचे निष्पन्न झाले. पथकाने तेथे जाऊन आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी लकी भंडारे, प्रेम भगत, आसाराम घुताडे यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. चोरीचा माल अजय मेंढकरच्या मदतीने भंगार व्यावसायिक अझहर अत्तार (रफीक स्क्रॅप सेंटर) व गुलामखान पठाण (जे.पी. स्क्रॅप सेंटर) यांच्याकडे विकल्याचेही सांगितले.

पोलिसांनी आरोपींकडून चोरीस वापरण्यात आलेली ज्युपिटर मोपेड, रिक्षा (क्र. एमएच १५ एफयू ४०३५), व विक्री केलेले कॉपर पार्ट्स असा एकूण ४,२१,१५०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

आरोपी अजय मेंढकरला देखील ताब्यात घेण्यात आले आहे.या कारवाईत सपोनि हेमंत तोडकर तथा प्रभारी अधिकारी हेमंत तोडकर ,डॉ. समाधान हिरे, पोलीस उपनिरीक्षक मुक्तारखान पठाण, पोहवा नंदकुमार नांदुर्डीकर, सुनिल आहेर, तेजस मते चंद्रकांत गवळी, प्रेमचंद गांगुर्डे यांच्यासह संपूर्ण पथकाने उत्कृष्ट समन्वय साधत कामगिरी बजावली. या गुन्ह्याचा पुढील तपास सातपूर पोलीस करीत आहेत.

## नाशिकरोडला व्यापारी बँकेतर्फे आजपासून वसंत व्याख्यानमाला

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेमार्फत आज दि.१ मे पासून दि.१० मेपर्यंत वसंत व्याख्यानमाला आयोजित केली आहे. रोज सायंकाळी सात वाजता मनपा शाळा क्र.१२५ चे प्रांगण, मुक्तिधाम मागे ही व्याख्यानमाला होणार असून, नामवंत वक्ते येथे हजेरी लावणार आहेत. बँक चालवीत असलेल्या या व्याख्यानमालेचे हे ४० वे वर्ष आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड यांनी दिली. आज दि.१ मे रोजी श्रीमती शर्मिष्ठा वालावलकर या लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयाच्या नाशिकच्या अधीक्षिका बदलते सामाजिक भान या विषयावर बोलणार आहेत. दि.२ मे रोजी सिन्नरचे कृष्ण कथाकार महंत मानस शास्त्री हे आध्यात्मिक बँकिंग वर आपले विचार मांडणार आहे. दि.३ मे रोजी अकोल्याचे गझलकार किशोर बळी यांनी हास्य बळी डॉट कॉम हा विषय व्याख्यानासाठी निवडला आहे. दि.४ मे रोजी ढाल तलवार या पलीकडील छ. शिवराय यावर छ. संभाजीनगरचे साहित्यिक विकास नवाळे बोलणार आहेत. मनमाडचे कथाकथनकार संदीप देशपांडे हे विनोदाच्या गावा जावे या विषयावर श्रोत्यांना घेऊन जाणार आहे दि.६मे रोजी डॉ. श्रीमती रेश्मा घोडेराव या मधुमेहतज्ज्ञ सकारात्मक जीवनशैलीची साथ मधुमेह व लठ्ठपणावर मात करण्याबाबत दोन शब्द श्रोत्यांना सांगणार आहे.





कोल्हापूरचे राष्ट्रपती पदकविजेते डॉ. स्वागत तोडकर औषधाविना आरोग्य हा मंत्र श्रोत्यांना देणार आहे. दि.८ मे रोजी मानुस घडण्याची प्रक्रिया व संत साहित्य यावर छ. संभाजीनगरचे प्रवचनकार महंत बाभूळगावकर शास्त्री मार्गदर्शन करणार आहेत. दि.९ मे रोजी नाशिकचे इतिहासकार किरण जाधव वीर बाजीप्रभू देशपांडे यांचा इतिहास कथन करणार आहेत आणि दहा मे रोजी शेवटचे पुष्प पुष्करराज थिएटर निर्मित सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम प्रस्तुत करून या व्याख्यानमालेचा समारोप करणार आहेत. विशेष म्हणजे व्याख्यानास दररोज उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांमधून लकी ड्रॉ काढून त्यांना त्वरित पारितोषिके त्याच वेळी दिली जातील. आनंद जॉगर्स क्लब यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.



## दोघा चोरट्यांकडून ४ घरफोडी गुन्ह्यांचा पर्दाफाश

### नाशिकरोड पोलिसांनी केली कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दोन चोरट्यांना अटक करत त्यांच्याकडून सुमारे ४ घरफोडी गुन्हे उघडकीस आणत २ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला

दिनांक ३० एप्रिल रोजी पोलिस अंमलदार अजय देशमुख व विशाल कुंवर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सिन्नर फाटा सिटी लिंक रोड परिसरात दोन संशयित इसम संशयास्पद हालचाली करत असल्याचे निदर्शनास आले. सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तातडीने कारवाई करत साजिद हसन खान (वय २७, रा. अरिंगळे मळा, नाशिकरोड) व निखिल चंद्रकांत पेटारे (वय २५, रा. विहितगाव) यांना ताब्यात घेतले. दरम्यान या दोघांची कसून चौकशी केली असता त्यांनी नाशिकरोड परिसरातील चार घरफोड्यांची कबुली दिली. यावेळी पोलिसांनी त्यांच्याकडून रोख १९ हजार रुपये किंमतीचे सोने तसेच एमएच १५ एफयू ४५६२ या क्रमांकाची सुमारे ७० हजार किंमतीची रिक्षा असा एकूण २ लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पुढील तपास पो.ह. विजय टेमगर करीत असून, ही कारवाई पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी व गुन्हे शोध पथकाने संयुक्तरीत्या केली. या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सार्वजनिक बांधकामचे २२७० कोटींचे रस्ता कामे मंजूर

### सिंहस्थ आढावा बैठक; वनविभागाच्या माध्यमातून विकासकामांचा आराखडा

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला गती आली असून, राज्य शासनाने मंजूर केलेल्या रस्ते विकास कामांना मंगळवार दि.२९ रोजी झालेल्या सिंहस्थ आढावा बैठकीमध्ये जिल्हा समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता च्या दृष्टीने नियोजनात असलेल्या रस्त्यांच्या कामाला खऱ्या अर्थाने गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जिल्हा नियोजन समितीचे सिंहस्थ आढावा बैठक विभागीय महसूल आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, मनपा आयुक्त मनीषा खत्री, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, उपजिल्हाधिकारी भारदे, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवचके आदींसह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत नाशिक ग्रामीण पोलीस विभागाचे अंदाजपत्रकात विविध सूचनांचा अंतर्भाव केल्यानंतर त्याची फेर सादरीकरण करण्यात आले. घोटी-त्र्यंबक जवळ या मार्गावरील प्रकल्पाबाबतही चर्चा करण्यात आली व त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निश्चित करण्यात आले.

वनविभागाच्या माध्यमातून ब्रह्मगिरी अंजनेरी हरिहर गड छोटा व मोठा प्रदक्षिणापथ यांच्या विकासकामांचा आराखडा सादर करण्यात आला. यावेळी मोठ्या रस्त्यांच्या आराखड्याला मान्यता देण्याचा विषयावर जिल्हा प्रशासनाने तातडीचे निर्णय घेत या कामांना गती देण्याच्या सूचना विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

२२७० कोटींचे रस्ते होणार गतिमान

नाशिक –त्र्यंबक रस्त्याचे काँक्रिटीकरणासह सहापदरीकरण, पालखी मार्ग ३५० कोटी नाशिक दिंडोरी वणी नांदुरी रस्ता रुंदीकरण, सुधारणा १०० कोटी, नाशिक–दिंडोरी रस्त्यावरील उनंदा नदीवरील पुल १५ कोटी, दुगाव ते जऊळके त्र्यंबकसाठी २१५ कोटी, जानोरी ओझर ५० कोटी, भरवीर टाकेद, बैज यासाठी ११९ कोटी चिंचोली वडगाव पिंगळा विंचूर दळवी पांडुर्ली रस्ता – २०७ कोटी वाडीवर्हे, देहेगाव, जातेगाव, तळेगाव, महिरा– वणी, दुडगाव, गणेशगाव रस्ता २०० कोटी दुगाव ढकांबे जऊळके रस्ता १६३ कोटी, शिडी राहता बाह्यवळण रस्ता १६५ कोटी, त्र्यंबकेश्वर तुपादेवी तळवाडे उमराळे दिंडोरी पालखेड जोपुळ पिंपळगाव २१५ कोटी, दुगाव जुने घागुर ढकांबे आंबे दिंडोरी जऊळके रस्ता १६३ कोटी, पेठ तोरंगण हरसुल वाघेरा अंबोली पहिने घोटी २०५ कोटी नोरी ओझर आंतरराष्ट्रीय विमानतळ – ५० कोटी आडगाव गिरणारे वाघेरा हरसुल ओझरखेड १५७ कोटी, त्र्यंबक देवगाव खोडाळा ४७ कोटी इतर कामे ९७ कोटी.

निशाणी **जाहीर नोटीस (Public Citation)** प्रोसेस जमा

**दिवाणी चौकशी अर्ज नं.२३९/२०२५ ॲड.निता वामनराव सोनवणे**
**नाशिक येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, सिनिअर डिव्हीजन,नाशिक यांचे कोर्टात ...**

१) श्री.रामान नारायण तांबोळी, वय- ७८ वर्षे, धंदा- सुखवस्तु
२) श्री.पंकज रामान तांबोळी, वय- ४७ वर्षे, धंदा- नोकरी क्र.१ व २ रा- एन-५३/व्हीजी२३/५, पाटील नगर, ५ वी स्किम, नम्रता चौक, सिडको, नाशिक
३) मनिषा मोहन तांबोळी, वय- ४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा.व्दारा विष्णुभाई तांबोळी, ई-१०/८१, मोती तांबोळी वाड, आझाद मदन मागे, मदनझापा रोड, वडोदरा, गुजरात ३९०००१ ) अर्जदार
४) सौ.रुपाली जयंतीलाल गारोळे (लग्नानंतरचे नांव) रुपाली रामान तांबोळी (पुर्वाश्रमीची) वय - ४२ वर्षे, धंदा - घरकाम रा.गुजर गल्ली, नवापूर - ४२५४१८.
५) सौ.माधुरी परिक्षित तांबोळी (लग्नानंतरचे नांव) माधुरी रामान तांबोळी (पुर्वाश्रमीची) वय - ४० वर्षे, धंदा - घरकाम रा.वृंदावन अपार्टमेंट, रिफायनरी रोड, ग्रोवा, बापुनी दुर्ग जवळ, वडोदरा, गुजरात - ३९००१६

विरुध्द

कोणीही नाही ) सामनेवाले

ज्याअर्थी **कै.विमल रामन तांबोळी** ह्या दि.२४/०५/२०११ रोजी नाशिक येथे मयत झालेल्या आहे. अर्जदार हे कै.विमल रामन तांबोळी यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम VIII अन्वये हेअरशिप सर्टीफिकेट (वारस दाखला) मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे.कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकीलांमार्फत **दि.०४/०६/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** हजर होऊन आपले म्हणणे मांडावे. अन्यथा कोणीचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम VIII अन्वये वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहीर नोटीस मे.कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिध्द केली असे.
ही जाहीर नोटीस. ता.२९/०४/२०२५.

सही/- लिपिक, सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक | सही/- अधिक्षक, सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक

# आंबा खरेदीसाठी बाजार समितीच्या आवारात ग्राहकांची तुडुंब गर्दी



**पंचवटी : वार्ताहर**

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला वर्षाचा पहिला सण अक्षयतृतीया असून, या दिवसापासून खऱ्या अर्थाने आंब्याच्या सीझनला सुरुवात होत असते. यानिमित्ताने पेठ रोडवरील शरदचंद्रजी मार्केट यार्डात आंबा खरेदीसाठी ग्राहकांची तुडुंब गर्दी झाली होती. ग्राहकांच्या पेठरोडवरील शरदचंद्र पवार मार्केट यार्डातील फ्रूट मार्केट गर्दीने फुलून गेले होते.**

अक्षयतृतीयेला घरोघरी पूर्वजांना उपवास करूच्या माध्यमातून जेऊ घालण्याची परंपरा आहे. त्यासाठी आमरसाचा नैवेद्य दाखविण्याची पारंपरिक प्रथा आहे. त्यामुळे या दिवशी आंब्यांना मोठी मागणी असते. तर जोपर्यंत पूर्वजांना जेऊ घालत नाही तोपर्यंत घरातील महिला आंबे खात नाही त्या अक्षय तृतीयाला उपास करू जेऊ घातल्यानंतर आंबे खातात. त्यामुळे अक्षयतृतीयेनिमित्त आंबे खरेदीसाठी बाजार समितीच्या फळ बाजारात दरवर्षी मोठी गर्दी होत असते. अक्षयतृतीयेच्या आदल्या दिवशीच आंबे खरेदीसाठी गर्दी केली होती.

तर बुधवार दि.३० रोजी देखील आंबा खरेदी साठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यावेळी शरदचंद्रजी मार्केट यार्ड फळ विभागात जुनागड केशर, रत्नागिरी हापूस, देवगड हापुस, बँगलोर लालबाग, विजयवाडा बदाम, आम्रपाली गुजरात, हैद्राबाद मलिका, रत्नागिरी पायरी, रत्नागिरी केशर या प्रजातींचे नवनविन आंबे उपलब्ध होती. यात हापूस व केशर या आंब्याची सर्वाधिक विक्री झाली. केशर आंबा सर्वसाधारण प्रति किलो १३० ते २००, रत्नागिरी व देवगड २००, कर्नाटक हापूस १३० ते १५० रुपये प्रतवारी दर मिळाले, अशी माहिती फळ व्यापारी भारत मोटवानी यांनी दिली.

### किरकोळ विक्रेत्यांना फटका

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती समितीच्या पेठ रोडवरील फ्रूट मार्केटला फळांची होलसेल विक्री होत असते. या ठिकाणाहून शहरभरातून ठिकठिकाणी हातगाडीवर विक्री करणारे विक्रेते येथून किरकोळ विक्रीसाठी फळे घेऊन जात असतात. नाशिक शहरातील नागरिकांना फ्रुट मार्केट बद्दल माहिती असल्या कारणाने बरेच ग्राहक हे होलसेल भावाच्या कारणाने फ्रुट मार्केटला येऊन फळे खरेदी करतात. यामुळे हातगाडीवर किरकोळ विक्री करणारे फळविक्रेत्यांच्या व्यवसायाला फटका बसत आहे. बऱ्याच किरकोळ फळविक्रेत्यांचे उपजीविकेचे साधन आहे.

### तर विक्रेत्यांवर कारवाई...

शरदचंद्र पवार मार्केट यार्डमधील होलसेल फळविक्रेत्यांना नियमानुसार पाच किलोपेक्षा कमी मालाची किरकोळ विक्री करता येत नाही. मात्र तसे होत असेल तर अशा फळविक्रेत्यांचा परवाना रद्द होऊ शकतो. असे करताना आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येईल.

**–निवृत्ती बागुल**, प्रभारी सचिव, नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती



# सोयगाव येथे मक्याचा चारा जळून खाक

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव तालुक्यातील सोयगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर शांताराम सदगीर यांच्या शेतातील मक्याच्या चाऱ्याला आग लागल्याची घटना बुधवार ( दि. ३०) रोजी दुपारी घडली. आगीचे रूप इतके भयंकर होते की ही आग विझवण्यासाठी नांदगाव येथून अग्निशमन दलास प्राचारण करण्यात आले होते. अखेर अग्निशमन दलाच्या तीन तासाच्या प्रयत्नानंतर हि आग आटोक्यात आली. याबाबत अधिक माहिती अशी की ज्ञानेश्वर सदगीर या शेतकऱ्याचा शेतमळा सोयगाव येथील भौरी रस्त्यालगत असून, सदगीर यांनी आपल्या जनावरांसाठी दहा एकर मक्याचा चारा आपल्या शेतात तीन वळाही घालत जमा करून ठेवला होता. बुधवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास शेतातील आजूबाजूच्या रहिवाशांना मकाच्या वळही मधून धूर निघत असल्याचे निर्दशनास आले असता त्यात मकाच्या एक वळहीला आग लागल्याचे समजले, दरम्यान वातावरणात झालेल्या बदलामुळे जोराची हवा चालू असल्याने आगीने भयंकर रूप धारण करत शेजारी असलेल्या दोन मक्का वळहीला देखील ही आग लागली. आग लागल्याचे समजताच शेजारील शेतकरी यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला मात्र आगीचे स्वरूप भयंकर असल्याने शेतकऱ्यांचे प्रयत्न कमी पडू लागले अखेर आग विझवण्यासाठी नांदगाव येथून अग्निशामक दलास बोलविण्यात आले. अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी तत्काळ दाखल होत लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यास यश आल्याने पुढील मोठी हानी टाळली.



# दादासाहेब फाळकेंचे नाशिकसाठी योगदान : ज्येष्ठ उद्योजक मेंढेकर

## महर्षी चित्रपट संस्थेच्या वतीने जयंती साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**

स्व. दादासाहेब फाळके यांनी नाशिकला दिलेले योगदान नाकारून चालणार नाही, असे ज्येष्ठ उद्योजक सुनील मेंढेकर यांनी व्यक्त केले. चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांची १५५ वी जयंती महर्षी चित्रपट संस्थेच्या वतीने सलग नवव्या वर्षी उस्ताहात साजरी केली. यावेळी मेंढेंकर बोलत होते.

सावानाचे प्रा. सोमनाथ मुठाळ यांनी म्हटले की, नाशिककरांना मिळालेला प्रदीर्घ वारसा अपवाद वगळता कोणालाही जपता आला नाही. हे वास्तविक सत्य आहे. परंतु महर्षी चित्रपट संस्थेने यांची दखल घेत अनेक कलाकारांना लघु चित्रपटाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली. महर्षी चित्रपट संस्थेचे खरेतर नाशिककरांनी कौतुक करत प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे मत मुठाळ यांनी व्यक्त केले. नाशिक येथे जन्म झालेले नावाप्रमाणे दादा असलेले दादासाहेब यांनी प्रचंड मेहनत व वेळ प्रसंगी कर्ज काढून चित्रपट क्षेत्राला जगवण्याचा सर्वोच्च प्रयत्न केल्यानेच त्यांना महर्षी संबोधलं जाऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी चंद्रकिरण सोनावणे, सुनिल परदेशी, किरण काळे, संकेत मेंढेकर, हुतात्मा स्मारक जेष्ठ नागरिक संस्थेचेप्रदीप पंडित, भरत जैनविजय चंद्रात्रे, सुभाष गुगळे, प्रमोद सोनवणे,संजय काकड, नरेंद्र कुलकर्णी, रवींद्र हिंगणे,प्रकाश खोत, हेमचंद्र कपोले, बाळनाथ जानराव, अशोक कुलकर्णी, पांडुरंग कुलकर्णी, पी आर वाणी आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष निशिकांत पगारे यांनी प्रास्ताविक केले. कलाकार व पदाधिकारी यांचे आभार योगेश बर्वे यांनी मानले.

# सीएनजीची टंचाई दूर करा

## खा. सुनील तटकरे यांना साकडे

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून सीएनजीचा पुरवठा सुरळीत होत नसल्याने ग्राहकांपाठोपाठ पेट्रोलपंप चालकही वैतागले आहेत. एमएनजीएलकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने पंपचालकांनी थेट बंदचा इशारा दिला होता. दरम्यान सीएनजी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी संसदीय पेट्रोलियम व नॅचरल गॅस समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्याकडे राष्ट्रवादीचे माजी आ. जयवंत जाधव व शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी केली. यावेळी खा. तटकरे यांनी एमएनजीएलचे नाशिक विभागाचे मुख्य संदिप श्रीवास्तव यांना सीएनजीचा पुरवठा सुरू करण्याच्या सूचना दिल्या.



दरम्यान साधनसामुग्री असतानाही सीएनजीच्या तुटवड्यामुळे अनेक पंपाना पुरवठा केला जात नसल्याने विक्री सुरू करता येत नसल्याचे चित्र आहे. यामुळे सीएनजीचा पुरवठा विस्कळीत झाल्याने याचा वाहनधारकांना फटका बसत असून सीएनजीसाठी पंपावर लांबच लांब रांगा लागत आहेत. याबाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी संसदीय पेट्रोलियम व नॅचरल गॅस समिती राष्ट्रीय अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी नाशिककरांच्या सर्व अडचणी जाणून घेत गॅस वाहतुकीचे टँकर वाढवून मुंबई- नाशिक गॅस पाईपलाईनचे काम लवकर पूर्ण करण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना दिल्या. नाशिक शहर व जिल्ह्यात एमएनजीएल प्रकल्प आल्यावर सर्व पेट्रोल पंप चालक व ग्राहक आनंदित झाले होते. काही पंपांवर सीएनजी चालू झाल्यानंतर लवकरच बऱ्याच ठिकाणी सीएनजी पुरवठा चालू होईल व ग्राहकांची सोय होईल. असे चित्र उभे राहिले. बऱ्याचशा पंप चालकांनी ग्राहक सेवेसाठी ट्रांसफार्मर घेणे, लोड वाढवणे व इतर अनुषंगिक खर्च केला व गुंतवणूक केली. परंतु ती फोल ठरली. नाशिक मध्ये ठराविक पंपावरच सीएनजी गॅसची विक्री होते.

वाहनधारक सकाळ पासून रांगेत लागून साधारणपणे २ तासानंतर गॅस मिळतो. सुट्टीच्या दिवशी ३ ते ४ तास वेळ वाया जात असल्याचे चित्र आहे. गॅस पुरवठा होत नसल्याने अनेक पंपावर गॅस शिल्लक नसल्याचे फलक दिसतात. परंतु एमएनजीएलच्या मालकीचे तीनही पंप अहोरात्र सुरू असतात. यामुळे पंप चालक व ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी असल्याच्या तक्रारी खा. तटकरे यांच्याकडे करण्यात आली.

पान १ वरून....

### जातनिहाय जनगणना होणार

काँग्रेसच्या युपीए सरकारने अनेक राज्यात जात सर्वेक्षण करुन राजकीय हीत साधण्याचा प्रयत्न केल्याची टीका अश्विनी वैष्णव यांनी केली. त्यानंतर, केंद्रीय कॅबिनेट बैठकीत आगामी जनगणनेत जात जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देखील त्यांनी दिली. मात्र, सरकारच्या या निर्णयावर विरोधकांकडून शंका उपस्थित होत आहेत. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हा निर्णय झाल्याचेही विरोधी पक्षातील नेत्यांनी म्हटले.

### जरांगे यांचा उपोषणाचा इशारा

उपोषण सुद्धा होणार आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी आपल्याला त्या ताकतीने उठाव करावा लागणार आहे. सगळ्या मराठा बांधवांनी २९ ऑगस्टच्या अगोदर काम आवरून ठेवा. आता माघारी यायचं नाही, सगळे सोयऱ्याच्या अधिसूचनेला दीड वर्ष पूर्ण झाला आहे. पुढील आंदोलनाची दिशा एक ऑगस्ट रोजी सांगणार आहे. सरकारने आपली शंभर टक्के फसवणूक केली, असाही आरोप जरांगे यांनी केला. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांच्यावर देखील हल्लाबोल केला

### फडणवीस अखेर वर्षा बंगल्यावर

झाल्यानंतर आपण तिथं शिफ्ट होऊ, म्हणून मी काही तिथं लगेच शिफ्ट झालो नाही, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच, इतक्या वेड्यासारख्या चर्चा, माझ्या स्तराच्या माणसाने अशा प्रश्नावर उत्तरही देऊ नये, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर दिले.

**राऊतांच्या दाव्याने खळबळ**

वर्षा बंगल्यावरील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या न राहण्याबाबत शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनी वेगळाच दावा केला होता, वर्षा बंगल्यात रेड्याची शिंगे पुरली असून कोणीतरी जादूटोण्याचा प्रकार केल्यामुळेच देवेंद्र फडणवीस या बंगल्यात राहायला जाण्यास तयार नसल्याचं संजय राऊत यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, देवेंद्र फडणवीसांनी याबाबत स्पष्टीकरणही दिले होते. अखेर आज अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधत देवेंद्र फडणवीसांनी वर्षा बंगल्यात गृहप्रवेश केला आहे.

### कळवणला महावितरणच्या जनमित्रांचा सत्कार

**कळवण :** वीजबिल थकल्याने वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांणी थकीत वीजबिल भरून त्याचा वीजपुरवठा सुरळीत करुन घ्यावा, असे आवाहन मालेगाव मंडळाचे अधिक्षक अभियंता जगदीश इंगळे यांनी केले ते कळवण येथे महावितरण विभागातर्फे आर्थिक वर्ष २०२४-२५महसुल उद्दीष्टपुर्ती कौतुक सोहळयात ते बोलत होते. कळवण येथील आप्पा श्री लान्स या ठिकाणी बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कळवण चे कार्यकारी अभियंता युवराज पाटील होते या कार्यक्रमासाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता छबु थैल, उपकार्यकारी अभियंता योगेश जगदाळे, अविनाश डमरे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.


**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क ९२२०२४२५५५**

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**नावात बदल**

माझे लग्नापूर्वीचे नाव सुनंदा शिवाजी आगळे असे होते. आता लग्नानतर माझे नवीन नाव **सुजाता किशोर घोटेकर** असे झाले आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. प्रतिज्ञापत्र दिनांक २६/०४/२०२५ नुसार

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी, मिळकत मालक **छबुबाई कारभारी साळवे** यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची खालील परीशिष्टात नमुद वर्णन केलेली मिळकत विकत घेणेसंबंधी त्यांचेबरोबर सौदा निश्चित केलेला आहे. सदर मिळकत संबंधाने मिळकत मालक यांनी अन्य कोणा बरोबर कोणत्याही प्रकारचा साठेखत, विक्रीबाबत व्यवहार अगर शेत मिळकतीवर गहाण, दान, बक्षिस, ताबा, बँकेचा बोजा, लेखी करार, नोटरी करार, कोर्ट अटॅचमेंट, लिज, लिन, विसारपावती, कुळ हक्क, कोर्ट वाद, मनाई हुकूम, पोटगी हक्क, वारस हक्क, विकसन हक्क, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, इजमेंट खरेदीखताचा अग्रहक्क वहिवाटीचा अगर रस्त्याचा हक्क इत्यादी प्रकारे बोजा निर्माण करून दिलेला असल्यास अगर अन्य कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध मालकी कब्जे वहिवाट असल्यास अगर या मिळकती संबंधाने कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा, दरखास्त, जप्ती, ॲटॅचमेंट इ. प्रलंबित असल्यास अशा हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी कागदोपत्री पुराव्यासह आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी आमचेकडे खाली नमुद केलेल्या पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाले पासुन सात दिवसांचे आत लेखी पुराव्यासह आणुन द्यावे. नमुद कालावधीत अशा हरकती न आल्यास कोणाचीही कोणतेही प्रकारची तक्रार नाही अगर अशा संबंधिताचे असलेले हक्क त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही व आमचे अशिलाचे खरेदीच्या व्यवहारास बाधा येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी, करीता ही जाहीर नोटीस दिली असे. **परिशिष्ट** - मिळकतीचे वर्णन - जिल्हा परीषद व तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका कोपरगाव पैकी मौजे पढेगांव हद्दीतील शेती मिळकत.

| गट नं | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|
| २६८/३ | १-४० | ५-६० |

यांसी पश्चिम रस्ता, पूर्व- गट नं. २६९, दक्षिण- गट नं.२६८ व उत्तर गट नं. २६१ व २६२ येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक शेत मिळकत तदंगभुत वस्तुसहित, मालकी कब्जेवहिवाटीचे हक्कासह काहीही राखुन न ठेवता.

दिनांक ३०/०४/२०२५

**ॲडव्होकेट वाय.एन. दवंगे**
**ऑफिस नं. ८, सुधारज कॉम्पलेक्स, कोर्ट रोड, कोपरगांव, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर, मो. नं. ८२०८१४९५५८**

**ग्रामपालिका कार्यालय घोटी बु.॥**
**ता. इगतपुरी, जि.नाशिक**

### जाहीर सूचना

प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपालिका घोटी बु.॥ यांजकडून या जाहीर सूचनेद्वारे तमाम नागरिकांस कळविण्यात येते की, **दिप कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि., लासलगांव** यांनी ग्रामपालिका घोटी बु.॥ हद्दीतील **श्री. अर्जुन नामदेव जाधव** यांचे मालकीचे **स. नं. ४०१/२ यांसी क्षेत्र ०१ हे. ७८ आर. आणि स. नं. ४०२/२ यांसी क्षेत्र ०२ हे.१३.२० आर**. या जागेत खडी क्रेशर, खाणपटा, दगड, मुरुम काढणे, ग्रीट पावडर, वॉश सॅन्ड, खडी रेतीपासून बनविले जाणारे ब्रिक्स (विटा), रेडीमिक्स प्रॉजेक्टस् **(RMC PLANT)** व सर्व व्हॅल्यू ॲडेड प्रॉडक्ट बनवणे यासाठी या कार्यालयाकडे ना हरकत दाखल्याची मागणी केली आहे. तसेच क्रेशरकामी ५०० किलो वॅट विद्युत पुरवठा घेणे व तत्सम युनिट बसविण्यासाठी कायमस्वरुपी ना हरकत दाखल्याची व ठरावाची **दि.२१.४.२०२५** रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली आहे. याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्या त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ७ **(सात)** दिवसांच्या आत सबळ पुराव्यासह ग्रामपालिका घोटी बु.॥ च्या कार्यालयात समक्ष आणून द्याव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत व अर्जदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे या कार्यालयाकडून ना हरकत दाखला व ठराव देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.१५६/२०२५**
**दिनांक २९/४/२०२५**

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपालिका घोटी बु.॥** **सही/-प्रशासक ग्रामपालिका घोटी बु.॥**

### टायटल व्हेरीफीकेशनकामी नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **मौजे वाघाड**, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत **गट नं. २११ यांसी एकूण क्षेत्र ०३ हे ८१ आर, आकार ०३ रू ५६ पैसे** यांसी चतु: सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस् प्रमाणे.

वर नमूद मिळकत ही **रखमाई दगडू शिंगाडे, गणपत कचरू शिंगाडे, गंगाधर कचरू शिंगाडे, रंगनाथ कचरू शिंगाडे, अनुसयाबाई संपत बेंडकुळे**, सर्व रा. वाघाड, ता. दिंडोरी यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जातील आहे. सदर संपूर्ण मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची अशी आहे असे सांगून सदर मिळकतीचा आमचे पक्षकार **श्री. विक्रम सोमा विधाते**, रा. जानोरी यांचेसोबत विक्रीचा व्यवहार केलेला असून सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफीकेशनचे काम आमचेवर सोपविलेले आहे. सबब सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब उपरोक्त मिळकतीमध्ये कोणाचाही कोणतेही स्वरूपाचा बोजा, हक्क, अधिकार जसे गहाण, दान, लीन, लीज, अन्नवस्त्र, जप्ती, जामिनकी, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र इ. स्वरूपाचा हितसंबंध अगर बोजा असल्यास अगर मिळकतीबाबत वाद असल्यास संबंधीतांनी लेखी हरकती कागदोपत्री पुरावेनिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून **सात** (०७) दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. तसेच मुदतीनंतर अथवा दैनिक वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरीफीकेशनकामी जाहिर नोटीस...

**दिनांक : ३०/०४/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. अरूण सदाशिव ठेपणे, ॲडव्होकेट**
**पत्ता- ॲडव्होकेट चेंबर्स, मार्केट यार्ड, कॉम्प्लेक्स, गाळा नं. ३५ /क, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक मोबा. ९५१८३९३९७३**

### टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन : मौजे नाशिक शहर-४**, ता. जि. नाशिक येथील **सर्व्हे नं. ८८९/१११/१/१ अ पैकी प्लॉट नं. १३ ते २०** यावरील "**सी. पी. पार्क को- ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक,** मधील **रो-हाऊस नं. ४** यांसी तळजागेचे **क्षेत्र ५१.०० चौ. मी.** व त्यावरील तळमजला व पहिल्या मजल्याचे **क्षेत्र ८१.३३ चौ. मी. बिल्टअप** ही मिळकत.

उपरोक्त नमूद केलेली मिळकत ही **जयवंत निवृत्ती बोडके** व **राजू गणपत धात्रक** यांचे मालकीची व कब्जेवहिवाटील असून सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे त्यांनी सांगितले आहे. तथापी सदर मिळकतीच्या निर्वेधपणाची खात्री करणेकामी सदरची पेपर नोटीस प्रसिध्द करत आहोत. उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, गहाण, दान, लिन, लिज, साठेखत करारनामा, विसार पावती, खरेदीखत, जनरल मुखत्यारपत्र, बँक बोजा, भाडेकरार, जामीनकी, कोर्ट जप्ती, हुकूमनामा, अन्नवस्त्र वगैरे अगर जडजोखीम असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत साक्षांकित कागदपत्रांचे पुराव्यानिशी लेखी हरकत, नोंदवावी. कागदपत्रे नसलेल्या व मुदतीनंतर आलेल्या तसेच वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध समजली जाईल याची नोंद घ्यावी. कळावे, ही नोटीस. नाशिक, **दि. २८/०४/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्दीस**

**ॲड. समाधान एन देवकर**
**ऑ: बी- २०५, मेघदुत शॉपींग सेंटर, सीबीएस समोर, नाशिक.मो नं. ९७६६०५७९८८**

### जाहीर नोटीस

**ॲड. मोरेश्वर आर. हिरे**
**मो.९०२८३२८६४८**
**सटाणा कोर्ट, सटाणा , ता. बागलाण, जि. नाशिक**

ज्याअर्थी तमाम लोकांस आमचे पक्षकार नोटीस देणार **रामभाऊ सिताराम वाघ**, रा. निताणे, ता. बागलाण, जि. नाशिक हल्ली मुक्काम एन ४४, ए ए २, १५/८, आदर्श चौक, पवन नगर सिडको, नाशिक, ता. जि. नाशिक यांचे तर्फे सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार **रामभाऊ सिताराम वाघ** यांची वडिलोपार्जित मालकी व कब्जा वहिवाटीतील शेतजमीन मिळकत **मौजे निताणे**, ता. बागलाण, जि. नाशिक येथील **गट नं. १९५/२, क्षेत्र १ हेक्टर ३८ आर, पोट खराबा हे.०९ आर आकार रु. २.२४ पैसे** ही शेत मिळकत आहे. आमचे पक्षकार हे सदरचे शेत मिळकतीचे कायदेशीर कब्जेदार व मालक आणि वहिवाटदार भोगवटदार आहेत. आमचे पक्षकार यानी त्यांचे शेत जमीनीचे सुरक्षिततेकरीता वरील गटाच्या चहुबाजुने तार कंपाऊंड करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी आमचे पक्षकार यांनी अँगल, सिमेंट, खडी, तारेची जाळी वगैरे बाबतची तयारी सुरु केलेली आहे व लवकरच वरील शेत जमीनीचे संपूर्ण क्षेत्राचे चोहुबाजूचे हद्दीवर तार कंपाऊंड करून घेणार आहेत. त्याअर्थी वरील आमचे पक्षकारांचे वरील शेत मिळकतीचे तार कंपाऊंड करणेकामी मिळकतीचे चतु:सिमेतील शेतकरी, कब्जेदार, मालक, भोगवटदार, करारदार, वालीवारस वा अन्य कोणीही हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींची काही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीनंतर ८ दिवसांचे आत आपलेकडील सक्षम लेखी पुराव्यासह व कागदपत्रांसह आमचे पक्षकारांकडे लेखी हरकत नोंदवावी. या मुदतीत कोणाची काहीएक हरकत अगर म्हणणे, तक्रार न आल्यास आमचे पक्षकार हे त्यांचे वरील मिळकतीचे हद्दीचे चहूबाजूने तार कंपाऊंडचे कामकाज पूर्ण करतील व मग त्यानंतर कोणाचेही काहीएक ऐकून घेतले जाणार नाही, तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**सटाणा तारीख २४/४/२०२** **नोटीस देणार- रामभाऊ सिताराम वाघ**

**नोटीस आमचे मार्फत प्रसिध्दीस रवाना**

**ॲड. एम. आर. हिरे,**
**सटाणा कोर्ट सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस/कर्जदारांना कळविणेत येते की, आमचे पक्षकार **पुरणचंद मोहनलाल लुणावत** यांचा इगतपुरी तालुका जिल्हा नाशिक या कार्यक्षेत्रात सावकारी व्यवसाय असून, यांसी **सावकारी परवाना नं.२** असा आहे. आमचे पक्षकार यांना सावकारी व्यवसाय बंद करावयाचा आहे. त्यांच्या कुटबियांनाही सदरचा व्यवसाय पुढे चालवायचा नाही. सन २०२२ पासून नविन कर्ज वाटप दिलेले नाही. त्यासाठी **दि. २६/०५/२०२२** रोजी "**दैनिक गांवकरी, दि. ०७/०७/२०२२** रोजी **दैनिक देशदूत (स्मरणपत्र), दि. ३१/१०/२०२२** रोजी "**दै. दिव्य मराठी**" **(स्मरणपत्र), दि. २४/०३/२०२३** रोजी **ॲड. श्री प्रविण पारख** यांचे मार्फत **दैनिक लोकमत (अंतिम सूचना पत्र)** आणि **दि. १६/०६/२०२३** रोजी "**दै. लोकमत**" "**दै. दिव्य मराठी** ग्रामीण आवृती या नाशिक जिल्ह्यात वर्तमानपत्रात वेळोवेळी जाहीर नोटीस व अंतिम सूचना पत्र प्रसिद्ध करुन आमचे पक्षकार यांनी सावकारी व्यवसाय बंद करण्याबाबतची आणि त्यांचेकडे गहाण (तारण) म्हणून असलेल्या वस्तू सोडवून घेवून जाणेबाबत सर्व कर्जदारांसाठी सूचना व नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. तसेच सन २०२२ पासून नवा बाजार, पटेल चौक, इगतपुरी येथील व्यवसायाची जागा/दुकानाच्या दर्शनी भागावर याबाबत सूचना फलक सुध्दा लावलेला आहे. आमचे पक्षकार यांचा वैयक्तीक नावाने व्यवसाय असून वृध्दापकाळामुळे व्यवसाय पुढे सुरु ठेवायचा नाही व त्यानंतर त्यांच्या कुटुंबातील कोणीही सदर व्यवसाय पुढे करणार नाही.

त्यामुळे सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या **(दि. ३१/०५/२०२५)** अखेर ज्यांच्या गहाण वस्तू ठेवलेल्या असतील त्या सर्वांनी त्यांच्या वस्तु सोडवून घेऊन जावे. यासाठी अंतिम सूचना व नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. मुदतीत तारण वस्तू सोडवून नेल्या नाहीत तर कोणत्याही प्रकारची तक्रार व वाद करण्याचा आधिकार राहणार नाही. तसेच आमचे पक्षकार यांचेनंतर त्यांच्या कुटबियांची सदर सावकारी व्यवसाय व गहाण ठेवलेल्या वस्तुबाबत कोणतीही जबाबदारी सदर सावकारी व्यवहाराबाबत राहणार नाही. त्यांच्या कुटबियांविरुध्द कोणत्याही तक्रारी करण्याचा अधिकार कोणासही राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. ही जाहीर सूचना व नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

**इगतपुरी**
**दि. ३०/०४/२०२५**

**ॲड. सतीष आर. खंडेलवाल**
**ॲड. आयुष सतीश खंडेलवाल**
**पटेल चौक, लोया रोड, इगतपुरी, जि. नाशिक. मो.९२२६४८१९५०**

# जाखोरीकरांचा विशेष ग्रामसभेतून वाळू लिलावास विरोध

## वाळू काढल्यास पाणीटंचाई ओढविण्याची भीती

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**नाशिक तालुक्यातील जाखोरी गावालगत असणाऱ्या दारणा नदीपात्रात शासनाने वाळू लिलाव काढला असून, या वाळू लिलावाला जाखोरीच्या नागरिकांनी विरोध दर्शवला आहे. विशेष ग्रामसभेत वाळू लिलाव रद्द न झाल्यास नागरिकांनी जलसमाधीचा इशारा दिला आहे.**

जाखोरी दारणा नदीपात्रात वाळू लिलाव करू नये, अशी मागणी अनेक वेळा ग्रामस्थांनी महसूल विभागाकडे केली आहे. संबंधित अधिकारी हट्ट धरत असतील आणि जाखोरीकरांच्या भावनांशी खळत असतील तर जाखोरीकर घराघरात कटोरे फिरवून आपल्याला महसूल जमा करून देतील. मात्र, आमच्या जिवाशी खेळू नका. वाळू लिलाव रद्द करा, असे म्हणत लिलाव रद्द न झाल्यास शासनाच्या निषेधार्थ जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्य विश्वास कळमकर व राहुल धात्रक यांनी विशेष ग्रामसभेत शासनाला दिला. आज नदीच्या पाण्याची पातळी कमी होत असून, येणाऱ्या आठ -दहा दिवसांत पाणीटंचाईचे संकट जाखोरीकरांच्या माथी पडले. मग पाणीटंचाईस कोण जबाबदार असेल, असा सवाल करत जिल्हाधिकारी साहेबांनीच गावातील घरपट्टी, पाणीपट्टी हा कर वसूल करून गावाला दत्तक घेऊन सुविधा द्याव्यात, असे सांगण्यात आले.

यावेळी संजय धात्रक, कोंडाजी ताजणे, संतोष बोराडे आदींनी मनोगत व्यक्त केले. ग्रामसभेस सरपंच अर्पणा कळमकर,



प्रवीण गेडाम यांना निवेदन देताना विश्वास कळमकर, युवराज जगळे, राहुल धात्रक, नितीन कळमकर, तुकाराम चव्हाण आदी.

उपसरपंच ज्योती पवार, सदस्य मंगला जगळे, उज्ज्वला जगळे, विश्वास कळमकर, राहुल धात्रक, प्रकाश पगारे या पदाधिकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय धात्रक, सोसायटी चेअरमन संतोष बोराडे, कोंडाजी ताजणे, नितीन कळमकर, रतन कळमकर, भाई कळमकर, सोपान कळमकर, विलास जगळे, नारायण ताजणे, नितीन कानडे, नाना क्षीरसागर, सोमनाथ बोराडे, युवराज जगळे, केशव धात्रक, संदीप धात्रक, संजय खाडे, दिनेश क्षीरसागर आदींसह मंडल अधिकारी प्रदीप रणदिवे, ग्रामसेवक जगदीशकुमार कदम, तलाठी रविकन्या पाटील, कृषी अधिकारी कीर्ती कळसकर यांच्या उपस्थितीत ग्रामसभा पार पडली.

### महसूल आयुक्तांना जाखोरीकरांचे निवेदन...

दोन दिवसांपूर्वी महसूल आयुक्त प्रवीण गेडाम यांनादेखील जाखोरी गावच्या ग्रामस्थांनी वाळू लिलाव रद्द होण्यासंदर्भात निवेदन दिले आहे. मात्र, यावरती कोणतीही गांभीर्यता प्रशासनाला दिसत नसल्याचे चित्र दिसत असल्याने विशेष ग्रामसभा घेऊन नागरिकांनी वाळू लिलावाला बहुमतांनी विरोध दर्शविला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीदेखील भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली जाणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

### वाळू लिलावाने पाणीटंचाईची शक्यता?



प्रशासनाने घाट घातलेल्या वाळू डेपोमुळे भविष्यात ग्रामस्थांना व नदीलगतच्या शेतकऱ्यांना मोठ्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. सरकारी जीआरमध्ये पेसा गावांना विश्वासात घ्यायला तर इतर ग्रामपंचायतीस विश्वासात घेण्याची गरज नसल्याचे म्हटले आहे. हा निवळ पक्षपातीपणा असून, सदर वाळू डेपो रद्द न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र जनआंदोलन उभे करू, असा इशारा दिला आहे.

– **राहुल धात्रक,** सदस्य, ग्रा.पं. जाखोरी

## महत्त्वाचे

### पतीला गाडी घेण्यासाठी माहेरून पैसे आणावे यासाठी महिलेचा छळ

**पंचवटी :** पतीला गाडी घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणावे यासाठी सासरच्यांकडून महिलेचा छळ करून घरातून हुसकावून दिल्याप्रकरणी म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि.२१ एप्रिल २०१७ रोजी लग्न झाल्यानंतर फिर्यादी महिला सासरी नांदत असताना तिच्या सासरच्यांनी एक वर्ष चांगली वागणूक देऊन सन २०१८ ते दि.६ जुलै २०२४ पर्यंत तिच्या सासरच्या तीन महिला, दोन पुरुषांनी संगनमताने फिर्यादीचा मानसिक, शारीरिक छळ करून तुला घरकाम, स्वयंपाक येत नाही. तुझ्या आई व भावाने लग्नात मानपान दिला नाही. चैनीच्या वस्तू दिल्या नाही. पतीला गाडी घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणावे, या कारणावरून मारझोड करून बदनामी केली. लग्नात दिलेले दागिने काढून घेऊन घरातून हाकलून देऊन नांदविण्यास नकार दिला आहे. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास श्रेणी पोलिस उपनिरीक्षक बी. बी. वाघ करीत आहेत.



### गावठी दारू हातभट्ट्या उद्ध्वस्त

**सटाणा :** तालुक्यातील अंतापुर येथील मोसम नदी लगतच्या परिसरात जायखेडा पोलिसांनी धडक कारवाई करीत छुप्या पद्धतीने अनधिकृतरीत्या सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या आहेत. या कारवाईत शेकडो लिटर रसायनासह १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात पोलिसांना यश आले असून, चार संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अंतापूर येथे मोसम नदी परिसरातील दाट झाडाझुडपांत गावठी दारूच्या हातभट्ट्या लावून मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्यात येत असल्याची गुप्त माहिती जायखेडा पोलीसांना मिळाली होती. जायखेडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काळे यांनी पोलीस कर्मचारी रवींद्र कोकणी, अरुण वन्स, पृथ्वीराज बारगळ, श्री. शिरोळे, क्षीरसागर आदी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाड टाकली असता गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठीचा कच्चा रसायनाचा साठा तसेच दारू तयार करण्यासाठी लागणारी साधनसामग्री व गावठी हातभट्टीची दारू मोठ्या प्रमाणात मिळून आली. पोलिसांनी साधनसामग्रीसह दारू बनवण्याचे साहित्य व गावठी हातभट्टीवरील दारूचे तयार रसायन असे एकूण १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. या प्रकरणी अनुसयाबाई सोनवणे, नंदाबाई गवळी, रेखाबाई गवळी, गायत्री गवळी या चौघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



### लोकसेवेच्या वचनाचा नवा संकल्प अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**नाशिक :** 'आपली सेवा-आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त सोमवारी (दि. २८) सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. आदिवासी विकास आयुक्तालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शपथ घेत लोकसेवेच्या वचनाचा नवा संकल्प केला. सेवा हक्क दिनाचे औचित्य साधून आदिवासी विकास आयुक्तालयातील उपायुक्त शशिकला आहिरराव आणि विनिता सोनवणे यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नागरिकांचच्या हितार्थ आणि कल्याणार्थ काम करण्याची शपथ दिली. यावेळी सहायक आयुक्त दिलीप खोकले, सहायक प्रकल्प अधिकारी विनोद करडमारे, सुनील कायंदे, संतोष गायकवाड, अनिता दाभाडे यांच्यासह उदय जोशी, अनिल साळवे, अनिल महाजन, शरद निळे, नंदकिशोर जगताप, तुषार जावळे, ॲड. विशाल महाले, किरण सोनवणे, अमृता भालेराव आदी उपस्थित होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने विहित कालमर्यादित व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपुर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी मी कटिबध्द राहिन. मी सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही, यासाठी आवश्यक पावले उचलेन. मी उक्त कायद्याने नागरिकांना प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व नागरिकांविषयी सेवाभाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करेन. अशी शपथ घेण्यात आली.



### सव्वा लाख युवक-युवतींना प्रशिक्षण

**नाशिक :** मविप्र संचलित व कौशल्य विकास उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पुरस्कृत जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून गेल्या ३० वर्षांत सुमारे सव्वा लाख युवक-युवती आणि महिलांनी रोजगाराभिमुख प्रशिक्षण घेऊन स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू केले आहेत. मार्गदर्शक शिक्षक व प्रोग्राम स्टाफ यांनी शहरापासून-खेड्यापाड्यापर्यंत केलेल्या कार्यामुळेच हे शक्य झाले असून, ही बाब कौतुकास्पद असल्याचे मत मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी व्यक्त केले. संस्थानचे प्रशिक्षण वर्ग यापुढे मविप्रच्या सर्व शाखांवर सुरू करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. मविप्र संचलित जनशिक्षण संस्थानच्या उत्तमनगर, सिडको येथील मुख्य कार्यालयात जिल्हाभरातील मार्गदर्शक शिक्षकांसाठी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. संस्थानचे प्रभारी संचालक प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविकात कौशल्य विकास विभागाच्या नियमावली व भविष्यात घ्यावयाच्या कोर्सेसची माहिती दिली. कार्यकारी मंडळाचे सदस्य नानासाहेब ठाकरे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना आजच्या स्पर्धेच्या युगात स्किल डेव्हलप करणे व आठवड्याच्या कामकाजाचे मोजमाप कसे करायचे तसेच कोर्स पूर्ण केल्यानंतर व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज कसे उभे करायचे, यासंदर्भात माहिती दिली. प्रा. नवनाथ बोंबले, स्टार्टअप इंडियाचे श्रीकांत पाटील यांनी उद्योग व्यवसाय व शासकीय योजना, सोशल मिडियाचा व्यवसायासाठी वापर कसा करायचा, याबाबत माहिती दिली. जनशिक्षण संस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. यावेळी त्यांनीही मनोगत व्यक्त केले.

# पाच मोटारसायकली लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक शहर आणि उपनगरांत काही दिवसांत पाच मोटारसायकली चोरट्यांनी लंपास केल्या. विविध भागांतील या घटनांमुळे पोलिस यंत्रणेपुढे वाहनचोरांवर लगाम घालण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

अंबड औद्योगिक वसाहतीतील संजीवनगर भागात रहाणारे संतोष दळवी यांची बजाज पल्सर (एमएच १५ जेबी ९४३३), किंमत ६० हजार रुपये, ही २३ ते २८ एप्रिलदरम्यान चोरीस गेली. सातपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अशोकनगर येथे रहाणारे गणेश पवार यांची ५० हजार रुपये किमतीची पल्सर (एमएच १५ जेजे ७१२९) मध्यरात्रीच्या सुमारास चोरीस गेली. पेठ रोड परिसरात गोपाल कांबळे यांनी घरासमोर उभी केलेली ४० हजार रुपये किमतीची होंडाशाईन (एमएच १५ एफझेड ५४३६) चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेली. जुने नाशिक येथील मोईनोद्दीन शेख (रा. काझीपुरा) याची ९ हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा (एमएच १५ ईटी ६८०९) घराजवळ पार्क केली असता चोरट्यांनी चोरून नेली. पिंजारघाट परिसरात नाजिम शेख (रा. हुसैनी चौक) यांच्या हिरोहोंडा स्प्लेंडर (एमएच १५ डीडी ११४८) ची चोरी झाली आहे.

या वाढत्या वाहनचोरीच्या घटना लक्षात घेता शहर आणि परिसरातील वाहनांना लक्ष्य करणाऱ्या वाहनचोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# रेशीम शेतीवरती गायखेंची मुलाखत

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

आकाशवाणी नाशिक केंद्र एफएम १०१४ मेगा हर्ट्झवर शनिवार दि.३ मे रोजी संध्या.



७.३० वाजता पळसे येथील शेतकरी गायखे यांची मुलाखत घेण्यात येणार आहे. ही मुलाखत किसानवणी कार्यक्रमात नाशिक तालुक्यातील पळसे येथील प्रयोगशील आणि प्रगतशील शेतकरी नंदकिशोर गायखे यांची 'माझे शेतीतील अनुभव-रेशीम शेती' या विषयी आरती शिरवाडकर या मुलाखत घेणार आहेत. मुलाखतीचा पूर्वार्ध सादरकर्ते कृष्णा शिंदे आहेत.

# नगरसूलच्या शेख वस्तीवर जबरी घरफोडी

## सुमारे अडीच ते तीन लाखांचा ऐवज चोरीस

**नगरसूल :** येथील माळवाडी परिसरातील शेख वस्तीवर मंगळवारी (दि. २९) मध्यरात्री चोरट्यांनी केलेल्या जबरी घरफोडीत सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचा ऐवज लंपास केला.

येथील बालम मेहबूब शेख यांच्या शेतातील घरी त्यांचे सर्व कुटुंब घरासमोर ओट्यावर झोपलेले होते.

मध्यरात्री दीड-दोनच्या सुमारास घराचा मागील दरवाजा तोडून चार ते पाच चोरट्यांनी प्रवेश केला. घरातील कपाट, पेट्या, डबे उघडून रोकड व सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी केली. बालम शेख यांनी ट्रॅक्टरची ट्रॉली खरेदीसाठी एक लाखाची रक्कम घरात ठेवली होती. त्यांच्या मुलाने देखील व्यवसायातून मिळालेली पंचवीस ते तीस हजार रुपये रोख रक्कम तसेच महिलांचे दीड तोळ्याचे सोन्याचे दागिने असा एकूण अडीच ते तीन लाख रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. शेतीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या या गरीब कुटुंबाचे मोठे नुकसान झाल्याने शेख कुटुंब



हतबल झाले आहे. पोलिसांनी चोरीचा छडा लावून जेरबंद करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. वस्त्यांमध्ये असलेली घरे चोरट्यांनी लक्ष्य केल्यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरसूल येथील पोलीस चौकी सतत बंद असून, येथे एकही पोलीस कर्मचारी उपस्थित राहत नाही. शेख वस्तीवर अक्षय प्रकाश योजनेचे कनेक्शन नसल्याने अंधाराचा फायदा चोरट्यांनी घेतला व शेख कुटुंबाची लूट झाल्याबद्दल नाराजी येथील रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

# नाशिकरोड भागात घरफोडी करणारे आरोपी अटकेत

## गुन्हे शोध पथकाची यशस्वी कारवाई

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिकरोड पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यात गुन्हे शोध पथकाला यश मिळाले आहे. दोन संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सुमारे तीन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यामधून चार घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आले असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी यांनी सांगितले.

गुन्हे शोध पथकातील अंमलदार अजय देशमुख व विशाल कुंवर यांना गुप्त माहिती मिळाली की, सिन्नरफाटा सिटीलिंक रोड परिसरात दोन इसम संशयास्पदरीत्या फिरत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण सूर्यवंशी यांच्या पथकाने सिन्नरफाटा येथे कारवाई केली.

सिटीलिंक बस डेपो परिसरात एका रिक्षाजवळ संशयित हालचाली करणाऱ्या दोघांना पोलिसांनी पाहताच ते पळू लागले. त्यांचा पाठलाग करून पोलिसांनी त्यांना पकडले. चौकशीत त्यांनी आपली नावे साजिद हसन



खान (वय २७, रा. अरिगळे मळा, साईबाबा मंदिराजवळ, नाशिकरोड) आणि निखिल चंद्रकांत पेटारे (वय २५, रा. विहितगाव, नाशिकरोड) अशी सांगितली. त्यांच्याकडून सोन्याचे तुकडे आणि अन्य ऐवज जप्त करण्यात आला असून, एकूण २,८९,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांच्या अटकेमुळे नाशिकरोड पोलीस ठाणे हद्दीतील चार घरफोडी प्रकरणे उघडकीस आली आहेत. तपास पोलीस हवालदार विजय टेमगर करीत आहेत.

# आडगाव शिवारात घरफोडीत पावणेदोन लाखांचा ऐवज लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आडगाव शिवार येथील निवृत्तीनगर परिसरातील वक्रतुंड अपार्टमेंटमधील एका बंद फ्लॅटमध्ये चोरट्यांनी दिवसाढवळ्या चोरी करत सुमारे १ लाख ७१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

फ्लॅट मालक अमृत सुरेश तांबारे (वय ३०) हे २८ एप्रिल रोजी सकाळी घर बंद करून बाहेर गेले होते. रात्री परत आल्यानंतर त्यांनी घराचे दरवाजे उघडलेले आणि आतील सामान अस्ताव्यस्त असल्याचे पाहून तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. चोरट्यांनी लोखंडी गेट, मुख्य दरवाजा व बेडरूमचा दरवाजा यांचे लॅच लॉक तोडून ड्रेसिंग टेबलच्या ड्राव्हरमधून १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ५ ग्रॅम वजनाचे मणीमंगळसूत्र व २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले तसेच १ लाख ५० हजार रोख रक्कम असा एकूण १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास आडगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# सापतपाली येथे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी बालविवाह रोखला

**नाशिक : प्रतिनिधी**

अक्षयतृतीयानिमित्त जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा परिषद नाशिकमार्फत सुरू करण्यात आलेल्या विशेष मोहिमेंतर्गत सापतपाली (ता. त्र्यंबकेश्वर) येथे प्रशासनाच्या तत्परतेमुळे एका बालविवाहास प्रतिबंध करण्यात आला.



सापतपाली गावात १७ वर्षे ४ महिने वयाच्या बालिकेचा विवाह होणार असल्याची माहिती प्रशासनास मिळताच ग्रामपंचायत अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती दिली. या प्रयत्नांना यश येत कुटुंबीयांनी विवाह थांबवण्यास सहमती दर्शवली. बालविवाह रोखण्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्प हरसूल येथील महिला व बालविकास अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी केलेली कार्यवाही कौतुकास्पद असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

# पोलिस कोठडीतून पळालेला आरोपी गजाआड

**सिडको/पंचवटी : प्रतिनिधी**

भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काठेगल्ली परिसरात असलेल्या जयशंकर चौकात २७ एप्रिल रोजी अमोल हिरवे यांच्यावर दगड व कोयत्याने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी भद्रकाली पोलिसानी संशयित क्रिश किरण शिंदे (१९, रा. नानावली, जुने नाशिक) आणि त्याच्या एक विधी संघर्षित साथीदाराला ताब्यात घेतले होते. मात्र, आरोपी क्रिश शिंदे पोलीस कस्टडीदरम्यान पोलिसांना झटका देऊन मित्राच्या मोपेडवरून फरार झाला.

मानवी कौशल्य आणि तांत्रिक पद्धतींचा वापर करत भद्रकाली पोलिसांनी केवळ २४ तासांत क्रिश



शिंदेला इगतपुरी शिवारातून ताब्यात घेतले.

यासाठी भद्रकाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने शोधमोहीम सुरू केली. पथकप्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यवान पवार यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. आरोपीला मदत करणारा किरण परदेशी (रा. कथडा) आणि त्याची मोपेड ताब्यात घेण्यात आली.

त्याने शिंदेला आडगाव येथील निलगिरी बाग परिसरात सोडलं असल्याची माहिती दिली. ही उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक सत्यवान पवार व त्यांच्या पथकाने पार पाडली. या तपास पथकात हवालदार सतीश साळुंके, कय्युम सय्यद, लक्ष्मण ठेपणे, अविनाश जुंद्रे, धनंजय हासे, तौसिफ सैय्यद, जावेद शेख, गुरू गांगुर्डे, सागर निकुंभ, योगेश माळी व उत्तम खरपडे यांचा समावेश होता.

# माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी बनविला स्मार्ट क्लास

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

पासष्ठी गाठलेल्या नाशिप्रच्या पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलमधील अकरावी बॅचचे चाळीस माजी विद्यार्थी एकत्र आले आणि गत आठवणींना उजाळा देत तत्कालीन तारुण्याच्या आठवणीत मश्गूल झाले. यातील काही जणांनी अमेरिका, जर्मनी, फ्रान्स येथेही नोकरी केलेली. काही डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल झालेले होते. या सर्वांनी शाळेसाठी स्मार्ट क्लास तयार करून दिला. त्यासाठी डिजिटल बोर्ड भेट दिला.

या स्मार्ट क्लासचे उद्घाटन त्यांच्या काळात असलेले शाळेचे प्राचार्य भा. ल. आचार्य व शिक्षक वा. रा. शिंगणे यांच्या हस्ते करण्यात आले. शालेय समिती अध्यक्ष रावसाहेब गायधनी यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विद्यमान प्राचार्य उमाकांत वाकलकर, पर्यवेक्षक प्रद्युम्न जोशी, सुभाष पवार, मुकेश ठोंबरे, भरत भालेराव हेही उपस्थित होते. वाकलकर यांनी शाळेची सध्याची यशस्वी वाटचाल या माजी विद्यार्थ्यांसमोर मांडली. शाळेने आम्हाला उत्तम संस्कार



दिले. पुस्तकी ज्ञानाबरोबरच जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शनही केले. ही सामाजिक बांधिलकी जोपासत शाळेला आम्ही हा डिजिटल बोर्ड दिला आहे, असे धनंजय वर्तक, ॲड. शेखर रास्वळकर, राम दातार, अशोक आचार्य, अशोक तायडे, श्रीपाद माऊसकर, अनिल कराड, मुकुंद बुरकुले यांनी मनोगतातून व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांतर्फेही भा. ल. आचार्य, वा. रा. शिंगणे, प्राचार्य वाकलकर यांना सन्मानित केले. तब्बल पन्नास वर्षांनंतर शाळेत प्रथमच एकत्र आल्याने ते भारावून गेले होते. मित्रांना भेटण्याची ओढ व शाळेविषयी आपुलकी म्हणून सतीश वाबळे डायलिसिसवर असतानाही या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिले.

## महत्त्वाचे

### राज्य नाट्य स्पर्धेचा ५ मे रोजी पारितोषिक वितरण सोहळा

**नाशिक :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा आणि २१ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्या कलाकार, तंत्रज्ञ व संस्थांचा विभागीय पारितोषिक वितरण सोहळा सोमवार, ५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा परशुराम साईखेडकर नाट्यगृह येथे होणार असून, सर्व रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यक्रमात प्राथमिक फेरीतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलाकारांचा, तंत्रज्ञांचा आणि नाट्य संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.



### वाढदिवसानिमित्त वाचनालयास पुस्तके भेट

**नाशिक :** मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष एस. बी. शिरसाठ यांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त इंदिरानगर येथील सर्वात्मक वाचनालयास पुस्तके भेट देऊन वेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. मागील वर्षी एका आधार आश्रमास त्यांनी पुस्तके भेट दिली होती. वाढदिवसाला केक कापणे, मोठा गाजावाजा न करता होणारा खर्च टाळून त्यांनी तेवढ्या किमतीचे पुस्तके वाचनालयास भेट दिल्याने इतरांना त्याची प्रेरणा मिळावी, हा खरा त्यामागचा हेतू आहे. यावेळी माजी नगरसेवक सुनील खोडे, सर्वात्मक वाचनालयाचे अध्यक्ष विलास टिळे, के. के. अहिरे, अशोक नेहे, शशांक मदाने, पुरुषोत्तम रकिबे, दशरथ जाचक, आर एम पवार, जाचक नाना, राजीव पवार, एस टी शिंदे, दिलीप खेडकर, राजकुमार खामकर, संजय पाटील व मान्यवर उपस्थित होते.



### कलाशिक्षक संघातर्फे रवि वर्मा यांचा जन्मदिन

**नाशिक :** २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघ व व्हिजन नाशिक विभागीय कलाशिक्षक या संघटनेतर्फे दिनांक २९ एप्रिल हा दिवस रवि वर्मा यांचा जन्मदिन म्हणून ७ वर्षांपासून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने जिल्ह्यातील बाळ नगरकर (नाशिक), पुंजाराम सावंत नामपूर (सटाणा) व शुभदा विद्यालय सोयगाव मालेगावचे कलाशिक्षिका सुवर्णा पगार यांना चित्रकार रवि वर्मा यांच्या नावाने पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे व महाराष्ट्र महासंघाचे अध्यक्ष प्रल्हाद साळुंखे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्यासोबत राज्य सदस्य दत्तात्रय सांगळे व्हिजन विभागीय अध्यक्ष एनडीएसटीचे संचालक चंद्रशेखर सावंत, व्हिजन नाशिकचे जिल्हाध्यक्ष, एनडीएसटी सोसायटीचे संचालक, जुनी पेन्शनचे राज्य कार्याध्यक्ष सचिन पगार, महासंघाचे नाशिक जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोखंडे, नाशिक जिल्ह्याचे उपाध्यक्ष संजय बोरसे, मिलिंद टिळे, रमेश तुंगार, मालेगाव तालुकाध्यक्ष चंद्रकांत वाघ, योगेश रोकडे, सागर बच्छाव, सागर पवार, बिडगर, गवळी, सूर्यवशी व अनेक कलाशिक्षक कार्यक्रमाला उपस्थित होते.




### फलकलेखनातून राज्यगीत, कामगारांचा गौरव

**मंगरूळ :** एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त चांदवड येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित श्री नेमिनाथ जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या दर्शनी फलकावर विद्यालयाचे कलाशिक्षक काशीनाथ अहिरे यांनी जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे कविवर्य राजा नीळकंठ बडे लिखित राज्यगीताचे सुलेखन केले आहे. प्रिय अमुचा महाराष्ट्र देश हा सर्वांसाठीच असल्याने विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य गीताची ओळख आणि राज्य गीताचे वाचन व्हावे, हा प्रमुख उद्देश आहे. तसेच राष्ट्राच्या जडणघडणीत या मायमातीतील शेतकरी, कष्टकरी, कामगारांचे अमूल्य योगदान आहे. यामुळे यांच्या श्रमाला मोल लाभो सर्वदा अन् घामाला मिळो दाम, हातांना मिळो काम आणि या कामाला मिळो सन्मान या संदेशातून महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## निधन वार्ता

### वेणूबाई निकम




**देवळा :** तालुक्यातील मुलूखवाडी येथील वेणूबाई मुरलीधर निकम (८०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दिल्ली पोलिस संजय व पी. के. आप्पा पतसंस्थेचे संचालक निंबा निकम यांच्या त्या मातोश्री होत.

### राधाकिसन बोराडे



**नाशिकरोड :** जेलरोड पंचक येथील रहिवासी व मनपाचे कर्मचारी राधाकिसन वाळूजी बोराडे यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुले, तीन भाऊ व पुतणे असा परिवार आहे.

### विजय नागरे



**नाशिक :** येथील मरीन रेडिओ ऑफिसर विजय सोनू नागरे (६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. औषधी वनस्पतींचा अभ्यास असल्याने त्याचा उपयोग करून त्यांनी अनेक कॅन्सर रुग्ण बरे केले होते. त्यांच्या पश्चात मुलगा पक्षिमित्र उमेश, महेश, सून, नातू असा परिवार आहे.

### प्रदीप जोशी



**सिडको :** भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील निवृत्त वर्ग २ अधिकारी प्रदीप रामकृष्ण जोशी (६३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. पत्रकार मानस जोशी यांचे ते वडील होत.

# पुणेगावचा पाणीप्रश्न पेटला; धरणातून आवर्तन सोडल्याने शेतकरी संतप्त

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**दिंडोरी तालुक्यातील पुणेगाव धरणातून ऐन उन्हाळ्यात अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधून पोलीस बंदोबस्तात सकाळी दहाच्या दरम्यान तिसरे आवर्तन सोडल्यामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली. त्याचवेळी तत्काळ वणी ग्रामपालिका उपसरपंच विलास कड व दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत कड व पांडाणे धनाई माँ ठिबक उपसा सिंचन संस्थेचे पदाधिकारी, सभासद व पुणेगाव धरणावर उपसा सिंचन योजनेवर अवलंबून असलेल्या चौदा गावांतील शेतकरी यांनी एकत्र येऊन आक्रमक पवित्रा घेतला.**





त्यावेळी संबंधित विभागांचे उपस्थित कर्मचारी व शेतकरी यांच्यामध्ये कालव्यात सोडलेले पाणी बंद करण्यावरून शाब्दिक चकमक पहावयास मिळाली. त्यावेळी कार्यकारी अभियंता वैभव भागवत व उपविभागीय अभियंता विश्वास चौधरी यांच्या आदेशान्वये कर्तव्य बजावणे आम्हास भाग पडले, असे उपस्थित कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांना सांगण्यात आले. त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या डोळ्यातील आक्रमकता शिगेला पोहचल्याचे स्पष्ट दिसून येत होते. त्यावेळी कुटे, पाटील, जाडर, चव्हाण व त्यांच्यासह कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले. त्यानंतर लगेचच सभापती प्रशांत कड आणि उपसरपंच विलास कड यांनी प्रातिनिधित्व व शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव कार्यकारी अभियंता वैभव भागवत, उपविभागीय अभियंता विश्वास चौधरी, निवासी नायब तहसीलदार चैताली दराडे यांच्याशी फोन करून संवाद साधला व घटनास्थळी येण्याचे सांगण्यात आले. ज्यावेळी वरील अधिकारी घटनास्थळावर पोहचले त्यावेळी पुणेगाव कालव्यावरील चांदवड, येवल्याच्या लाभार्थींचे यापूर्वीचे दोन नियोजित आवर्तन ( ३०४ द.ल.घ. फूट इतके) त्यांच्या मागणीनुसार पूर्ण दिले गेले आहेत व आम्ही आमच्या केलेल्या मागणीनुसार व त्यावर आकारलेला ( महसूल) कर भरून त्यातून सर्वांनी बचत करून शिल्लक ठेवलेल्या पाण्यातून तुम्ही तिसरे आवर्तन कसे सोडत आहे, अशी एकमुखाने विचारणा करण्यात आली. त्यावेळी यासंदर्भात उर्वरित जिवंत पाणीसाठा सतरा द.ल.घन फूट आहे म्हणून कालव्यावरील लाभार्थी आणि चांदवडचे लोकप्रतिनिधी आ. राहुल आहेर यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पुणेगावचे पाणी सोडण्याबाबत बैठक घेतली. त्यावेळी पाणी सोडण्याचे निर्देष देण्यात आले, असे चौदा गावांतील उपस्थित उपसा सिंचनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना सांगण्यात आले. त्यावर शेतकरी म्हणाले की, आमच्या तालुक्याचा वास्तव इतिहास हा फक्त आमचे लोकप्रतिनिधी तथा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांनाच माहीत असून त्यांनी समक्ष पाहणी करेपर्यंत आम्ही आमच्या हक्काचे एक थेंबही पाणी सोडू देणार नाही व आमचे आरक्षित पाणी कालव्याद्वारे सोडल्यास किंवा तसा प्रयत्न झाल्यास आम्ही शेकडोंच्या संख्येने कालव्यात बसून आंदोलनाची तयारी ठेवू, असे दिं.कृ.उ.बा.स. सभापती प्रशांत कड यांनी ठणकावून सांगितले व कार्यकारी अभियंता वैभव भागवत व उपविभागीय अभियंता विश्वास चौधरी तसेच निवासी नायब तहसीलदार चैताली दराडे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी उपसरपंच विलास कड, सभापती प्रशांत कड, उत्तम जाधव, एस. टी. कड, आनंदा चौधरी, सुनील बर्डे, राकेश थोरात, संजय वाघ, भोजराज चौधरी, चंद्रभान दुगजे, बबन धुळे, संजय उगले, पंडीत बागुल, सोमनाथ चौरे, श्रीराम महाले, प्रवीण पगार, संतोष रहेरे आदी उपस्थित होते.

## जंगलाला आग, शेतकऱ्याचे घर खाक

**वासाळी : वार्ताहर**

इगतपुरी तालुक्यातील पूर्व भागात सह्याद्री पर्वत रांगा असून, महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसुबाई आहे. मात्र, दरवर्षी या डोंगरांना आग लागल्याने हजारो झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे चित्र आहे.

कळसुबाई व त्याच्या बाजूच्या परिसरात मानवी वावर जरी असला तरी मोर, बिबटे यासारखे पक्षी, प्राणी मोठ्या प्रमाणात दिसून येतात. अनेक वेळा या ठिकाणी काही अपप्रवृत्तीच्या लोकांनी उन्हाळ्यात धूम्रपान करत असताना, पेटती सिगारेट टाकून दिल्याने डोंगराला आग लागल्याची घटना यापूर्वी घडली आहे. सध्या उन्हाचा पारा जवळजवळ ५० अंश सेल्सिअसच्या आसपास होत आहे. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात तापमान वाढत आहे.



अशा गंभीर परिस्थितीत गेल्या एक महिन्यापासून अनेक डोंगरांना व जंगलांना आग लागण्याचे सत्र चालू असताना, वासाळी परिसरातील मांडव कडा लोकवस्तीमध्ये राहणारे शेतकरी रामकृष्ण गणपत कचरे हे मजुरीसाठी इतरत्र गेले होते. भर दुपारी जंगलाला आग लागून आग त्यांच्या घराजवळ आली आणि घराला आग लागली व घरातील साहित्य जळून खाक झाले. तसेच शेजारी असलेल्या दुसऱ्या घराला सुद्धा आग लागली. मात्र, वेळेत जाऊन त्यांनी ती आग विझवली. त्यामुळे अधिकचे नुकसान जरी टळले असले तरी मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. काशीनाथ भाऊ कोरडे, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पार्टी यांनी सदर ठिकाणी भेट देऊन, सदर घटनेची पाहणी केली व सदर कुटुंबाला आर्थिक नुकसानभरपाई मिळावी व आग लावणाऱ्या इसमाचा शोध घेऊन त्यांना कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली. सदर प्रसंगी वासाळी ग्रामपंचायतीचे सरपंच सुनीता कोरडे, ग्रामपंचायत सदस्य बाळू कचरे, गणपत कचरे, रामदास कचरे, सीताराम आंबेकर, भोरू धोंगडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## इगतपुरी रत्नगौरव पुरस्कारांचे वितरण

**मुकणे : प्रतिनिधी**

प्रत्येक भारतीय सैनिकाच्या रक्तातच प्रेम, शौर्य, धैर्य आहे. देशाची सेवा करण्यासाठी घर, नातेवाइकांपासून दूर निघून जातो. सामान्य नागरिकांनीसुद्धा आपल्या नित्य व्यवहारात नियम पाळून देश उद्धारणीत हातभार लावू शकतो, तसे व्हावे हीच खरी भारतमातेला वंदना राहील, असे मत माजी सैनिक विजय कातोरे यांनी व्यक्त केले.




प्रहार सैनिक कल्याण संघ, नाशिक व राष्ट्र प्रथम सोशल फाउंडेशन आयोजित इगतपुरी रत्न गौरव पुरस्कार वितरण सोहळा झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन ए. पी. राठोड, माजी सैनिक दिनकर घोटेकर, सुबेदार दादाभाऊ महाजन (कारगिल योद्धा), माजी सौनिक नवनाथ पवार, प्रभास नारायण उपाध्याय (फ्लाइंग ऑफिसर), डॉ. डी. डी. धोंगडे, सुनील जाधव (संचालक संनसन इंडस्ट्रीज), मंगेश निगळ, विनोद सिंग परदेशी (राष्ट्रीय अध्यक्ष प्रहार सैनिक कल्याण संघ) गोरख पालवे (कार्याध्यक्ष प्रहार सैनिक कल्याण संघ), कॅप्टन मोहिते, प्रकाश शिंदे, माजी सैनिक अतुल कुलकर्णी, माजी सैनिक दीपक घुमरे, माजी सैनिक सुभाष गायकर, पैलवान संदीप गायकर, सैनिक गणेश राव, विक्रम वारूंगसे, सोपान मुसळे, माजी सैनिक कांतीलाल गायकर उपस्थित होते. नारायण बाबा जाधव, हरिष चौबे, ऋषी शिंदे, अनिल बरे, सागर कोठूळे, गणेश गुंजाळ संदीप मालुंजकर, गोकुळ धोंगडे, बाळासाहेब सुरुडे, शिवाजी काजळे उपस्थित होते.

संघाने इगतपुरी तालुक्यात या निकषाप्रमाणे काम करणाऱ्याचे निवड समितीने वर्षभर निरीक्षण करून निवड केली आहे. यात वैद्यकीय क्षेत्रात महेंद्र शिरसाट, सजन दुभाषे, आध्यात्मिक धनंजय गतीर, आदर्श शेतकरी गोकुळ जाधव, सामाजिक विनोद नाठे, ज्येष्ठ पत्रकार के. टी. राजोळे, वैशाली गुरव, क्रीडा क्षेत्रासाठी रमेश उबाळे (मुकणे) आशा कार्यकर्ती मंदाबाई ढगे, बंटी पगारे, सुभाष गायकर, ॲड. दिलीप खातळे, पोलिस दलातील योगेश यंदे, सैनिक विलास मांडे, प्रहार सेवक सोपान परदेशी यांचा समावेश आहे. सूत्रसंचालन लोकेश कटारिया यांनी केले.

## फायर ऑडिट न करणाऱ्या हॉटेल, रुग्णालयांवर कारवाई करा

### युवासेनेचे अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील ४१४ हॉटेल्स व २५३ रुग्णालयांनी फायर ऑडिटच केले नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या या हॉटेल्स व रुग्णालयांवर तत्काळ कारवाई करावी, अशी आग्रही मागणी युवासेनेच्या शिष्टमंडळाने महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्याकडे केली. याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास पालिका प्रशासनाविरोधात युवासेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही देण्यात आला.

युवासेना जिल्हाप्रमुख रूपेश पालकर, जिल्हा समन्वयक ॲड. मिलिंद मोरे, युवाशक्ती जनसेनेचे अध्यक्ष आकाश आहेर, ॲड. पराग बिरारी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात म्हटले की, नाशिक महानगरपालिका हद्दीत हॉटेल्स व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, रुग्णालयांनी फायर सेफ्टी ऑडिट करण्यास टाळाटाळ केलेली असल्याने तसेच संबंधित अग्निशमन विभागातील अधिकारी यांनी त्यांना पाठीशी घालून कर्तव्यात कसूर केलेला आहे.



शहरात गेल्या काही दिवसांत महानगरपालिका हद्दीत १० ते १२ ठिकाणी आग लागून व्यवसायाचे मोठे नुकसान झालेले आहे.

फायर ऑडिट न झाल्यानेच आगीच्या घटना घडल्या आहेत. पंचवटी परिसरात मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल रिलॅक्स इन नामक हॉटेल व लॉजिंग असून, सदर हॉटेल व्यावसायिकाने मागील १० वर्षांपासून फायर सेफ्टी ऑडिट केलेले नाही. यात संपूर्ण पाठबळ अग्निशमन विभागाच्या वरिष्ठ ते कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. आम्ही याप्रकरणी १७ एप्रिल रोजी मुख्य अग्निशमन अधिकारी यांना तसे निवेदनही दिले.

मात्र अग्निशमन विभागाने याप्रकरणी कुठलीही कारवाई केली नाही. शहरात अनेक हॉटेल व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक यांना अग्निशमन अधिकारी पाठीशी घालत असल्याचा गंभीर आरोप युवासेनेने करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली.

## एनडीएसटी सोसायटीला ११ कोटी ९१ लाख विक्रमी नफा : देवरे

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतरांची अर्थवाहिनी असलेली नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स ॲण्ड नॉनटीचिंग एम्प्लॉई को-ऑप. क्रेडिट सोसायटीला (एनडीएसटी ॲण्ड एनटी) ११ कोटी ९१ लाख विक्रमी नफा झाला असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष शांताराम देवरे, कार्यवाह निंबा कापडणीस, उपाध्यक्षा भारती पाटील यांनी दिली.

नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स ॲण्ड नॉनटीचिंग एम्प्लॉई को-ऑप. क्रेडिट सोसायटीची स्थापना होऊन ६३ वर्षे पूर्ण झाले आहे. पतसंस्थेचे भागभांडवल १६७ कोटी २९ लाख असून, सभासद ठेवी २४६ कोटी ४४ लाख आहे. संस्थेने कर्ज वाटप मर्यादा २५ लाख ८० हजार केलेली आहे. संस्थेने सभासदांकरिता अपघाती विमा संरक्षण २५ लाख दिलेले आहे. अनेक दिवंगत सभासदांना त्याचा लाभ झालेला आहे. ७.५० टक्के व्याजाने सभासदांना कर्ज देणारी ही जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे. या पतसंस्थेचा नफा ११ कोटी ९१ लाख रुपये झाला आहे, अशी माहिती पतसंस्थेचे कार्यवाह निंबा कापडणीस यांनी दिली. सोसायटीला प्रगतीपथावर नेण्यासाठी अध्यक्ष शांताराम देवरे, कार्यवाह निंबा कापडणीस, उपाध्यक्षा भारती पाटील तसेच संचालक अरुण पवार, मोहन चकोर, बाळासाहेब ढोबळे, संजय देसले, दीपक व्याळीज, दत्तात्रेय आदिक, ज्ञानेश्वर ठाकरे, मंगेश सूर्यवंशी, संजय वाघ, संजय पाटील, अनिल देवरे यांनी सांगितले.



## वेळापूर येथे लोकअदालत व विधी साक्षरता शिबिर

**लासलगाव : वार्ताहर**

सध्या देशात सव्वाचार कोटी प्रकरणे न्यायप्रक्रियेत प्रलंबित आहेत. त्यातील बऱ्याच खटल्यांचे स्वरूप किरकोळ असून, ते परस्पर संवाद व सामोपचाराने सोडवता येण्याजोगे आहेत. अशा वादांची सोडवणूक लोकअदालतीच्या माध्यमातून झाल्यास न्यायालयांचा ताण कमी होतो आणि सामान्य नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास टाळता येतो, असे मत जिल्हा सत्र न्यायाधीश ए. व्ही. गुजराथी यांनी व्यक्त केले.

वेळापूर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, निफाड तालुका विधी सेवा समिती, निफाड वकील संघ व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने फिरत्या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मशाल रॅलीने झाली. 'पोखरा योजना' आणि विधी साक्षरतेबाबत रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. दिवाणी न्यायाधीश एस. पी. देशपांडे यांनी महिलांवरील अत्याचार, खोट्या तक्रारी आणि मानसिक-शारीरिक छळ यावर मार्गदर्शन करत महिलांच्या कायद्याविषयक हक्कांबाबत जागरूकता निर्माण केली. ॲड. दिलीप शिंदे यांनी धनादेश कायदा व त्यातील तरतुदींवर माहिती दिली. कृषी विभागाचे मंडळ अधिकारी राहुल धनगर यांनी 'नानाजी देशमुख पोखरा योजना' अंतर्गत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या लाभांविषयी माहिती दिली.

यावेळी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ६५ दिवसांत घरकुल पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अरुण पालवे, विजय पालवे, सोपान विशे, शांताराम कुटे, संतोष शिंदे आणि संतोष घुगे यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमात 'सव्यसाची गुरुकुलम' आणि 'प्रतापशिव संस्था' यांनी वतीने मर्दानी खेळांचे सादरीकरण केले. लासलगावचे स.पो. नि. भास्करराव शिंदे, वकील संघाचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कृषी अधिकारी, शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक आणि स्वागत ॲड. रामनाथ शिंदे यांनी सूत्रसंचालन ॲड. केशव शिंदे यांनी तर समारोप विशाल पालवे यांनी केला.

## धानोरे येथील मातोश्री फार्मसी महाविद्यालयाला मिळाले एनबीए मानांकन

**येवला : प्रतिनिधी**

भौतिक सुविधा, गुणवत्ता, अध्ययन, अध्यापनाचा दर्जा आणि उत्कृष्ट निकालाची परंपरा या सर्व बाबींची दखल घेऊन येवला तालुक्यातील धानोरे येथील मातोश्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला राष्ट्रीय मानांकन मंडळ नवी दिल्ली यांनी एनबीए मानांकित केले आहे.

सदरचे डी.फार्मसी २०१८ पासून सुरू असून, डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण शिक्षण देऊन महाविद्यालयाने आपली गुणवत्ता राखून ठेवली आहे. अतिशय कमी कालावधीत नावाला येणारे ग्रामीण भागातील पहिले डिप्लोमा फार्मसी महाविद्यालय ठरले आहे. राष्ट्रीय मानांकन मंडळाकडून झालेल्या तीन दिवसीय परीक्षणात महाविद्यालयात घेणारे विविध कार्यक्रम, शैक्षणिक सुविधा, परिपूर्ण शिक्षक व विविध नामांकित कंपन्यांत होणारी विद्यार्थ्यांची प्लेसमेंट याची तपासणी केली. मागील तीन वर्षांपासून महाविद्यालयाला राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे व्हेरी गुड मानांकन मिळत असून, याचा फायदा एनबीएसाठी झाला असल्याचे विभागप्रमुख डॉ. पवन आव्हाड यांनी सांगितले.



**येवला तालुक्यातील धानोरे येथील मातोश्री फार्मसी महाविद्यालयाला एनबीए मानांकन मिळाल्याबद्दल पवन आव्हाड यांचा सत्कार करताना प्राचार्य गीतेश गुजराथी व इतर.**

> एन.बी.ए. मानांकन मिळवणारे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पहिले डिप्लोमा फार्मसी महाविद्यालय होण्याचा मान मिळाला, याचा आनंद होत आहे. कमी कालावधीत मोठे यश मिळाले असून, विद्यार्थ्यांना पुढे घेऊन जाण्यासाठी सतत प्रयत्नशील राहू.
>
> – **डॉ. पवन आव्हाड,** विभागप्रमुख

विविध सुविधांसोबतच अध्यक्ष आमदार किशोर दराडे, संचालक रूपेश दराडे, शिक्षक संकेत दशपुते, कल्याणी सोनावणे, राहुल कांबळे, विजयश्री कटारे, ज्योत्स्ना परदेशी, प्रतीक्षा कुवर, प्रसाद साताळकर, अमोल येवले, सूरज गायकवाड, बुद्धघोष खंडीझोड, कल्पेश वड्डुकते व इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

> संस्थेने दिलेल्या सुविधा, शिक्षकांची मेहनत व विद्यार्थ्यांचा निकाल या त्रिसूत्रीचा मानांकनात मोठा फायदा झाला असून, यातून फार्मसीमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल.
>
> **–रूपेश दराडे,** संचालक, मातोश्री शिक्षण संस्था

## महत्त्वाचे

### चार-पाच नंबर साठवण तलाव जोडणी काम जलद गतीने पूर्ण करा : आ. काळे

**वावी :** कोपरगाव शहरातील नागरीकांना नियमित पाणी मिळावे यासाठी सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम तातडीने पूर्ण करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व सबंधित ठेकेदारास दिल्या आहे.



आ. आशुतोष काळे यांच्या भगीरथ प्रयत्नातून पाच नंबर साठवण तलावाची निर्मिती झाली. त्यामुळे कोपरगाव शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एक ते चार साठवण तलावांचा भार हलका होवून नागरीकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु नागरीकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी आ. आशुतोष काळे यांचा सातत्याने खटाटोप सुरु असून त्या खटाटोपातून चार व पाच नंबर साठवण तलाव जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचा आ. आशुतोष काळे यांनी नुकताच आढावा घेत माहिती घेतली. ज्याप्रमाणे पाच नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत आ. आशुतोष काळे या साठवण तलावाच्या कामावर बारीक लक्ष ठेवून होते. त्याप्रमाणेच सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीच्या कामावर ते बारीक लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून सुरु असलेल्या कामाबाबत माहिती घेत लवकरात लवकर काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गुरुवार (दि.०१) पासून गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या आवर्तनातून सर्वच्या सर्व एक ते पाच साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी सुरु असलेले काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. जेणेकरून कोपरगाव शहरातील नागरिकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा करण्यासाठी चार नं.साठवण तलावातून पाच नं.साठवण तलावात व पाच नं.साठवण तलावातून चार नंबर साठवण तलावात पाणी उचलणे सहज शक्य होणार आहे.

### पाथरेत बालवारकरी संस्कार शिबिर

**सिन्नर :** तालुक्यातील पाथरे येथे महंत महामंडलेश्वर स्वामी काशीकानंद महाराज यांचे कृपाशीर्वादाने, ह.भ.प. चंद्रकांत महाराज नरोडे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ५ मे ते २० मे दरम्यान बालवारकरी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात ह.भ.प. रवि महाराज गव्हाणे, समाधान महाराज आभाळे, रेवणनाथ महाराज तनपुरे, रमेश महाराज क्षीरसागर हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. या शिबिरात पखवाज, तबला हार्मो नियम, टाळ, हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, श्रीमद्भगवद्गीता, हनुमान चालीसा, वारकरी सांप्रदायिक पावल्या यांचे शिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना एक वेळचा नाष्टा, दोन वेळा जेवण, राहण्याची उत्तम व्यवस्था, पिण्यासाठी फिल्टर पाणी आदी व्यवस्था गावातील समाजसेवक तथा साई लक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष मच्छिंद्र चिने, श्रीनाथ कृपा दूध संकलन केंद्राचे संचालक मच्छिंद्र गव्हाणे, गोविंद नरोडे, नीलेश नरोडे यांनी केले आहे. शिबिराची सांगता काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. पंचक्रोशीतील सर्व विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पाथरे येथील सर्व भजनी मंडळाचे सहकार्य शिबिरास लाभणार आहे.



### मंगल कलश रथयात्रेचे स्वागत

**वावी :** राज्यात प्रथमच राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संपूर्ण राज्यात संयुक्त महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्ष स्थापना दिनानिमित्ताने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आल्या असून, मुंबई येथे १ मे रोजी गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. ही महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा शिर्डी-कोपरगाव येथे आली असता आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव व शिर्डी मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत यात्रेचे स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रविंद्र पाटील, विद्यार्थी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, मा.आ.लहु कानडे, शिर्डी लोकसभा कार्याध्यक्ष अशोक कानडे, युवक जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, बाबासाहेब कोते, कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, शहराध्यक्ष सुनील गंगुले, युवक अध्यक्ष नवाज कुरेशी आदी उपस्थित होते.

### पालकांनी मुलांशी संवाद वाढवावा : डॉ. सौदागर

**नाशिक :** हल्ली मुले खूप चंचल झाली असून, विक्षिप्तपणा वाढला आहे. पालकांशी व समाजाशी हिंसक वर्तन वाढले आहे. पालक मुलांना वेळ देत नाहीत आणि मोबाइलचा वाढता वापर हीच याची कारणे आहेत. त्यासाठी पालकांनी मुलांशी संवाद वाढविणे गरजेचे आहे. मुलांना घेऊन निसर्गाच्या सान्निध्यात जावे व त्यांना निसर्गाशी एकरूप होऊ द्यावे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. ऋषिनीत सौदागर यांनी केले. मविप्रच्या गंगापूर रोडवरील उदोजी होरायझन स्कूलमध्ये 'इवलेसे रोप लावियेले द्वारी' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध सिनेअभिनेते चिन्मय उदगीरकर तसेच, नाशिक शहर मविप्र संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर डॉ. ऋषिनित सौदागर व चिन्मय उदगीरकर यांचा सत्कार करण्यात आला.

### जातीनिहाय जनगणनेचे स्वागत : खा. वाजे

**नाशिक :** जातनिहाय जनगणनेमुळे समाजातील वेगवेगळ्या जातींची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती स्पष्ट होईल. त्यामुळे सरकारने कोणत्या घटकांना अधिक मदत आणि विशेष योजनांची गरज आहे, हे समजू शकेल. तसेच, जातनिहाय जनगणना केल्याने समाजातील वेगवेगळ्या जातींच्या समस्या आणि गरजा स्पष्ट होतील. त्यामुळे सरकार योग्य उपाययोजना करून सामाजिक न्यायासाठी काम करू शकेल. आज महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी राज्यात जे काही जातीय तणाव निर्माण झाले त्याला देखील उत्तर म्हणजे ही जातिनिहाय जनगणना ठरेल आणि प्रत्येकाला त्याच्या परिस्थितीनुसार सामाजिक, आर्थिक योजनांच्या लाभासोबतच शैक्षणिक व रोजगाराच्या संधी निर्माण करून देता येतील. मात्र, बिहार राज्यात निवडणुका सुरू आहेत, सत्ताधारी पक्षाने अश्या निर्णयाचे अचूक टायमिंग साधने काही गैर नाहीये. परंतु, त्या निवडणुका झाल्यानंतरही या निर्णयावर सरकारने ठाम राहावे आणि आगामी जनगणनेत जातीनिहाय गणना करावी, असे खा. राजाभाऊ वाजे यांनी म्हटले आहे.

# सिन्नरच्या अभिजित भालेरावची विश्वविक्रमासाठी काश्मीर ते कन्याकुमारी धाव

## ३० दिवसांचे लक्ष्य, बुधवारी काश्मीरपासून धावण्यास झाला प्रारंभ

**सिन्नर : भरत घोटेकर**

**येथील नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कुलकर्णी विद्यालयातील शिक्षक व धावपटू अभिजित विष्णू भालेराव यांनी काश्मीर ते कन्याकुमारी हे अंतर ३० दिवसांत धावून विश्वविक्रम करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र दिनाच्या आदल्या दिवशी बुधवारी (दि.३०) काश्मीरच्या लाल चौकातून त्यांनी धावण्यास प्रारंभ केला आहे. त्यांच्या विक्रमाकडे आता लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे त्याच्या विश्वविक्रमासाठी शासनाने सहकार्य केले असून, जोखमीच्या भागातून धावताना लष्कराचे संरक्षणही पुरवण्यात आले आहे.**

भालेराव यांनी बुधवारी सकाळी काश्मीर येथून या मोहिमेला सुरुवात केली. अनेक वर्षांपासून धावपटू म्हणून त्यांनी विविध स्पर्धांत यश मिळविले आहे. गतवर्षीच्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये त्यांनी २१.६५ सेकंदांत २०० मीटर अंतर धावून प्रथम क्रमांक मिळिवला होता. धावण्याच्या आवडीतून काश्मीर ते कन्याकुमारी धावून (सोल रन)हे अंतर विक्रमी ३० दिवसांच्या वेळेत पूर्ण करण्याचा चंगही बांधला आहे. यासाठी भालेराव त्यांनी गेल्या काही दिवसांपासून सरावात सातत्य ठेवले होते.

दरम्यान, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, संजीवनी फाउंडेशनने भालेराव यांच्यामागे आर्थिक पाठबळ उभे केले आहे. सामाजिक क्षेत्रातून संस्था व नागरिकही भालेराव यांचा विश्वविक्रम होण्यासाठी पाठीशी उभ्या राहिल्या आहेत.



**काश्मीर येथून बुधवारी सकाळी धावपटू अभिजित भालेराव यांनी धावण्यास प्रारंभ केला आहे.**

**४ तासांची झोप अन् २० तास धावणार**

२४ तासांपैकी केवळ ४ तास झोप आणि दररोज २० तास धावण्याचे उद्दिष्ट अभिजित भालेराव यांनी ठेवले आहे. त्यामुळे त्यातून दररोज किमान १४० किलोमीटर अंतर पार करण्याचे ध्येय ठेवले आहे. याच वेगाने सलग ३० दिवस धावत राहिल्यास विश्वविक्रमाला तो गवसणी घालणार आहे.

**व्यायामाला प्रोत्साहन देण्यासाठी जागृती**

युवकांमध्ये आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे, धावण्यासारख्या नैसर्गिक व्यायामाला प्रोत्साहन देण्यासाठी जनजागृती करणार आहे.

– **अभिजित भालेराव**, धावपटू

तामसवाडी येथील वैभव शिंदे यांनी चार महिन्यांपूर्वीच ४४ दिवसांत काश्मीर ते कन्याकुमारी हे ४११२ किलोमीटर अंतर धावून पूर्ण केले होते. त्यांच्या विक्रमाची नोंद गिनीज बुकात झाली आहे. मात्र अभिजित भालेराव यांनी हे रेकॉर्ड मोडून अवघ्या ३० दिवसांत हे अंतर पार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# विमानतळांना जोडणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करा

## कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुदेश खुळे यांची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

मागील कुंभमेळा डोळ्यासमोर ठेवून ओझर व शिर्डी या दोन विमानतळांना जोडणाऱ्या राज्यमार्ग ३५ चे रुंदीकरण करण्यात आले होते. यावेळी मात्र महत्वाच्या असणाऱ्या या रस्त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या रस्त्याचा समावेश आराखड्यात करून त्याचे रुंदीकरण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावे, अशी मागणी वडांगळी येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रीन व्हिजन फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष सुदेश खुळे यांनी केली आहे.

मागील कुंभमेळ्याच्या निमित्ताने नामदार माणिकराव कोकाटे व निफाडचे तत्कालीन आमदार अनिल कदम यांच्या प्रयत्नातून ओझर विमानतळ ते शिर्डी विमानतळ यांना जोडणाऱ्या या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले होते. ओझर - सायखेडा - वडांगळी - पंचाळे व वावी मार्गे पुढे सायाळे मार्गे शिर्डी विमानतळ या रस्त्याने जोडण्यात आले. त्यामुळे या रस्त्याने वाहतूक वाढली. शिर्डीहून सप्तशृंगगडावर जाणाऱ्या भाविकांना हा रस्ता जवळचा ठरला. वडांगळी - सायखेडा मार्गे थेट नाशिकला पोहचणे सोपे झाले आहे. या रस्त्याने तर थेट तपोवनात जाता येते. सिन्नर, नाशिक रोड व नाशिक शहरातील वाहतूक टाळणे या रस्त्यामुळे शक्य होत आहे.

विदर्भ व मराठवाडा भागातील भाविकांना वडांगळी येथील बंजारा समाजाचे दैवत सतीमाता सामतदादा देवस्थानला येण्यासाठी हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरत आहे. निफाड, पिंपळगाव येथे जाण्यासही हा रस्ता सोयीचा आहे. हिवरगाव व सायखेडा येथील शेतमाल मार्केट व अन्य बाबींमुळे हा रस्ता वर्दळीचा झाला आहे. त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे. दोन खासदार, एक मंत्री व एक आमदार यांच्या मतदारसंघातील हा महत्वपूर्ण रस्ता आहे. नाशिक व दिंडोरी अशा दोन्ही मतदारसंघातून हा रस्ता जात असल्याने खासदार राजाभाऊ वाजे व भास्कर भगरे त्याचप्रमाणे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, निफाडचे आमदार दिलीपराव बनकर यांनी दोन विमानतळांना जोडणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी सुदेश खुळे यांनी केली आहे.

**यासाठी महामार्गाचे रुंदीकरण आवश्यक**

सप्तशृंगगडाहून शिर्डीला जाणारे भाविक नाशिक शहरातून जातात, या रस्त्याचे रुंदीकरण झाल्यास ते थेट ओझर किंवा निफाड मार्गे वडांगळी – वावी असे शिर्डीला जातील. शिर्डीहून – सप्तशृंगगड अथवा सापुतारा मार्गे गुजरातला जाणाऱ्या प्रवाशांनाही हा रस्ता सोयीचा ठरणार आहे. सध्या दुपदरी असणाऱ्या या रस्त्याची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. पंचाळे ते मिठसागरेदरम्यान पूरकालव्यांमुळे अनेक ठिकाणी हा रस्ता खराब झाला आहे.



# म्हसरूळचे ग्रामदैवत महालक्ष्मी देवीचा यात्रोत्सव उत्साहात

**पंचवटी : वार्ताहर**

म्हसरूळ येथील ग्रामदैवत महालक्ष्मी देवीचा यात्रोत्सव उत्साहात झाला. बुधवारी ता.३० रोजी दिवसभर धार्मिक कार्यक्रमानंतर सायंकाळी बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी शेकडो ग्रामस्थांनी हजेरी लावली . यात्रेत विविध खेळणी व वस्तूंच्या स्टॉलवरही मोठी गर्दी उसळली होती. दरवर्षी वैशाख शुद्ध तृतीयेला म्हणजेच अक्षयतृतीयेला अनेक वर्षांपासून महालक्ष्मी मातेची यात्रा भरते. सकाळी महालक्ष्मी मंदिरात महाभिषेक करण्यात आला. गावातील मंदिरांतही विधीवत पूजा झाली. दिवसभर होमहवन झाले. दरवर्षीप्रमाणे गोविंद बाबा झावरीराम यांना बारागाड्या ओढण्याचा गणेशाचा मान मिळाला. त्यांची हिरवी नऊवारी नेसून डोक्यावर मुकुट, नाकात नथ, दोन्ही हातांना बाजूबंद, पायात पैंजण आणि हातात कमळाचे फूल या पेहरावात सायंकाळी साडेपाचच्या दरम्यान पारंपरिक वाद्यांनी परिसरात मिरवणूक काढली. साडेसहाच्या सुमारास त्यांचे मंदिरात आगमन झाले. देवीला नमस्कार करण्यात आला. गणेशा व ग्रामस्थांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली.



# नाशिक प्रशिक्षण केंद्रातर्फे जलसंपदा व्यवस्थापन कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जलसंपदा विभागातर्फे दि १५ ते ३० एप्रिल दरम्यान 'जलसंपदा व्यवस्थान कृती पंधरवाडा २०२५' हा राज्याच्या विविध भागात उत्साहात होत आहे. हेच औचित्य साधून नाशिक प्रशिक्षण केंद्रातर्फे जलसंपदा व्यवस्थापन कार्यक्रम झाला.

महानिर्मितीचे संचालक संचलन संजय मारूडकर यांच्या संकल्पनेतून आणि मुख्य अभियंता प्रशिक्षण सुनील सोनपेठकर यांच्या सखोल मार्गदर्शनातून नाशिक प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथ दि २५ रोजी वॉटर मॅनेजमेंट ॲण्ड इस्टेट मॅनेजमेंट या एकदिवसीय रिफ्रेशर कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आर. सी. दशोरे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, स्थापत्य महाजेनको यांनी प्रशिक्षणार्थींशी सुसंवाद साधत अतिशय अभ्यासपूर्ण आणि पाण्याची अर्थकारणाशी सांगड घालत मोलाचे मार्गदर्शन केले.

वीजनिर्मिती केंद्रातील पाण्याच्या व्यवस्थापनाचे महत्त्व, महाराष्ट्र शासनाची वॉटर पॉलिसी आणि पाण्याचे ऑडिट, पाणी जतन करणे, पुनर्वापराचे महत्त्व, इरिगेशन अग्रिमेंट, रिक्सन्सिलेशन, इस्टेट मॅनेजमेंट इत्यादी विषयावर प्रेझेंटेशन, चित्रफिती याद्वारे अभ्यासपूर्ण विवेचन केले. महाजेनको तसेच वरील विषयातील प्रदीर्घ अनुभवातून संकलित केलेल्या अनेक केस स्टडीजबद्दल चर्चा करून अनुभवी प्रशिक्षणार्थींबरोबर ऊहापोह केला. नाशिक प्रशिक्षण केंद्राचे अधीक्षक अभियंता विजय काळे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींचे स्वागत करून प्रास्ताविकात या रिफ्रेशर कार्यशाळेच्या आयोजनाचे महत्त्व नमूद केले. या कार्यक्रमासाठी कार्यकारी अभियंता प्रवीण काळोखे, जयंत देवरे प्रशासन, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रवीण काहाळे, उपकार्यकारी अभियंता पंडित तसेच नाशिक प्रशिक्षण केंद्रातले अधिकारी, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण कहाळे यांनी केले. तसेच नाशिक, कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ, मुख्यालय मुंबई येथून सिव्हिल, ऑपरेशन, सी. ॲन्ड. आय., आयएसओ या विभागातील अभियंत्यांनी सहभाग नोंदविला.

# डुबेरेत नेत्रतपासणी शिबिराचा १५८ रुग्णांनी घेतला लाभ

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने डुबेरे येथील सटूआई माता सभागृहामध्ये मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये १५८ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. दरम्यान, गरज असलेल्या रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्राच्या वतीने सिन्नर तालुका मोतीबिंदू मुक्त अभियान राबविण्यात आले आहेत.

अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे होते. व्यासपीठावर उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने, सरपंच रामनाथ पावसे, माजी सरपंच शरद माळी, शालेय समितीचे सदस्य भाऊ रखमा वारुंगसे, काशिनाथ वाजे, अशोकराव गवळी, अरुण वारुंगसे, विजय वाजे, पोलीस पाटील रामदास वारुंगसे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक उल्हास पवार आदी उपस्थित होते. डॉ. पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या पथकातील डॉ. सुमित चौधरी, डॉ. स्नेहा काळे, डॉ.लौकीक पेशट्टीवार यांनी तपासणी केली. त्यांना समन्वयक रवि सोनवणे, महेंद्र घोटेकर ,सदस्य सहकारी म्हणून मनीषा सोनवणे, निकिता कापडणीस, उत्तम साठे यांनी सहकार्य केले. आवश्यक रुग्णांना मोफत औषध उपचार देखील करण्यात आला. बिनटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येणार आहे. सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी तर आभार वृषाली घुमरे यांनी मानले. शिबिर यशस्वी होण्यासाठी पर्यवेक्षक पवार, सोमनाथ पगार, सोमनाथ गिरी, डी. ए. रबडे, सुनिल ससाणे, रवी गोजरे, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा बसवेश्वरांनी लोकशाहीची मूल्ये रुजवली

## प्रा. जावेद शेख यांचे बसवेश्वर यांच्या जीवनावर व्याख्यान

**सिन्नर : प्रतिनिधी**

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक परिवर्तन करून समाजात संसदीय लोकशाहीची मूल्ये रुजविली, असे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रा. जावेद शेख यांनी केले. येथील विजयनगर मधील महात्मा बसवेश्वर चौकात महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्ताने महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सिन्नर तालुका वीरशैव लिंगायत समाज, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सिन्नर तसेच महामित्र परिवारातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. शेख यांनी महात्मा बसवेश्वरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांचा पुरस्कार करून समाजातील वर्णभेद, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातीभेद, स्त्री-पुरुष असमानता, कर्मकांड नाहीसे करण्यासाठी लढा दिला. मानवता हाच खरा धर्म आहे. दया धर्माचे मूळ आहे अशी शिकवण दिली.

संविधान लिहिण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महात्मा बसवेश्वर यांच्याकडून मिळाल्याचे प्रा. शेख यांनी सांगितले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. श्यामसुंदर झळके यांनी प्रास्ताविकात महात्मा बसवेश्वरांनी श्रम हीच पूजा असून श्रम प्रतिष्ठेला महत्व दिले. त्यांचे कार्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले. तर महामित्र दत्ता वायचळे यांनी आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती असल्याने त्यांना अभिवादन करून, त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तसेच महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची आज गरज असून, समाजाच्या उद्धारासाठी या महापुरुषांनी आपले जीवन समर्पित केले, असे सांगितले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तालुकाध्यक्ष हरिभाऊ तांबे यांनी महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात आंतरजातीय विवाह करून मोठी क्रांती केली. महिलांना समाजात सन्मान तसेच दुर्लक्षित, शोषित घटकांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी केले, असे प्रतिपादन केले. प्रा. अरुण पोटे यांनी महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महारांच्या कार्याबद्दल माहिती दिली. यावेळी अंनिसचे कार्याध्यक्ष सुकदेव वाघ, पदाधिकारी बापू चतुर, बस्तीराम कुंदे, डॉ. जी. एल. पवार, भाऊसाहेब पवार, मुकुंद वाळेकर, राहुल घोंगाणे, श्रीनिवास, आष्टुरे, श्लोक आष्टुरे, माणिक भंडारी, विजय गवंडर, शिवसांब बोरीकर, सुनील कुऱ्हे आदी उपस्थित होते. अविनाश आष्टुरे यांनी आभार मानले.





# धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घ्यावी : पवार

**नाशिक :** आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकावर कामाचा तणाव असतो. अशावेळी आरोग्य सर्वात महत्त्वाचे असून, सर्वप्रथम आपण आरोग्य सांभाळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मालेगांव महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री पवार यांनी केले. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने जागतिक मलेरिया दिन साजरा करण्यात असता यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जयश्री पवार बोलत होत्या. कार्यक्रमास प्रमुख म्हणून डॉ. मनीष पवार, डॉ. राजेंद्र त्र्यंबके उपस्थित होते. जयश्री पवार यांनी संसर्गजन्य आजाराबाबत माहिती देतानाच म्हटले की, स्वतःच्या चांगल्या आरोग्यासाठी घरातून निघताना जेवण करून निघावे. भरपूर पाणी प्यावे, निर्व्यसनी रहावे. स्पर्शातून, हवेद्वारे, श्वासातून होणारे आजार, लसीकरण, डेंग्यू, चिकन गुनीयासह बाळाचे आरोग्य याबाबत सखोल माहिती दिली. डॉ. मनीष पवार यांनी डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील आपण दुवा असून, छोट्या छोट्या गोष्टीतून रुग्णाचे प्राण वाचू शकतो असे सांगितले. ग्रामीण भागात अजूनही काही गैरसमज असल्याचे सांगत रुग्णावर करण्यात येणार्या जीव वाचवणाऱ्या प्राथमिक उपचारांबाबत माहिती दिली.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी


इगतपुरी रत्नगौरव पुरस्कारांचे वितरण
पान ६


पुणेगावचा पाणीप्रश्न पेटला; आवर्तन सोडल्याने शेतकरी संतप्त
पान ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, गुरुवार, दि. १ मे २०२५

## महत्त्वाचे



### अशोका मार्ग परिसरात परशुराम जयंती

**नाशिक :** भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त मंगळवारी (दि. २९) अशोका मार्ग परिसरामध्ये परशुराम जयंती साजरी करण्यात आली. भगवान श्री परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन माजी महापौर सतीश कुलकर्णी व महासंघाचे अध्यक्ष भगवंत पाठक यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी द्वारका विभागप्रमुख तुषार कुलकर्णी, रमेश दिवाकर, गुंटूरकर, संजय जोशी, अभय मोराणकर, जयंत डांगे, संतोष पाठक, सकळकर, शुभम कुलकर्णी आदींनी प्रयत्न केले.

### कवी पांडुरंग कुलकर्णी यांचा सत्कार

**नाशिक :** मनस्पर्शी साहित्य कला, क्रीडा प्रतिष्ठानचा मानाचा



राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट स्तंभ लेखक पुरस्कार नाशिकरोड नाशिक येथील साहित्यिक, कवी पांडुरंग वसंत कुलकर्णी यांना रविवारी राज्यस्तरीय साहित्य संमेलनात गझलकार ए. के.शेख यांच्या अध्यक्षतेखाली गझलकार डॉ. मनोज वराडे यांच्या हस्ते कांदिवली, मुंबई येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. त्यांच्या या सन्मानाबद्दल मित्रपरिवार, साहित्यिक, कवी, लेखक यांनी अभिनंदन केले. ते साहित्य कला व्यक्तित्व विकास मंच या नोंदणीकृत सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. तसेच जय श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचेही संस्थापक अध्यक्ष आहेत. त्यांचे समाजसेवक तुळशीदास इंगळे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

### 'गोदावरीतील पाणवेली काढाव्यात'

नाशिक : गोदावरी नदीला नुकतेच एक हजार क्यूसेक पाणी सोडण्यात आले असून, त्या पाण्याबरोबर मोठ्या प्रमाणात पाणवेली वाहत आल्या आहेत. या पाणवेली किनाऱ्यालगत साठल्या असून, त्यामुळे जीवितहानी होण्याचा धोका असल्याने पाणवेली त्वरित काढाव्यात, अशी नागरिकांसह पर्यटकांची मागणी आहे.

# नाशिककरांचा खडतर प्रवास होणार सुखकर!

## शहरात १५ मेनंतर रस्ते दुरुस्तीला प्रारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

**रस्ते खोदाईमुळे नाशिककरांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असून, या रस्ते खोदाईचे शुक्लकाष्ट संपणार कधी? असा सवाल नागरिकांकडून वारंवार केला जातो. शहरात १५ मेनंतर रस्ते दुरुस्तीला सुरुवात होणार असून, १५ जूनपर्यंत सर्व रस्त्यांची दुरुस्ती करून शहर खड्डेमुक्त केले जाणार असल्याचा दावा महापालिकेच्या बांधकाम विभागाने केला आहे. दरम्यान, १५ मेनंतर रस्ते खोदताना कोणी आढ्ळून आल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा इशारा पालिकेने दिला आहे.**

> एमएनजीएल, स्मार्ट सिटीला शहरात कामांसाठी खड्डे खोदण्यास १५ मेपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतरही रस्ते खोदल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर कारवाई करण्यात करण्यात येईल.
> **-संजय अग्रवाल,** शहर अभियंता, मनपा

महानगर नॅचरल गॅस लि. कंपनीकडून गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी पुन्हा रस्त्याच्या दुतर्फा खड्डे खोदण्यास परवानगी देण्यात आली आहे. स्मार्टसिटीकडून सीसीटीव्ही बसविण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जाणार आहे. तीन ते चार वर्षांपासून महानगर गॅस लिमिटेड कंपनीकडून (एमएनजीएल) गॅस पाइपलाइनसाठी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदले जात आहेत.


संग्रहित छायाचित्र

सद्यस्थितीत एमएनजीएल कंपनीचे अवघे २० ते ३० टक्केच काम झाले असून, उर्वरित कामासाठी मुख्य रस्त्यांसह कॉलनीअंतर्गत रस्ते खोदले जाणार आहेत. पावसाळ्यापूर्वी शहर खड्डेमुक्त करण्यासाठी १५ मे ते १५ जून या कालावधीत खड्डे बुजविण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

शहरात सध्या महानगर नॅचरल गॅस लि. कंपनीकडून गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी पुन्हा रस्त्याच्या दुतर्फा खड्डे खोदण्यास परवानगी देण्यात आली आहे. १५ मेपर्यंत त्यांना काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे.

शहरातील खड्डे जैसे थे असताना त्यात आणखी भर पडत आहे. दरम्यान, घरोघरी गॅस कनेक्शनचे स्वप्न दाखवत एमएनजीएल कंपनीकडून पाइपलाइन टाकण्यासाठी शहरात ठिकठिकाणी रस्ते खोदण्याचे काम जोरात सुरू आहे. यासाठी अगदी सुस्थितीत असलेले पक्के कॉंक्रीटचे रस्तेही फोडले गेले आहेत. रस्त्यांचे खोदकाम करताना सर्व नियम धाब्यावर बसवत कटरऐवजी पोकलॅण्डने रस्ता तोडला जातो आहे. त्यामुळे या अनाकलनीय कामाच्या पद्धतीबाबत नागरिकही आश्चर्य व्यक्त करत आहेत.

# निफाडला बालरोगतज्ज्ञ डॉ. राठी यांच्या लिलावती हॉस्पिटलचे उद्घाटन



**निफाड : विशेष प्रतिनिधी**

> निफाडला बालरुग्णालय म्हणून कार्यरत असणाऱ्या लिलावती हॉस्पिटलचे स्थलांतर झाले असून, आता नव्याने उगाव रोडलगत हे हास्पिटल सुरु झाले आहे. निफाडच्या जनतेने सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने राठी कुटुंब कायमच सर्वांच्या रुग्णांत राहू इच्छित आहे.
> **डॉ. भूषण राठी,** संचालक, लिलावती हॉस्पिटल, निफाड

निफाड येथे उगाव रोडलगत असलेल्या बालरुग्णालय लिलावती हॉस्पिटलचे उद्घाटन अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर राजाभाऊ राठी यांच्या मातोश्री लिलावती राठी यांच्या हस्ते करण्यात आले. या कौटुंबिक सोहळ्यानंतर अनेक मान्यवरांनी हॉस्पिटलला भेट देऊन संचालक डॉ. भूषण राठी यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी निफाड अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन राजाभाऊ राठी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी निफाडचे आमदार दिलीप बनकर, मविप्र समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, निफाडचे प्रथम नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ डोखळे, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, प्रवीण राठी, सुनील राठी, गौरव राठी, रविकिरण राठी, सविता राठी, ॲड. रवी राठी, डॉ. किरण राठी, संकेत चोरडिया, कृष्णाशेठ नागरे, निफाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रवीण ठाकरे, अरविंद कारे, लक्ष्मी पतसंस्थेचे संस्थापक नंदलाल चोरडिया, सुभाष कराड, रामदास व्यवहारे, प्रकाश दायमा, न्या. रानडे विद्या प्रसारक संस्थेचे रतन वडघुले यांच्यासह निफाड अर्बन-को. ऑपरेटिव्ह बँकेचे सर्व संचालक, शांतीलालजी सोनी निफाड नागरी सह. पतसंस्थेचे सर्व संचालक, विविध पतसंस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक, सोसायटीचे संचालक यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

### बालविवाह रोखण्यासाठी जि.प.ची मोहीम

नाशिक : अक्षयतृतीया मुहूर्तावर जिल्ह्यात बालविवाह होऊ नयेत यासाठी जिल्हा परिषद नाशिकमार्फत विशेष मोहीम राबविण्यात आली.


अक्षयतृतीया हा शुभ मुहूर्त मानला जात असल्याने या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्कतेचा इशारा दिला होता. तसेच बालविवाहाबाबत कोणतीही माहिती असल्यास शासकीय यंत्रणेस तात्काळ कळविण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांनी सर्व गटविकास अधिकारी यांची दुरदृश्य प्रणालीद्वारे व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची बैठक घेऊन बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या. सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन जनजागृती करण्याचे आवाहन मित्तल यांनी केले होते.

# बियाणे खरेदी करताना खबरदारी घ्यावी

## कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यासह विभागातील शेतकऱ्यांनी परवानाधारक विक्रेत्याकडूनच बियाणे, खते खरेदी करावेत. विक्रीचा परवाना असलेल्या कृषी सेवा केंद्रातूनच कृषी निविष्ठा खरेदी करावी. तसेच गावोगावी फिरणाऱ्या एजंटांकडून कोणतेही बियाणे घेऊ नये. यामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होऊ शकते. जमिनीच्या प्रतीनुसार आणि पिकाच्या गरजेनुसार योग्य बियाण्याची जात निवडावी. याकरिता स्थानिक कृषीतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर व विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक उल्हास ठाकूर यांनी शेतकऱ्यांना केले.




कृषी विभागाने म्हटले की, शेतकऱ्यांनी बियाण्यांच्या पॅकेटवर कंपनीचे नाव, लॉट नंबर, उत्पादन तारीख, अंतिम तारीख, वाणाचे नाव, उगवण क्षमतेची टक्केवारी आणि पाकिटावर छापलेले लेबल तपासावे. स्थानिक हवामान, बियाणे स्वच्छ, रोगमुक्त आणि एकसमान आकाराचे असावे. कचरा, खराब बियाणे किंवा कीड नसावी. बियाण्याला बीजप्रक्रिया केली आहे का? असल्यास कोणत्या औषधाची केली आहे ते तपासा, नसल्यास कोणत्या औषधाची बीजप्रक्रिया करावी याचा सल्ला कृषीतज्ज्ञांकडून घ्या. अंतिम तारीख पूर्ण झालेले बियाणे खरेदी करू नये, कारण त्याची उगवण क्षमता कमी असते. खरेदीचे अधिकृतचे पक्के बिल घ्या, जेणेकरून तक्रार असल्यास पुरावा मिळेल.



> शेतकरी बांधवांनी स्वस्त बियाण्यांच्या आमिषाला बळी न पडता अधिकृत कृषी केंद्रातून बियाणे खरेदी करावेत. त्याची पावती घेऊन ती जपून ठेवावी. शेतकऱ्यांच्या बियाणेसंदर्भात तकारी असल्यास त्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा.
> **-उल्हास ठाकूर, गुणवता नियंत्रण अधिकारी, नाशिक विभाग**

हायब्रिड बियाणे घेतल्यास त्याच्या लागवडीसाठी विशेष काळजी आणि खते याची माहिती घ्या. खरेदी केलेले बियाणे कोरड्या आणि थंड ठिकाणी साठवा, जेणेकरून त्याची गुणवत्ता टिकेल. शक्य असल्यास स्थानिक कृषी अधिकारी किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेऊन बियाणे निवडा. विकत घेतलेल्या बियाण्याचे पाकीट आणि बिल जपून ठेवावे. विकत घेतलेल्या बियाणांची पाकिटे, अधिकृत बिल आणि थोडेफार बियाणे हंगाम संपेपर्यंत राखून ठेवावे. जेणेकरून तक्रार करावयाची झाल्यास पुरावे म्हणून ग्राह्य मानले जातात. पेरणीच्या वेळेस बियाण्याची पिशवी शिलाई केलेल्या बाजूने न फोडता खालील बाजूने फोडावी. जेणेकरून पिशवीवरील टॅग व लेबल चांगले राहतील व ते टॅग आणि लेबल सांभाळून ठेवावे. या गोष्टींची काळजी घेतल्यास चांगल्या प्रतीचे बियाणे मिळेल आणि पिकाचे उत्पादन वाढेल, असे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर व विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक उल्हास ठाकूर यांनी म्हटले आहे.



आरओसी-2025-26/क्र-5/D४६१



अक्षयतृतीयेला १६ हजार कोटी रुपयांच्या दागिन्यांची विक्री पान ३

नाशिक आज

गांवकरी



चार श्रम संहितांना कामगार संघटनांचा विरोध का? पान ३

■ नाशिक, गुरुवार, दि. १ मे २०२५

# अक्षयतृतीयेला नाशिककरांनी साधला खरेदीचा मुहूर्त

## बाजारपेठेत कोट्यवधीची उलाढाल; ५५० सदनिका, ६०० चारचाकी विक्रीचा अंदाज

**नाशिक : प्रतिनिधी**

अक्षयतृतीयेचा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला मुहूर्त साधत नाशिककरांनी सोने, वाहन, गृह आणि इलेक्ट्रिक वस्तू खरेदी करत नाशिककरांनी खरेदीचा मुहूर्त साधला.

भगवान विष्णूंसह पितरांच्या पूजनासाठी या तिथीला विशेष महत्त्व असल्याने या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत करा-केळी व आंब्यांची खरेदी करण्यात आली. तर घरोघरी पूर्वजांच्या स्मरणासाठी करा-केळी पूजन करण्यात आले. तर आमरस व पुरणपोळी करत अक्षयतृतीयेचा सण साजरा करण्यात आला.

वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षयतृतीया हा भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा सण मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त या दिवशी असल्याने शेतकरीवर्गाने नवीन अवजारे खरेदी केली. सोने खरेदी, वास्तू प्रवेश, विवाह आदी शुभकार्यांसाठी हा योग महत्त्वाचा मानला जात असल्याने अनेक ठिकाणी वास्तुप्रवेश झाले. तर अनेकांनी नवीन गृह खरेदी करीत मुहूर्त साधला. दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या खरेदीसाठी देखील मोठी गर्दी दिसून येत होती. अक्षयतृतीया हा सण खानदेशात तसेच बागलाण, कळवण, सटाणा, मालेगाव या तालुक्यांत मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला.

> अक्षयतृतीयाच्या मुहूर्तावर गृह, नवीन शॉप खरेदी करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. बँकांनी व्याजदर कमी केल्याने गृह खरेदीकडे नागरिकांचा कल वाढला आहे. मुंबई, पुण्यानंतर मेट्रो सिटी म्हणून नाशिककडे पाहिले जात असल्याने स्थानिक नाशिककरांसह इतर शहरांतील नागरिक गुंतवणूक म्हणून नाशकात गृह खरेदी करीत आहेत.
>
> - **कृणाल पाटील,** आयपीपी, क्रेडाई, नाशिक मेट्रो

### इलेक्ट्रॉनिक गॅझेट खरेदीसाठी गर्दी

इलेक्ट्रॉनिक गॅझेट खरेदी करण्यासाठी नाशिककरांची मोठी गर्दी झाल्याचे चित्र बाजारपेठेत दिसत होते. मोबाइल, टीव्ही, एलसीडी, वॉशिंग मशीन, फ्रीज, लॅपटॉप यांसारखे इलेक्ट्रॉनिक गॅझेटची खरेदी करण्यासाठी नाशिककरांची गर्दी झाल्याचे चित्र होते.

> नवीन वाहन धोरणांचा वाहन खरेदीवर कोणताही परिणाम नाही जाणवला. शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा वाहन खरेदीला उत्तम प्रतिसाद मिळाला. यंदा व्यावसायिक वाहनांना मागणी कमी आहे.
>
> - **शिवजी पांडे,** सेल्स मॅनेजर, भाविन व्हिल्स




### १००० दुचाकी विक्रीचा अंदाज; ट्रॅक्टरचीही खरेदी

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर मोठी उलाढाल झाली असून, दुचाकी, चारचाकीसह ग्रामीण भागात शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या ट्रॅक्टरचीही मोठ्या प्रमाणात खरेदी झाली आहे. अनेकांनी तर काही महिन्यांपूर्वीच वाहनांची बुकिंग करून ठेवली होती. त्यांनी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर वाहने घरी नेली. अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर विविध कंपन्यांच्या १००० दुचाकी तर ६०० चारचाकी वाहने विक्री झाल्याचा अंदाज आहे. त्यामुळे अक्षयतृतीयेच्या निमित्ताने बाजारपेठेला झळाळी प्राप्त झाली.

### नवीन घरांची खरेदी; बाजारपेठेत मोठी उलाढाल

अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर ५००-५५० नवीन घरांची खरेदी झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. परिणामी, बाजारपेठेत मोठी उलाढाल झाली आहे.

# सोन्याच्या गुंतवणुकीस 'अक्षय्य' मुहूर्त

**नाशिक : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांमध्ये सोन्याने चांगला परतावा दिल्याने सोने खरेदीकडे पाठ न वळवता गुंतवणूक आणि चांगला परतावा म्हणून सोन्याची खरेदी केली जात आहे. अक्षयतृतीयेला सोनेदर लाखाच्या आत आल्यानेही ग्राहकांनी संधी आणि मुहूर्त साधत आवड जपली आहे.

सोनेदराने लाखाचा दर गाठूनही अक्षयतृतीयेला सोने खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केल्याचे चित्र होते. अक्षयतृतीयेला सोनेदर २४ कॅरेट ९८ हजार ६५० आणि २२ कॅरेट ९० हजार ७८० प्रति दहा ग्रॅम आणि चांदी एक लाख १५०० रुपये प्रतिकिलो जीएसटीसह नोंदविण्यात आले. लाखाच्या आत दर असल्याने ग्राहकांनी गुंतवणूक आणि मुहूर्ताच्या सोन्याची खरेदी केली. चोख सोने, वेढी, बिस्किटे, कानातले, मंगळसूत्र आणि देवांचे उपकरणे आदींना मागणी होती. दागिने, चोख सोन्यातील गुंतवणुकीला महिलांसह पुरुषही आता प्राधान्य देत आहेत. सोन्यातील गुंतवणूक कायमच सोपी आणि तत्काळ रोख स्वरूपात हातात मिळत असते. त्यामुळे कायम ग्राहकांचे आवडते आहे, ते कायम राहणारच. दोन दिवसांपासून दरवाढ झाल्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. आगामी काळात जेवढे शक्य आहे, दहा, वीस, पन्नास हजार जसे जमेल तसे थोडे थोडे सोने खरेदी दर महिन्याला करावी. कारण आगामी काळात अजून सोनेदर वाढणार आहेत. त्यामुळे आजही सोन्याचा चांगला दर मिळाल्याने ग्राहक सोने खरेदी करीत असल्याचे मत मयूर अलंकारचे मयूर शहाणे यांनी सांगितले.

गुंतवणुकीचा फायदा होत असून, आगामी काळात अजून दर वाढणार असल्याने आता ग्राहक गुंतवणूक म्हणून खरेदी करीत आहे. गुंतवणुकीसाठी योग्य काळ असल्याचे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश नवसे यांनी सांगितले.



> मुहूर्ताला सोने दर लाखाच्या आत आल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. चांगला परतावा ग्राहकांना मिळाला आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कधी छोट्या रकमेची गरज असते, त्यासाठी गोल्ड लोन केले जाते. दागिना मोडत नाही अशा केसमध्ये ग्राहकांना जास्त पैसे मिळत आहे. त्यामुळे गुंतवणूक पुन्हा वाढली आहे. - **मयूर शहाणे,** संचालक, मयूर अलंकार

> अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर सोने खरेदी शुभ मानले जाते. त्यामुळे सोने खरेदी केली जाते. गुंतवणूक म्हणून खरेदी करीत आहोत. भाववाढीचा खरेदीवर परिणाम झाला असला तरी आगामी काळात दरवाढ झाली तर फायदा आपलाच होणार आहे. - **एक ग्राहक**

> ग्राहकांना दरवाढीमुळे केलेल्या गुंतवणुकीचा फायदा झाला आहे. सुरक्षित गुंतवणूक म्हणून भारतीय महिलांचे पहिल्यापासून सोन्याचे आकर्षण खरे ठरले आहे. यापुढेही गुंतवणूक सुरू राहणार आहे. २२ कॅरेटमध्ये दागिने खरेदी केले जात आहे. चोख सोन्याच्या खरेदीकडे कल आहे.
>
> - **गिरीश नवसे,** अध्यक्ष, सराफ असोसिएशन

# नाशिकला सापत्न वागणूक; अन्याय सहन करणार नाही

## मध्य रेल्वेच्या बैठकीत खा. वाजे आक्रमक; प्रलंबित प्रश्नांकडे वेधले लक्ष



**नाशिक : प्रतिनिधी**

रेल्वे प्रशासनाकडून मागील काही वर्षांत नाशिकला सावत्रपणाची वागणूक दिली जात असल्याचा आरोप खा. राजाभाऊ वाजे यांनी केला. नवीन स्थानकांचा विकास, ट्रॅक्शन कारखाना, लॉजिस्टिक स्थानक, महत्त्वाकांक्षी प्रकल्प, नवीन रेल्वेगाड्या, पंचवटी-राज्यराणी, कामांचा दर्जा आदी बाबतीत प्रश्न उपस्थित करताना त्यांनी प्रशासनाला फैलावर घेतले. तसेच नाशिकवर होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिकाच खा. वाजे यांनी रेल्वे महाव्यवस्थापकांसमोर घेतली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्या उपस्थितीत लोकसभा सदस्यांची बैठक पार पडली. यावेळी खासदार राजाभाऊ वाजे यांनी नाशिकच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण प्रश्नांना वाचा फोडली.

यावेळी खा. वाजे म्हणाले, नाशिक-कल्याण लोकल रेल्वेसेवा, मनमाड ते इगतपुरी-कल्याणपर्यंत नवीन रेल्वे ट्रॅक, कसारा बोगदा रुंदीकरण, नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे आदी महत्त्वपूर्ण विषयांसह नाशिक ट्रॅक्शन कारखाना विस्तारीकरण, नाशिकरोड रेल्वेस्थानकाचा विस्तार व आधुनिकीकरण, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ओढा रेल्वेस्थानकाचा न्यू नाशिकरोड रेल्वेस्थानक म्हणून विकास करणे, पाडळी येथे लॉजिस्टिक स्टेशनची उभारणी करणे आदी विषयांसह पंचवटी व राज्यराणी एक्स्प्रेसच्या समस्यांचा पाढा वाचला. नव्याने नाशिक ते मुंबई रेल्वे सुरू करण्याबाबत मागणी केली. सद्यस्थितीत सुरू असलेले किंवा पूर्णत्वास गेलेल्या रेल्वेच्या अंडरपास व ओव्हरहेड ब्रिजच्या निकृष्ट दर्जामुळे नागरिकांना ज्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्याबाबतही खा. वाजे यांनी संताप व्यक्त केला.

पंचवटी व राज्यराणी एक्स्प्रेस या नाशिकच्या जीवनवाहिन्यांचा जीव घुटमळत आहे. पंचवटी एक्स्प्रेस ही नाशिक-मुंबईदरम्यानची सर्वाधिक गर्दीची आणि लोकप्रिय सेवा असूनही तिच्या वेळापत्रकातील वारंवार बदल, तांत्रिक बिघाड, वॅगन अदलाबदल आणि स्वच्छतेच्या तक्रारी नागरिकांना त्रासदायक ठरत आहेत. तसेच, राज्यराणी एक्स्प्रेस पुन्हा मूळ मार्गावर (नाशिक-मुंबई) कार्यान्वित करावी, अशीही ठाम मागणी त्यांनी मांडली. यासह, नाशिक-मुंबई मार्गावर अजून एक स्वतंत्र रेल्वे सेवा सुरू करण्याची देखील मागणी यावेळी खा. वाजे यांनी केली. नाशिक येथील ट्रॅक्शन मशीन कारखाना हा १९८१ पासून अस्तित्वात असलेला एक अत्यंत महत्त्वाचा रेल्वे प्रकल्प आहे. मात्र, आजतागायत त्याचा पूर्ण क्षमतेने वापर झालेला नाही. या ठिकाणी सुमारे ३०-४० एकर रिकामी जमीन असून, त्याचा उपयोग पुढील गोष्टींसाठी करावा, अशी खा. वाजे यांनी मागणी केली.

### औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी रेल्वे ट्रॅक्शन कारखाना महत्त्वाचा

नाशिक येथील ट्रॅक्शन मशीन कारखाना हा १९८१ पासून अस्तित्वात असलेला एक अत्यंत महत्त्वाचा रेल्वे प्रकल्प आहे. मात्र, आजतागायत त्याचा पूर्ण क्षमतेने वापर झालेला नाही. या ठिकाणी सुमारे ३०-४० एकर रिकामी जमीन असून, त्याचा उपयोग लोको शेड व मेमू डेपो उभारणे, ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती युनिट सुरू करणे, नवीन यंत्रसामग्रीसाठी उत्पादन युनिट उभारणे यामुळे नाशिकच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल आणि स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक रोड स्थानकावर दररोज लाखो भाविकांचा ओघ अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने नाशिक रोड स्थानकाचा विस्तार, ओढा (न्यू नाशिक रोड) येथे अत्याधुनिक नवीन रेल्वेस्थानक उभारणे, पाडळी येथे लॉजिस्टिक हब व सुकाणू केंद्र उभारणे आवश्यक असल्याचे म्हटले.

> रेल्वे हे नाशिकच्या सर्वांगीण विकासाचे इंजिन आहे. त्यामुळे हे सर्व प्रकल्प केवळ मागण्या नसून, नाशिकच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक पावले आहेत. मी संसदेमध्येही या सर्व मुद्द्यांवर सातत्याने पाठपुरावा करत राहीन आणि आता इथून पुढे रेल्वेकडून नाशिकवर होणारा अन्याय, गाड्या आणि प्रकल्पांची पळवापळवी सहन केली जाणार नाही.
>
> -**खा. राजाभाऊ वाजे,** नाशिक लोकसभा

### कामांचा दर्जा व नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची

जिल्ह्यातील विविध ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल व अंडरपासचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी सतत येत आहेत. जसे की ओढा, शिलापूर, वंजारवाडी इत्यादी ठिकाणी अंडरपासचा दर्जा इतका निकृष्ट आहे की, त्या ठिकाणी वर्षातील ६ महिने तुडुंब पाणी भरलेले असते. विशेषतः ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रेल्वे गेट बंद करण्यात आलेले असून, नागरिकांना असुविधा निर्माण झाली आहे. तसेच, नव्याने प्रस्तावित असलेल्या ओव्हरहेड ब्रिज आणि अंडरपासचा आराखडा बनवता स्थानिकांना विश्वासात न घेतल्याने मोठा असंतोष निर्माण झालेला आहे. यांसह जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अंडरपासचे रुंदीकरण तसेच ओव्हरहेड ब्रिज बनवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### नवनवीन रेल्वेगाड्यांचे प्रस्ताव

सामान्य प्रवाशांची व भाविकांची वाढती मागणी लक्षात घेता, खालील नव्या गाड्यांचा प्रस्ताव मांडण्यात आला. एकादशी एक्स्प्रेस – नाशिकरोडहून पंढरपूर– नाशिकरोड अयोध्या एक्स्प्रेस– नाशिकरोड वाराणसी गंगा दर्शन स्पेशल– नाशिकरोड तिरुपती दर्शन स्पेशल– नाशिकरोड कोकण व गोवा सेवा– नाशिकहून जयपूर कटरा मार्गे लष्करी प्रवासासाठी विशेष गाडी– नाशिकरोड – अजमेर–पुष्कर एकता एक्स्प्रेस.



नाशिक : अक्षयतृतीयेनिमित्ताने रविवार कारंजा येथील चांदीच्या गणपतीला २५१ किलो हापूस आंब्याचा नैवेद्य दाखवण्यात आला. ( छाया : रविकांत ताम्हणकर)

# अक्षयतृतीयेनिमित्त चांदीच्या गणपतीला आंब्यांची आरास

**नाशिक : प्रतिनिधी**

अक्षयतृतीयेनिमित्त नाशिकमधील प्रसिद्ध रविवार कारंजा येथील चांदीच्या गणपतीला आकर्षक आंब्यांची आरास करण्यात आली होती. पारंपरिक श्रद्धा आणि सौंदर्य यांचा संगम साधणारी ही आरास भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अक्षयतृतीयेनिमित्त श्री गणेशमूर्तीला विशेष फळांची सजावट करण्यात आली. यंदा आंब्यांच्या बहरात गणपती बाप्पाची मूर्ती अधिकच तेजस्वी भासत आहे. विविध प्रकारच्या हापूस, केसर व पायरी आंब्यांनी तयार केलेली ही आरास परिसरात भक्तांमध्ये आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली आहे.

स्थानीक भाविक, व्यापारी आणि गणेशभक्तांनी एकत्र येत ही आरास सजवली असून, भक्तांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.



# महात्मा बसवेश्वरांचे विचार आजही प्रेरणादायी, पथदर्शक : बाळकृष्ण दंदणे

**नाशिकरोड : वार्ताहर**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९४ वी जयंती नाशिकरोड, देवळाली गावात उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन देवळाली गावातील लिंगायत समाजाच्या सिद्धेश्वर हॉल, नाशिक मनपा, नाशिक रोड विभागीय कार्यालयात व समता नागरी पतसंस्थेमध्ये करण्यात आले.

बसवेश्वरांचे विचार आजही समाजाला प्रेरणादायी व पथदर्शक आहे. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, जात-पात निर्मूलन आदी केलेले कार्य त्याकाळी धाडसी होते. ते लोकशाहीचे आद्यजनकच होय, असे मनोगत तरुण वीरशैव नाशिकरोडचे अध्यक्ष ॲड. बी. बी. दंदणे यांनी व्यक्त केले. लिंगायत संघर्ष समिती उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रशेखर दंदणे, लिंगायत संघर्ष समिती नाशिक जिल्हाध्यक्ष संदीप झारेकर, लिंगायत फाउंडेशन अध्यक्ष अनंत दंदणे यांनीही बसवेश्वरांच्या कार्याला उजाळा देत त्यांना अभिवादन केले. या जयंतीचे अध्यक्ष रवीशेठ दंदणे, जयंतीचे युवा अध्यक्ष प्रवीण झळके, हेमंत लिंगायत, नीलेश हिंगमिरे, सागर जालनेकर, गणेश डबे, विकी कानडे, मिलिंद बिडवई, गोरख गडकरी, संतोष गाडे, प्रमोद वेरुळे, स्वप्नील कानडे, सूरज झळके, दिनेश बिडवई, बाळासाहेब सोनवणे, नाना नगरकर, मनीष घोडके, बाजीराव भुसारे, बसवलिंग दंदणे आदींसह समाजातील सर्व समाजबांधव व पदाधिकारी देवळाली गावातील कार्यक्रमास उपस्थित होते. आज १ मे रोजी महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्ताने नाशिकरोडला सायंकाळी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

# वाहतूक बेटांचे प्रायोजकत्व घेणाऱ्यांना नोटिसा

## कारवाईचा इशारा; २५ लाखांचा भरणा

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक बेटे घेऊन महापालिकेला मालमत्ता वापराची रक्कम न भरणाऱ्या प्रायोजकांना पालिकेच्या वाहतूक सेलने दणका देत नोटिसा धाडत कारवाईचा इशारा दिला होता.

कारवाईच्या भीतीने संबंधित प्रायोजकांनी थकीत असलेली पंचवीस लाखांची रक्कम भरली. महापालिका आपल्या जागेचा वापर खासगी संस्था किंवा व्यक्तीला देत असताना पालिकेला त्यांच्याकडून ठरवून दिल्याप्रमाणे वर्षाला विशिष्ट रक्कम मिळते. मात्र, शहरातील काही व्यावसायिकांनी रॉयल्टी न भरता त्याकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र होते. परंतु महापालिकेच्या वाहतूक शाखेने सत्तर जणांना नोटिसा धाडताच त्यांनी थकीत रक्कम पालिकेत भरली.

शहराचे सौंदर्य खुलून दिसावे याकरिता शहराच्या विविध भागात पालिकेने कारंजे, वाहतूक बेटांची निर्मिती केली आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात ही वाहतूक बेटे अधिक खुलून आणि आकर्षक दिसावी याकरिता महापालिकेच्या वाहतूक शाखेने यात लक्ष घातले आहे.

वाहतूक बेटांचे पालकत्व घेतले आहे. मात्र, त्यांची दुरवस्था झाली आहे. अशा वाहतूक बेटांचे प्रायोजकत्व घेणाऱ्यांना सदर बेटांच्या सुशोभीकरणाच्या सूचना दिल्या आहेत. महापालिका त्यांच्या मालकीच्या महत्त्वाच्या जागा भाडेतत्त्वावर देऊ शकते. त्यातून पालिकेला महसूलही मिळतो. त्याचाच भाग म्हणून वर्दळीच्या ठिकाणी असणारे कारंजे, वाहतूक बेटे खासगी व्यावसायिकांना वापरण्यासाठी दिले. यासाठी या प्रायोजकांनी वाहतूक बेटांचे सुशोभीकरण करून त्या जागेवर तो व्यावसायिक त्याच्या व्यवसायाची जाहिरात करू शकतो. त्या वाहतूक बेटाचे प्रायोजकत्व देताना वर्षभराची रक्कम ठरवून दिलेली असते. दरम्यान, शहरातील काही व्यावसायिकांनी वाहतूक बेटांच्या देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्याबरोबरच पालिकेला अदा करायची असलेल्या रकमेकडे पाठ फिरावयाचे चित्र होते. मात्र, महापालिकेत वाहतूक शाखेची निर्मिती झाल्यानंतर कार्यकारी अभियंता रवींद्र बागूल यांनी यात लक्ष घालून कोणाकडे थकीत रक्कम आहे, अशी यादी तयार केली. त्यानंतर रक्कम भरण्याच्या नोटिसा काढत रक्कम भरा, अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा इशारा दिला. त्यानंतर काही दिवसांतच व्यावसायिकांनी थकीत रक्कम पालिकेला भरली.



> मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्या आदेशाने अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे काम सुरू असून, वाहतूक बेटांची रक्कम न भरणाऱ्या साठहून अधिक प्रायोजकांना नोटिसा काढल्या असता, आतापर्यंत त्यांनी पंचवीस लाखांचा भरणा पालिकेला केला आहे. वाहतूक बेटांचे काम अधिक सुंदर, आकर्षक असावे यासाठी प्रयत्न असेल.
>
> -**रवींद्र बागुल,** कार्यकारी अभियंता, वाहतूक सेल

## अग्रलेख

# जातींना महत्त्व

सन २०११ साली देशात शेवटची जनगणना झाली. दर दहा वर्षांनी होणारी जनगणना २०२१ साली कोरोना महामारीमुळे होऊ शकली नाही. महामारीनंतरही केंद्र सरकारने जनगणना केलेली नाही. दरम्यानच्या काळात जनगणना करण्याची मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात येत होती. त्यातच जातनिहाय जनगणना करण्याची मागणी इतर मागासवर्गीयांकडून (अदर बॅकवर्ड क्लास-ओबीसी) केली जात होती. या मागणीला कॉँग्रेस आणि विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला होता. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कॉँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी जातनिहाय जनगणनेच्या मागणीवर बराच जोर देऊन ओबीसींना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. त्याआधी जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी विविध संघटनांनी वेगवेगळ्या राज्यांत आंदोलने केली. महाराष्ट्रात छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने हा विषय चांगलाच लावून धरला होता. देशपातळीवरही भुजबळ यांनी हा विषय तापवत ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला. विविध पक्षांतील ओबीसी नेत्यांनीही जातनिहाय जनगणनेच्या मागणीवर जोर दिला होता. ओबीसींची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींचे राजकीय आरक्षणही धोक्यात आले होते. ओबीसींना २७ टक्के आरक्षण देणार्‍या मंडल आयोगाने ओबीसींची देशभरात ५२ टक्के लोकसंख्या गृहीत धरली होती. प्रत्यक्षात ही संख्या अधिक असल्याचा दावा ओबीसी संघटनांकडून केला जात होता. लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसींना आरक्षण मिळावे, अशीही मागणी केली जात होती आणि आहे. या पार्श्वभूमीवर जातनिहाय जनगणनेच्या मागणीला महत्त्व प्राप्त झाले होते. प्रलंबित मागणी केंद्र सरकारने अखेर मंजूर केल्याने ओबीसींच्या लढ्याला यश आले आहे आणि विरोधी पक्षांची मागणीही सरकारने मान्य केली आहे. सन २०२१ ची स्थगित करण्यात आलेली जनगणना सरकार कधी करणार? हे अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी यथावकाश सरकारला जनगणना करावीच लागणार आहे. केंद्र सरकारकडून जातनिहाय जनगणनेची मागणी मान्य होत नसताना बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या राज्यात जातनिहाय जनगणना करवून घेतली होती. त्यावेळी ते राष्ट्रीय जनता दल, कॉँग्रेस आणि डावे पक्ष यांच्या महागठबंधनचे मुख्यमंत्री होते. भाजपाला शह देण्यासाठी त्यांनी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी या निर्णयाला बिहार उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने बिहारमध्ये जातनिहाय जनगणना करण्यास मुभा दिली होती. जातनिहाय जनगणनेच्या आधारे बिहार सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अतिमागास, इतर मागासवर्गीय (ओबीसी) या प्रवर्गांचे आरक्षण ६५ टक्के केले होते. परंतु, ते उच्च न्यायालयात टिकले नाही. बिहारमध्ये एकूण लोकसंख्या १३ कोटींपेक्षा जास्त आहे. अत्यंत मागासवर्गीयांची लोकसंख्या ३६ टक्के आहे, तर इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या २७.१३ टक्के आहे. या दोन्ही लोकसंख्या ६३ टक्के आहे. बिहारमध्ये ओबीसीच सर्वाधिक आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीचा विचार करुन केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. उत्तर प्रदेशातही ओबीसींचा प्रभाव आहे. त्या राज्यातही २०२७ साली विधानसभा निवडणूक आहे. याचाही विचार सरकारने केला असेल. पण, गेल्या काही वर्षांत ओबीसींचा कल भाजपाकडे वाढत चालला आहे. आपल्याकडे आलेला हा वर्ग टिकवून ठेवण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला असल्याचे दिसत आहे. लोकनीती-सीएसडीएसच्या (सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज्) आकडेवारीनुसार २००९ च्या लोकसभा निवडणुकीत ओबीसींची केवळ २२ टक्के मते भाजपाला मिळाली होती, तर २९१९ च्या लोकसभा निवडणुकीत ४४ टक्के मते मिळाली. ही बाब लक्षात घेता जातनिहाय जनगणनेची मागणी केंद्र सरकारने मान्य करायला पाहिजे होती. पण, खरी आकडेवारी समोर आली, तर ओबीसींच्या मागण्या वाढतील आणि त्या मान्य करणे अवघड होईल, अशी भीती भाजपा नेतृत्वाला त्यावेळी वाटत होती. ओबीसी मतदार भाजपापासून तोडण्यासाठीच कॉँग्रेसने जातनिहाय जनगणनेचा विषय लावून धरला होता. बिहारने जातनिहाय जनगणना केल्यानंतर उत्तर प्रदेश, राजस्थान, ओडिशा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश अशा अनेक राज्यांतही हीच मागणी होत होती. मनमोहन सिंग सरकारने २०१३ साली सामाजिक-आर्थिक निकष लावून जातनिहाय जनगणना केली होती. ती जाहीर होण्यापूर्वीच लोकसभा निवडणुका आल्या. सन २०१४ साली मोदी सरकारने या जातनिहाय जनगणनेची माहिती जाहीर केली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांत ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात उपस्थित झाला तेव्हा या जनगणनेचा आधार घेण्याची मागणी ओबीसी संघटनांनी केली होती. त्यावेळी ही माहिती सदोष असल्याचा दावा केंद्र सरकारने केला होता. आता परिस्थिती बदलली असल्याने ओबीसींच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन चालणार नसल्याचे भाजपाच्या लक्षात आले आहे. त्याचमुळे जातनिहाय जनगणनेचा निर्णय घ्यावा लागला असल्याचे दिसून येत आहे. आपल्या देशात १९३१ साली झालेली शेवटची जनगणना होती. सन १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?' या पुस्तकात ओबीसी जनगणनेची मागणी केली होती. यानंतर पहिल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (कालेलकर) १९५५ साली ओबीसी जनगणनेची शिफारस केली होती. सन १९८० साली दुसर्‍या राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाने (मंडल) ओबीसी जनगणनेची पुन्हा शिफारस केली होती. दिनांक ३१ डिसेंबर १९८० साली बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांनी आपला अहवाल सादर केला. देशात १६ टक्के बिगरहिंदू, १७.५ टक्के ब्राह्मण व इतर उच्च जाती, ४४ टक्के ओबीसी, २२.५ टक्के अनुसूचित जाती व जमाती अशी आकडेवारी सादर केली. बिगरहिंदूमध्ये ८ टक्के ओबीसी असल्याचे गृहीत धरण्यात आल्याने ओबीसींचे एकूण प्रमाण ५२ टक्के झाले होते. देशात ओबीसींच्या ३७४३ जाती निश्चित करण्यात आल्या. त्यात २१०८ जाती अतिमागास असल्याचे नमूद करण्यात आले. ही आकडेवारी स्वातंत्र्यपूर्व काळात १९३१ साली झालेल्या जातनिहाय जनगणनेवर आधारित होती. याच आधारावर मंडल आयोगाच्या शिफारशींच्या आधारे ओबीसींना २७ टक्के आरक्षण १९९२ साली सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार लागू करण्यात आले. सन १९३१ ते २०२५ पर्यंत ओबीसींची संख्या वाढली असल्याचा दावा केला जात आहे. अनुसूचित जाती व जमातींचीही लोकसंख्या वाढलेली आहे. जातनिहाय जनगणनेनंतर या प्रवर्गांतून अधिक सवलती आणि आरक्षण मागितले जाण्याची शक्यता असून, जातींना महत्त्व प्राप्त होणार आहे.

# पाकिस्तान युद्धाच्या उंबरठ्यावर

अविनाश धर्माधिकारी यांनी पाकिस्तानने पहलगामवर केलेल्या हल्ल्याचे एकाच वाक्यात मार्मिक वर्णन केले आहे. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' ही मोजकी व समर्पक प्रतिक्रिया आहे. आतापर्यंत पाकिस्तानने भारतासोबत चार युद्ध केलेली आहेत. प्रत्येक वेळी युद्ध पाकिस्ताननेच लादले आहे. पहिले युद्ध वगळता, पुढील तीनही युद्धांत भारताने नेत्रदीपक विजय प्राप्त केलेला आहे. आताही पहलगामच्या धर्मांध-अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून सीमेवर गोळीबार सुरूच आहे. ज्या एकमेव युद्धात पाकिस्तान जिंकले व त्याने जवळजवळ बिहारएवढे क्षेत्रफळ असलेला भूभाग जिंकला, ते भारताचे पाकिस्तानसोबतचे पहिलेच युद्ध होते.

पाकिस्तानसोबतचे पहिले युद्ध ऑक्टोबर १९४७ ते जानेवारी १९४९ या काळात साधारणतः १४ महिने लढले गेले. इसवी सन ११०० पर्यंत हिंदू व बौद्ध यांचे ९० ते ९५ टक्क्यांच्या वर लोकसंख्या असलेल्या जम्मू-काश्मीरचे इसवी सन ११०० ते १४०० मध्ये मुस्लिमकरण करून पद्धतशीरपणे जम्मू-काश्मीर हा मुस्लिमबहुल भाग करण्यात आला. अशा भागावर मात्र इंग्रज कालखंडात डोंगरा वंशाच्या राजाची राजवट होती. त्याच वंशाचे राजे हरीसिंह १९४७ च्या कालखंडात जम्मू-काश्मीरचे राजे होते. जनता मात्र बहुसंख्य मुस्लिम. राजे हरीसिंह यांना ना पाकिस्तानमध्ये, ना भारतामध्ये, त्यांना स्वतंत्र राज्य म्हणून जम्मू-काश्मीरचे संस्थान ठेवायचे होते.

इंग्रजांकडूनही स्वतंत्र राहण्याबाबत मोकळीक होती. पण फाळणी पर्वाच्या कालखंडात राजकीय व धार्मिक स्तरावर प्रचंड वेगाने घटना घडत होत्या. १५ ऑगस्टनंतर पाकिस्तानी कबाली सैनिकांच्या टोळ्या श्रीनगरकडे कूच झाल्या. स्थानिक जनतेचा विरोध दिसून येत नव्हता. त्या कबायली सैन्याच्या सोबत पाकिस्तानमध्ये नुकतेच विलीन झालेले दीर संस्थानच्या नवाब शहाजहानने काश्मीर जिंकण्यासाठी पाकला मदत म्हणून सेना पाठवली होती. पंतप्रधान नेहरू नियम व तत्त्वाने चालणारे सभ्य गृहस्थ होते. त्यांच्या वागण्यात-बोलण्यात इंग्रज जीवनपद्धतीचा प्रभाव असे. नेहरूंनी हा प्रश्न संयुक्त राष्ट्राकडे सुपूर्द केला. भविष्यात ही आपल्या देशाची सर्वांत मोठी चूक ठरली. पाकिस्तानच्या टोळ्यांचे, सैनिकांचे काश्मीरची भूमी कब्जात घेणे सुरूच होते. एक दिवस संयुक्त राष्ट्राने हस्तक्षेप करून युद्ध थांबवले. पण तोपर्यंत काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या सैन्याने जिंकून कब्जा केला होता. त्याच भागाला आपण आज पाकिस्तान व्याप्त काश्मीर इंग्रजीमध्ये म्हणजे असे म्हणतो. याच काळात पाकिस्तानने केलेल्या सैन्याच्या हल्ल्याने त्रस्त होऊन महाराजा हरिसिंह यांनी सरदार पटेल यांना पत्र पाठवून मदत मागितली. भारताने रीतसर अटी घालून, आपले सैन्य पाठवून पाकिस्तानी सैन्याला रोखले. पण तोपर्यंत पाकिस्तानने गिलगितशट बाल्टीस्थान हा काश्मीरचे उत्तर टोक म्हणजे देशाचा मुकुट जिंकून घेतला होता. जवळजवळ ७२ हजार ९७१ चौरस किलोमीटर हा भाग पाकने घशात घातला. राज्याच्या भूभागाची तुलना करायची झाल्यास नागालँडच्या दीडपट किंवा सिक्कीमच्या दुप्पट हा भाग येतो. यासोबतच जम्मूच्या पश्चिमेकडील भाग दक्षिणोत्तर असलेली उभी पट्टीसुद्धा जिंकून घेतली. त्याला पाकिस्तानने स्वतंत्र झालेला जम्मू-काश्मीर म्हणजे आझाद काश्मीर असे नाव दिले. याचा अर्थ हा भाग आम्ही स्वतंत्र केला व आता उर्वरित भाग बाकी आहे असा होतो. १३२९७ चौरस किमी असलेल्या या भागावर स्वतंत्र प्रशासन व्यवस्था आहे, पण नियंत्रण पाकिस्तानचेच आहे. दोन्हीही भूभाग मिळून ८६,२६८ चौरस किलोमीटर भागावर पाकिस्तानने कब्जा केलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने तुलना करावयाची झाल्यास बिहारपेक्षा किंचित लहान हे




क्षेत्र येते. थोडक्यात पाकिस्तानने केलेल्या पहिल्या युद्धात आपल्याकडून बिहारएवढ्या क्षेत्रफळाचे राज्य जिंकून घेतले.

पाकिस्तानसोबतचे दुसरे युद्ध १९६२. पाकिस्तानसोबतचे दुसरे युद्ध होण्यापूर्वी तीनच वर्षांपूर्वी म्हणजे १९६२ ला



भारता भोवतालचे अस्वस्थ वर्तमान

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

आपल्यासोबत चीनने युद्ध केले होते. तेव्हा आपली कोणत्याही दृष्टीने काहीही तयारी नव्हती. चीनने लादलेल्या या युद्धामुळे भारताला लडाखमधील 'अक्साई चीन' हा ८२८५० चौरस किलोमीटर असलेल्या भूभाग गमवावा लागला. आजपावेतो त्या भागावर चीनचाच ताबा आहे. या भागाला चीन 'झिंगझियांग प्रांत' म्हणतो. तत्कालीन पंतप्रधान आदरणीय नेहरू यांचा भोळसरपणा तसेच 'हिंदी चिनी भाई भाई' चाऊ-म्याऊंच्या नाऱ्याला भुलून चीनसोबत केलेली पंचशील करारासह शांततेच्या मैत्रीने घात केला. पंचशील करार चीनसोबत केलेला असल्याने चीन पाळेल, बौद्धधर्मीय देश आहे, या स्वप्नात नेहरूजी व देशही राहिला. समाजवादाच्या तत्त्वाने देशातील माणसाचा सर्वच अंगाने विकास करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या नेहरू सरकारने संरक्षणावरच्या खर्चाला महत्त्व न देता विकासावर भर दिल्याने, देश संरक्षणदृष्ट्या कमकुवत होता. त्याचा फायदा चीनने घेतला. झारखंडपेक्षा मोठे क्षेत्र चीनने आपल्या ताब्यात मिळवले. या 'अक्साई चीन' भागासोबतच काही भागही (जो आता अरुणाचल प्रदेशचा भाग येतो) त्यावरही कब्जा केला. हा आघात सहन न झाल्याने कालांतराने पंडित नेहरूजींचे निधन झाले. १९६५ ला पाकिस्तानने पुन्हा हल्ला केला. त्यावेळी देशाचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री होते. कॉँग्रेसचेच शासन होते. ही सर्व स्वातंत्र्यसंग्रामातील ध्येयनिष्ठ मंडळीच, पंतप्रधानांसह मंत्रिमंडळात होती. महात्मा गांधींच्या अहिंसा, त्याग, विचारांचा पगडा अद्यापही कायम होता. तरीही शास्त्रीजींच्या नेतृत्वात भारताने पाकला चौक प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने ऑपरेशन अंतर्गत काश्मीरमध्ये घुसखोरी केली.

भारतीय सैन्य दक्ष असल्याने प्रथमच भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या सैन्याला पळून जाण्यास भाग पाडले. आपले सैन्य पाकिस्तानची राजधानी लाहोरच्या सीमेपर्यंत गेले होते. काही अवधीतच आपण पाकिस्तानच्या राजधानीवर वर्चस्व, ताबा मिळवणार होतो. पण आंतरराष्ट्रीय राजकीय हालचालीमुळे पाकचे पंतप्रधान अयुबखान यांच्यासोबत शास्त्रीजींचा ताश्कंद येथे करार झाला. करारानुसार जिंकलेला संपूर्ण भूभाग सोडून भारतीय सैन्य पूर्ववत आपल्या सीमारेषेवर आले. जिंकलेला भाग सोडला. जगामध्ये अशी घटना प्रथमच घडली. ताश्कंद कराराच्या धक्क्याने म्हणा वा घातपाताने पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे ताश्कंदलाच निधन झाले. हे युद्ध भारताने मैदानावर जिंकले पण तहामध्ये हरले असे म्हणता येईल. या युद्धात अमेरिकेने पाकला कोणतीही मदत केली नाही.

पाकिस्तानसोबतचे १९७१ चे युद्ध हे युद्ध खरे म्हणजे पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांच्यामध्येच होते. पण त्याचा परिणाम भारतावर व्हायला लागला. त्यामुळे या युद्धामध्ये इच्छा नसताना भारताला पडावे लागले. १९४७ पासून ते १९७१ पर्यंत पूर्व व पश्चिम पाकिस्तान मिळून एकत्रित शासन होते. पूर्व व पश्चिम पाकिस्तान मिळून आलेल्या सर्व सदस्यांमधून बहुमताने पंतप्रधानांची निवड होई. १९७१ पर्यंत असेच झाले. तोपर्यंत पश्चिम पाकिस्तान आतील सदस्यांचेच बहुमत असल्याने त्यांचाच पंतप्रधान होई व पर्यायाने पश्चिम पाकिस्तानचेच वर्चस्व असे. त्यांच्याच भल्याची कायदे संमत होत. यासोबतच पूर्व पाकिस्तानवर पश्चिम पाकिस्तानची उर्दू भाषा, परंपरा, संस्कृती लादण्याचे प्रयत्न सुरू झाले. पूर्व पाकिस्तानला सर्वच बाबतीत मागे ठेवण्याचे प्रयत्न नियोजनबद्ध सुरू होते. बंगाली मुसलमानांना सर्वच हक्कांपासून वंचित ठेवणे सुरू होते. याचा परिणाम म्हणून पाकिस्तानचे युवा नेतृत्व मजीबूर रहमान यांच्या रूपाने उदयास आले. १९७१ ला त्यांचेच बहुमताने सदस्य निवडून आले. नियमानुसार मजीबूर रहमान पंतप्रधान होणार होते. सिंध पंजाब प्रांतातील पश्चिम पाकिस्तानातील राजकीय नेत्यांना हे सहन झाले नाही. त्यांनी अटक सत्र सुरू केले. परिणामी, युद्धसदृश स्थिती निर्माण झाली. लाखो बंगाली मुस्लिम भारतात निर्वासित म्हणून येऊ लागले. (निर्वासित आजही भारतातच आहेत. ही संख्या लाखोंच्या घरात आहे.) त्यामुळे भारताला या संघर्षात पडावे लागले. प्रथमच केंद्र शासन नेहरूजींच्या विचाराच्या कोषातून बाहेर पडलेले जगाला दिसले. तत्कालीन पंतप्रधान ज्यांना एकेकाळी 'गुंगी गुडीया' म्हटले गेले होते. त्यांनी पद्धतशीरपणे पाकचे दोन तुकडे केले. पूर्व पाकिस्तानचे स्वतंत्र राष्ट्र बांगलादेश म्हणून उदयास आले.

# विवेकानंदांच्या वाटेवरचा विलक्षण युवा : डॉ. गुट्टे महाराज

मौनादरम्यान रात्रीतून पहाट उमलावी तसा. या निरव शांततेत झोकून दिल्यावर जाणवतं की, कुठेतरी अंतरंगातल्या क्षितिजावर तांबडं फुटू लागलंय. गहन अंधाराने भारलेल्या गाभाऱ्यात काहीतरी झुंजूमंजू झाल्यासारखं वाटू लागतं. प्रकाश भरू लागल्याची जाणीव होते. या जाणिवांचा स्पर्श अनुभवल्यानंतर आपल्याच अस्तित्वाचे मूळ स्वरूप ध्यानात येऊन अरे! हीच तर खरी पहाट आहे, आतापर्यंत जे जगलो तो तर पूर्ण अंधार होता. अज्ञानाचा अंधार, मौनातल्या मुखरीत स्वरांचं केवढे विलोभनीय संगीत भरलेलं आहे येथे. दिव्यत्वाच्या प्रांताचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या पिपासू चातकांना वाटेल, 'ही अशी कोणती जागा आहे?' होय, हे डॉ. तुळशीराम महाराजांचे त्यावेळचे अमृतधाम गोपाळनगर, नाशिक येथील निवासस्थान आहे आणि या त्यांच्या निवासस्थानी या युवा साधकाने श्री गणेशांच्या सान्निध्यात आपल्या नऊ महिन्यांच्या मौनव्रताला मूर्त रूप देत पुढे आपल्या आध्यात्मिक आणि मानवसेवा हीच ईश्वरसेवा समजून सामाजिक कार्याची घोडदौड सुरू आहे.

डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज हे संत मुक्ताईंच्या अध्यात्मजीवनावर पीएच.डी. पूर्ण झाल्यानंतर मौनात गढून गेलेला तेजस्वी युवा, तपस्वी संत, अत्यंत ओजस्वी आणि तेजःपुंज विचारांचा हा तरुण पदवीचे गाठोडे घेऊन आणि पीएच.डी.चा टिळा लावून नोकरी मागण्यासाठी संस्थानिकांचे उंबरठे झिजवत बसले नाही, तर एका वेगळ्याच आध्यात्मिक यात्रेच्या दिशेने हा युवा तपस्वी निघाला आहे. भगवान श्रीगणेश आणि ज्ञानेश्वर माऊली यांच्यावर असीम श्रद्धा ठेवून आत्मज्ञानाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे. पंचवटीत ९ महिन्यांच्या मौनव्रत अनुष्ठानासह त्यांनी तब्बल ९ वेळा प्रत्येकी ४५ दिवसांची मौनव्रतसाधना केली. तत्पूर्वी ओंकारेश्वर येथे त्यांनी ८ वेळा अनुष्ठान केले आहे. मौनाविषयी डॉ. गुट्टे यांचे आपले स्वतःचे चिंतन आहे. 'मौनं सर्वार्थ साधनम'च्या उक्तीनुसार आणि ज्ञानेश्वर माऊलींनी ज्याचा शब्देविन संवादू असा उल्लेख केला आहे. तो संवाद खरोखर नेमका काय असतो, शब्दब्रह्माच्या आधारानेही ईश्वरप्राप्ती होऊ शकते परंतु शब्दब्रह्माच्या पलीकडच्या विज्ञानाचा शब्दांपलीकडे जाऊनच अनुभव घ्यायला हवा, अशी त्यांची प्रयोगात्मक धारणा आहे. शब्दांपलीकडच्या स्तब्धतेत खरोखर काय दडले आहे, हे स्वतःवरच प्रयोग करून अनुभवण्याची त्यांची जिद्द



आहे. संत-महात्म्यांनी दाखवलेल्या वाटेवरचे ते केवळ अनुकरणप्रिय भक्त नसून, प्रयोग धर्मी भक्त आहेत. कुठलाही विचार अंधश्रद्ध होऊन स्वीकारण्यापेक्षा त्याची

संजीव आहिरे
९०११०७८४४९

सत्यता स्वतःवरच आजमावण्याचा त्यांचा आग्रह आहे. या सर्व आध्यात्मिक प्रयोगातून त्यांनी जे अनुभवले, संत विचारांचे जे मनोज्ञ दर्शन त्यांना प्रत्यक्ष जाणवले. त्या अनुभूतीवर त्यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला आल्याचे दिसून येते.

भारतीय संस्कृती त्यागाची भावना रुजविते, विचार करायला शिकविते, स्वार्थी आणि आत्मकेंद्रित होण्यापेक्षा समाज आणि पीडित मानवतेसाठी झिजण्यातच मानवी जीवनाचे सार आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी श्री सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनची स्थापना केली. मिशनच्या माध्यमातून महाराष्ट्रभर आध्यात्मिक आणि सामाजिक कार्य सुरू आहे. आत्मकेंद्रित होऊन डबक्यासारखी जीवनाची अवस्था करायची की, इतरांच्या कल्याणकरिता झटून जीवनाला प्रवाही बनवत अनंत सागरात विलीन करायचे, हा उदात्त विवेक भारतीय संस्कृतीच जागवते. त्यामुळे 'वसुधैव कुटुंबकम'ची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी इथल्या मातीत रुजलेली ऋषीप्रणीत संस्कृतीच जगाला दिशा दाखवू शकते. वर्तमान परीस्थितीत अक्राळविक्राळ रूप धारण केलेल्या आतंकवाद, व्यभिचार, राष्ट्रद्रोह, अशांतता, युद्धजन्य परिस्थिती, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार या साऱ्या समस्या भारतीय दर्शनाने प्रेरित झालेला युवा सोडवू शकतो. किंबहुना त्या उद्भवणार नाहीत अशी नवीन परिस्थिती निर्माण करू शकतो. असा त्यांचा ठाम विश्वास आहे. या साऱ्या गोष्टींना मूर्त रूप देण्यासाठी इथला युवा सुजाण व सुसंस्कृत झाला पाहिजे. तरुणांच्या सळसळणाऱ्या रक्तात सृजनांकुर फुलवण्याची ताकद असलेल्या भारतीय संस्कृतीचा विचार खऱ्या अर्थाने रुजायला हवा. पाश्चिमात्य भोगवादी आणि चंगळवादी विचारात बुडालेल्या या युवांना मानवी जीवनाचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून त्या खाईतून वर काढणारा कुणीतरी दिशादर्शक युवा हवा आणि ती सुरुवात स्वतःपासून करायला हवी, या स्वामी विवेकानंदांच्या आदर्शाला अनुसरून ते भारतीय अध्यात्माचे रहस्य जाणून घेण्यात रमून गेलेले दिसून येतात. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेला युवा अशाच पठडीचा होता. त्यामुळे पर्यायाने डॉ. तुळशीराम गुट्टे विवेकानंदी परंपरेचे अनुयायी ठरतात. डॉ. गुट्टे महाराज श्रीगणेशाचे अनन्यसाधारण भक्त आहेत. त्यांच्या सहवासात आल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, या सर्वांचा ते कुठेही दिखावा करत नाही किंवा कुठलेही प्रदर्शन करण्याचा त्यांचा हेतू नाही. अत्यंत साधेपणाने, निरागसपणे व संपूर्ण अंर्तऊर्जेने भारावलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. ईश्वरावर प्रगाढ श्रद्धा, विज्ञाननिष्ठ विचार, लोककल्याणकारी भावना व अध्यात्माचा राष्ट्राच्या व समाजाच्या उत्थानासाठीचा विचार यात गढून गेलेले ते दृष्टीप्रथास घडवून आणवयाचे असेल तर धर्माचा आधार घेऊनच धर्माधर्मामधील अपप्रवृत्तीवर आघात करावा लागेल. विज्ञान माणसाचे शाश्वत अस्तित्व नाकारते. परंतु धर्म माणसाच्या अशाश्वत जीवनात शाश्वततेचा ठोस आधार त्याला देत असतो, म्हणूनच माणसाला धर्म हा अत्यंत प्रिय असतो. डॉ. तुळशीराम गुट्टे यांची वाटचाल नेमकी याच दिशेने धर्माचे मर्म समजून घेण्याच्या इराद्याने चालली असल्याचे जाणवते. मौनाच्या माध्यमातून ध्यानधारणेतील रहस्य, मंत्रजपातील शक्ती व आत्मशक्तीचा स्वतःवर प्रयोग करून सत्य जाणण्याचा त्यांचा अट्टहास आहे. एकीकडे उच्चशिक्षित युवा मोठ्या पगाराच्या नोकऱ्या करीत भोगवादी जीवनात आकंठ बुडून जात आहेत. त्याच वेळेस हा तरुण साधक मात्र एक आगळीवेगळी वाट धरून, सत्याची कास धरीत, अध्यात्माची शक्ती ओळखून राष्ट्रोत्थानाचा विचार करतोय. तरुणाईसाठी एक वेगळा आदर्श निर्माण करू पाहतोय. स्वामी विवेकानंदांना अशा स्वरूपाचाच युवा अभिप्रेत होता. आज देश विविध समस्यांच्या विळख्यात सापडलेला असताना युवकांनी आपल्या सृजनशक्तीचा परिचय द्यायला हवा. त्याऐवजी ते स्वतःतच गुरफटून भोगवादात आपल्याच कोषात गुरफटत चालले आहेत. अशा परिस्थितीत युवकांसमोर त्यांच्यातलाच एक सळसळता युवा उजळलेल्या वाटा घेऊन सामोरा येतो आहे. त्यांना अनेक राज्य, राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहेत. त्यांच्या ग्रंथसंपदेत वाढ होत असून, अंगणातलं देऊळ हे आत्मचरित्र प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

# कामगार चळवळीचे जनक : नारायण मेघाजी लोखंडे

आपण १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन असे दोन महत्त्वाचे कार्यक्रम साजरे करतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तो त्यांच्या सांस्कृतिक ओळख आणि स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. १ मे हा दिवस जगभरातील सर्व कामगारांना समर्पित आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात १९ व्या शतकाच्या सुमारास अमेरिकेत कामगार चळवळीच्या रूपात झाली. भारताच्या बाबतीत १ मे १९२३ मध्ये चेन्नई येथे पहिला कामगार दिन साजरा करण्यात आला.

कामगार आणि कामगारांच्या प्रयत्नांचा तसेच त्यांच्या कामाचा विचार करण्यासाठी हे प्रतीक म्हणून केले गेले. त्यातील नारायण मेघाजी लोखंडे हे सामाजिक व कामगार चळवळीतील कामगार नेते होते. त्यांचे मूळ गाव कनेरसर, ता. खेड, जि. पुणे असून, त्यांचा जन्म १८४८ रोजी ठाणे येथे झाला. शालेय शिक्षण मॅट्रिकपर्यंत पूर्ण झाल्यानंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्यांनी प्रथम रेल्वेत क्लार्क म्हणून तसेच गिरणीत स्टोअरकीपरची नोकरी केली. पुढे ते महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सत्यशोधक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. नंतर नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८८० साली नोकरीचा राजीनामा देऊन मुंबईत दीनबंधू हे वृत्तपत्र आणले व त्याचे त्यांनी १८८८ सालापर्यंत संपादक म्हणून काम पाहिले. पुढे त्यांनी १८८४ साली गिरणी कामगारांच्या प्रश्नासाठी व त्यांच्या न्याय्य हक्कासाठी महात्मा फुले यांच्या मदतीने त्यांनी बॉम्बे मिल असोसिएशनची स्थापना केली. त्या काळी गिरणी कामगारांना दररोज तेरा ते चौदा तास काम करावे लागे. त्यांना आठवड्याची सुट्टी मिळत नसे, जादा कामाचा मोबदला मिळत नसे, वैद्यकीय सुविधा मिळत नव्हती, दुपारच्या जेवणाची सुट्टी

जनमनाचे प्रतिध्वनी

मिळत नसे, कुटुंबाला पेन्शन मिळत नसे. असे सर्व हक्क व अधिकार मिळवण्यासाठी नारायण मेघाजी लोखंडे यांनी अनेक आंदोलने, संप याचे सर्व श्रेय नारायण मेघाजी लोखंडे यांना जाते. त्यांच्या या कार्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना रावबहादूर ही पदवी प्रदान केली. आणि शेवटी ९ फेब्रुवारी १८९७ रोजी प्लेगग्रस्तांना मदत करता करता नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्लेगमुळे निधन झाले. अशा या झुंजार कामगार नेत्यास भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून संबोधले गेले. पुढे भारत सरकारने ३ मे २००५ रोजी भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या हस्ते नारायण मेघाजी लोखंडे यांच्या स्मृतिपीत्यर्थ पाच रुपयाचे पोस्टाचे तिकीट अनावरण केले. असे या महान कामगार नेत्यास कामगार दिनानिमित्त त्रिवार सलाम.

- **योगेश कापडणीस,**
औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे

## कृतीत हेतु शुद्ध पाहिजे

तमोगुण हा तिन्ही गुणांत जास्त जड असल्याने त्याचा परिणाम या जगामध्ये लगेच दिसून येतो. दुष्ट बुद्धी हा तमोगुणाचा परिणाम आहे. परंतु भगवंताच्या नामाने बुद्धी स्वच्छ करण्याची सोय माणसाच्या ठिकाणी आहे. यासाठी पुष्कळ नामस्मरण करावे, म्हणजे सत्त्वगुणाचा उदय होतो आणि बुद्धी शुद्ध बनते. देहाला कष्ट दिले म्हणजे भगवंत वश होतो हे काही खरे नाही. तसे जर असते तर रस्त्यात उन्हामध्ये खडी फोडणाऱ्यांना भगवंत लवकर वश झाला असता ! भगवंताचे लक्ष आपल्या देहापेक्षा मनाकडे असते. आपल्या मनामध्ये प्रापंचिक हेतू ठेवून भगवंताच्या नावाने उपवासासारखे कितीही कष्ट केले तरी, ते पाहून लोक फसतील, पण भगवंत फसणार नाही. आपण जसे बोलतो तसे वागण्याचा अभ्यास करावा. परमार्थामध्ये ढोंग फार बाधक असते. भगवंताच्या स्मरणामध्ये इतके तल्लीन व्हावे की आपण नेहमी त्याच्याजवळ वास करतो आहोत असे मनाला वाटावे. भगवंतासाठीच नाम घेत असावे. त्याची कृपा झाल्याशिवाय राहणार नाही.




गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### आशी सिंह होतकरू वकील कैरी शर्माची भूमिका करणार


**नवी दिल्ली :** सोनी सब वाहिनीवरील उफ्फ ये लव है मुश्किल



...या मालिकत प्रभावी अभिनय आणि उत्तम स्क्रीन प्रेझेन्सबद्दल ओळखली जाणारी आशी सिंह ही अभिनेत्री कैरी शर्मा नामक व्यक्तिरेखा साकारणार आहे. कैरी शर्मा एक महत्त्वाकांक्षी आणि होतकरू वकील आहे. कैरी एक खंबीर पण कनवाळू स्वभावाची तरुणी आहे, जी दिल्लीतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली आहे. लहान वयातच आपल्या तीन धाकट्या भावंडांना वाढवण्याची जबाबदारी तिच्यावर आलेली आहे. पण ती स्वतंत्र स्त्री आहे आणि नैतिक मूल्यांची तिला चाड आहे. आशी या मालिकेत शब्बीर अहलूवालिया साकारत असलेल्या युग या नायकाची नायिका आहे. शब्बीर देखील पहिल्यांदाच ङ्गआदर्शफ नसलेली भूमिका करत आहे.

### तेनाली रामा मालिकेत दिसणार कुणाल कपूर

**नवी दिल्ली :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिका आता एक



नवीन वेधक वळण घेत आहे. अभिनेता कुणाल करण कपूर लक्ष्मणप्पा भट्टारू म्हणजे लक्ष्मणच्या रूपात मालिकेत दाखल होत आहे. माजी लष्करी डॉक्टर आणि आता गुप्तहेर झालेल्या लक्ष्मणच्या एंट्रीमुळे मालिकेत वेगवेगळे तरंग उठताना दिसतील. लक्ष्मण इमानदार, विवेकी आणि अत्यंत बुद्धिमान आहे. सगळ्या गोष्टी तो विज्ञानाच्या कसोटीवर तपासून घेतो ज्ञान, सत्य आणि न्यायाचा शोध घेण्यासाठी त्यांचे हिंसेचे जीवन मागे टाकले आहे. रामाच्या जगात त्याचा प्रवेश एका आगळ्यावेगळ्या तळपत्या भागीदारीची सुरुवात दर्शवितो. तेनाली रामा जर राज्यातील सर्वात चाणाक्ष माणूस असेल तर लक्ष्मण तर्कनिष्ठ आहे. रामाचा तेजस्वीपणा तो शांत व्यावहारिकतेने सौम्य करतो आणि कित्येकदा अटीतटीच्या परिस्थितीत अनपेक्षितपणे नायक बनून जातो. अशाप्रकारे लक्ष्मणच्या एंट्रीमुळे मालिकेला नवीन गहनता आणि नाट्यमयता मिळाली आहे.

### 'अशी ही जमवा जमवी'ची स्टार-स्टडेड संध्याकाळ



**मुंबई :** कौटुंबिक मूल्यं, नातेसंबंधांची गुंफण आणि हलक्याफुलक्या विनोदांनी परिपूर्ण असा 'अशी ही जमवा जमवी' हा मराठी चित्रपट नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आणि चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. सहज संवाद, दिलखुलास अभिनय आणि भावनिक कथानक यामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाचे विशेष कौतुक केले आहे. नुकतेच 'अशी ही जमवा जमवी' या सिनेमाचे मुंबईत विशेष स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते, याला अनेक मराठी आणि हिंदी सेलिब्रिटींनी हजेरी लावली. इतकंच नव्हे तर या विशेष स्क्रीनिंगला राज्याचे माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आ. आशिष शेलार यांनी सुद्धा उपस्थिती लावली आणि चित्रपटाच्या टीमशी मनमोकळा संवाद साधला. तसेच ज्येष्ठ चित्रपट निर्माता व मुंबई चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम आणि अनेक मान्यवर कलाकारांनी हजेरी लावून चित्रपटाच्या टीमला शुभेच्छा दिल्या. अशा ही जमवा जमवी हा चित्रपट राजकमल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली प्रदर्शित झाला असून, व्ही. शांताराम यांचे नातू राहुल शांताराम यांचे हे पहिले निर्मिती आहे. राजकमल एंटरटेन्मेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते दिग्दर्शित अशी ही जमवा जमवी या सिनेमाने प्रेक्षकांच्या मनात एक चांगली छाप सोडली आहे.

### 'सजना'तील 'आभाळ रातीला' प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई :** प्रेम, नातेसंबंध आणि भावना यांची सुरेल गुंफण मांडणारा



बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट सजना या चित्रपटातील नवीन गाणं आभाळ रातीला प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. प्रेम ही भावना केवळ शब्दांतून नाही तर सूरांतूनही अनुभवता येते. 'आभाळ रातीला' हे गाणं त्या प्रेमभावनेचा एक सुंदर अनुभव आहे. गाण्याच्या चित्रीकरणात देखील मोठ्या मिरवणुका, ढोल-ताशाचे पथक आणि सजीव लेझीम नृत्य यांचा भव्य प्रदर्शन करण्यात आलं आहे. हे गाणे केवळ मनोरंजन नसून, मराठी संस्कृतीच्या गाढ प्रेमाचा आणि परंपरेच्या जपणुकीचा एक सुंदर सोहळा आहे, ज्याच्या प्रत्येक ठोक्यातून मराठी अस्मिता झळकते. 'सजना' सिनेमा २३ मे २०२५ पासून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे.

# अक्षयतृतीयेला १६ हजार कोटी रुपयाच्या दागिन्यांची विक्री

**नवी दिल्ली : काल देशभरात अक्षयतृतीया उत्साहात साजरी केली गेली. हा दिवस भारतीय संस्कृतीत अतिशय शुभ दिवस मानला जातो. अक्षयतृतीयाच्या दिवशी सोनं-चांदी खरेदी करण्याची जुनी परंपरा असून, आजही भारतीय नागरिक अक्षयतृतीयेला सोनं-चांदीची खरेदी करतात. सध्या सोन्याचे दर गगनाला भिडले आहेत. जवळपास १ लाख रुपयांजवळ सोन्याचा भाव पोहोचला आहे. सोने दरात इतकी मोठी वाढ झाली असली तरी आज देशभरात जवळपास १२ हजार कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने आणि बिस्किटाची विक्री झाली आहे. तर चार हजार कोटी रुपयांची चांदी विकली गेली आहे.**



कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय महासचिव खासदार प्रवीण खंडेलवाल म्हणाले की, यावर्षी जड अर्थात मोठ्या सोन्याच्या दागिन्यांपेक्षा हलक्या वजनाच्या दागिन्यांची मागणी जास्त असल्याचं दिसून आलं. पूर्वी लोक या दिवशी भरजरी दागिने खरेदी करायचे, पण यावेळी मात्र ग्राहक हलक्या दागिन्यांवर लक्ष केंद्रित करत आहेत.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी देशभरात सुमारे १२ हजार कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने आणि कॉईन इत्यादींची विक्री झाल्याची माहिती आहे. ४,००० कोटी रुपयांची चांदी आणि चांदीचे दागिनेही विक्री झाले आहेत. सोनं आणि चांदी असं दोन्ही मिळून जवळपास १६ हजार कोटी रुपयांचे दागिने विक्री झाले आहेत.

भारतीय संस्कृतीत सोन्यात गुंतवणूक करणं ही चांगली गुंतवणूक मानली जाते. त्यामुळेच सोनं आणि चांदीच्या किमती वाढल्या असूनही, लोकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली आहे.

**सोने-चांदीच्या भावात घट**

ऑल इंडिया ज्वेलर्स अँड गोल्डस्मिथ फेडरेशनचे अध्यक्ष पंकज अरोरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, काल अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १००० रुपयांनी कमी झाला आहे. तर चांदीचा भाव प्रति किलो २००० रुपयांनी कमी झाला. या घसरणीसह सोन्याचा कालचा भाव प्रति १० ग्रॅम ९७,५०० रुपये होता. तर अक्षय्य तृतियेला चांदीचा भाव प्रति किलो ९८००० रुपये होता. सोन्या-चांदीचे हे दर ऐतिहासिकदृष्ट्या सर्वोच्च पातळीवर आहे.

# महाबळेश्वर येथे २ ते ४ मेदरम्यान महापर्यटन उत्सवाचे आयोजन : देसाई

## महोत्सवात ६० पंचतारांकित टेंट्स, लेझर शो, सांस्कृतिक कार्यक्रम

**मुंबई :** महाबळेश्वर येथे २ ते ४ मे रोजी महाराष्ट्र महापर्यटन उत्सवाचे आयोजन केले आहे. या उत्सवाच्या निमित्ताने महाबळेश्वर येथे ६० पंचतारांकित टेंट्स, लेझर शो, विविध पर्यटन सहली, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी महाराष्ट्राच्या महसुली विभागातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळाचे ब्रॅण्डिंग करण्यासाठी महापर्यटन उत्सव सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पर्यटनमंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.


या उत्सवाचे उद्घाटन २ मे रोजी सायंकाळी ५ वाजता गोल्फ क्लब मैदान इथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. प्राथमिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी महाबळेश्वर येथे ३ मे २०२५ पासून पर्यटन सुरक्षा दल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत कार्यान्वित होईल. महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचा ४ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. या उत्सवात विविध नामवंत कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम, किल्ले आणि शास्त्र प्रदर्शनी, फूड फेस्टिव्हल, साहसी खेळांचे उपक्रम, मुलांसाठी कार्यशाळा, हेलिकॉप्टर राइड, ड्रोन शो, फूड स्टॉल, मंदिर तथा अन्य पर्यटन स्थळांना भेटी, फोटोग्राफी कार्यशाळा, तरंगता बाजार, लेझर शो, योग सत्र आणि मोर्निंग रागाज वाद्य संगीत, फन रन आणि सायक्लथॉन परिसंवाद- जल पर्यटनातील संधी व कार्यशाळेचे आयोजन केले आहे. छत्रपती प्रतापसिंह उद्यानात सकाळी ९ ते सायंकाळी ७ या वेळेत किल्ले आणि शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. तंत्रज्ञान आणि कलेचा अभूतपूर्व संगम असलेला लेझर अँड लाइट शो २ आणि ३ मे रोजी सायंकाळी दाखवला जाईल. तर ४ मे रोजी ड्रोन शो होईल. उत्सवात कार्निव्हल परेड या शोभायात्रेचे आयोजन ३ मे रोजी सायंकाळी ४ वा. करण्यात आले आहे.

**पंचतारांकित टेंट्स आणि हेलिकॉप्टर राइड**

महाबळेश्वर इथे ६० पंचतारांकित टेंट्स असतील, त्यात राहण्याची वेगळी अनुभूती लोकांना मिळणार आहे. यातील काही टेंट्स गोल्फ क्लब ग्राउंडजवळ, तर उर्वरित टेंट्स हे मौजे भोसे येथे मॅप्रो गार्डनजवळ असतील. महाबळेश्वर येथील सगळ्या पॉइंट्सचे उंचीवरून दर्शन घेण्याची संधी उत्सवाच्या निमित्ताने उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा टॉप व्ह्यू बघता यावा यासाठी तिन्ही दिवस सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत हेलिकॉप्टर राइडची व्यवस्था मौजे भोसे येथील बाबा दुभाष फार्मवरून करण्यात आली आहे. याशिवाय, सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत दुभाष फार्म, पाचगणी टेबल टॉप आणि हॉर्स रायडिंग मैदान तापोळा इथे पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, पाण्यातील खेळ अशा विविध साहसी खेळांच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### 'पी.एस.आय. अर्जुन'मधील गाण्याला अंकुश चौधरीचा आवाज

**मुंबई :** सुपरस्टार अंकुश चौधरीचा आगामी चित्रपट




'पी.एस.आय. अर्जुन' सध्या चांगलाच चर्चेत असून, पोस्टर, टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता प्रचंड वाढवली आहे. चित्रपटातील अंकुशच्या पॉवरफुल लूकने राडा घातला असतानाच अंकुश प्रेक्षकांसाठी एक सरप्राइज घेऊन आला आहे. 'पी. एस.आय. अर्जुन'मधील जबरदस्त 'धतड तटड धिंगाणा' हे प्रमोशनल साँग सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालायला सज्ज असून, या प्रमोशनल साँगच्या निमित्ताने स्टाईल आयकॉन अंकुशचा हा नवीन स्वॅगस्टर अंदाज प्रेक्षकांना चांगलाच भावत आहे. या गाण्याच्या एनर्जेटीक, कॅची बिट्समुळे हे गाणे सर्वत्र ट्रेंडिंग ठरत आहे. बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक नकाश अजीज व अंकुश चौधरीच्या जबरदस्त आवाजातील या गाण्याला अनिरुद्ध निमकर यांनी कमाल संगीत दिले असून, जयदीप मराठे यांनी गाण्याचे बोल लिहिले आहेत. येत्या ९ मे २०२५ रोजी चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## बांधकाम मजुरांसाठी सुगी ग्रुपचा सूरमय सलाम

### कामगार दिनानिमित्त ददलानी यांच्या आवाजात खास गाणे

**मुंबई :** आपण आपलं हक्काचं घर बनवताना, कधीतरी खरंतर थोडं थांबलं पाहिजे आणि एकदा तरी त्या बांधकाम मजुरांच्या हातांकडे पाहिलं पाहिजे, ज्या हातांनी आपल्या स्वप्नातलं घर उभं केलं. कदाचित आपल्याला त्यांचं नाव माहीत नसेल, पण त्यांच्या कष्टांमध्ये त्यांनी घडवलेली मेहनतीची आणि संघर्षाची एक अविश्वनीय कहाणी दडलेली असते.

त्यामुळेच १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने सुगी ग्रुपने आपल्या प्रकल्पांचा आत्मा असलेल्या बांधकाम मजुरांसाठी एक हृदयस्पर्शी गाणं सादर केलं आहे. हे गीत ख्यातनाम गायक विशाल ददलानी यांच्या दमदार आवाजात साकारलेलं असून,



संगीतकार चैतन्य पंडित यांनी ते संगीतबद्ध केलं आहे आणि गीतकार चैतन्य पंडित व चिराग मोदी यांनी शब्दबद्ध केलं आहे.

नितीन साळुंखे, सुगी ग्रुपचे को-फाउंडर आणि पार्टनर, म्हणाले की, बांधकाम कामगारांच्या अथक परिश्रम, त्यांचे योगदान त्याला मनापासून ओळख मिळावी, म्हणून आम्हाला हे गीत तयार करायचं होतं. या गाण्याची रचना आपल्या कामगारांच्या जीवनातील रोजच्या ऑन-साइट आवाजातून प्रेरित आहे. प्रत्येक स्वप्नातील घरामागे, असे असंख्य हात आहेत जे कौतुकास पात्र आहेत. विशाल ददलानी म्हणाले की, घरे उभारणाऱ्या बांधकाम मजुरांचे आपण फार क्वचित आभार मानतो, खरतरं मानतही नाही, तेही असे लोक जे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपलं घर बनवत राहतात. जेव्हा सुगी ग्रुपने मला कामगार दिनानिमित्त बांधकाम मजुरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या खास गाण्यासाठी आवाज द्यायला सांगितलं, तेव्हा मी मनापासून भारावून गेलो. या गाण्यासाठी माझा आवाज देणे केवळ एक संगीतात्मक निर्णय नव्हता, तर एक भावनिक अनुभव सुद्धा होता. या कामगार दिनी, सुगी ग्रुपकडून बांधकाम मजुरांना त्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाला वाहिलेली एक मनापासूनची सलामी आहे.

### मोटोरोलाकडून भारतात एज ६० प्रो लाँच

**मुंबई :** मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान व इनोव्हेशनमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटोरोला एज ६० प्रो च्या लाँचसह त्यांच्या एज ६० लाइनअपमध्ये आणखी एका




सर्वोत्तम स्मार्टफोनची भर केली. या डिवाईसमध्ये सेगमेंटमधील एकमेव ५० एमपी + ५० एमपी + ५०एक्स (टेलिफोटो) ॲडवान्स्ड एआय कॅमेरा, सेगमेंटमधील सर्वात वैयक्तिकृत व संदर्भीय ऑन-डिवाईस एआय अनुभवासह समर्पित एआय की आणि जगातील सर्वोत्तम १.५के ट्रू कलर क्वॉड-कॅमेरा कर्व्ह डिस्प्ले आहे. तसेच, मोटोरोला एज ६० प्रो मध्ये डीएक्सओएमएआरकेचे गोल्ड सर्टिफिकेशन मिळाल्यानंतर जगातील सर्वोच्च बॅटरी रेटिंग - ६००० एमएएच बॅटरीसह ९० वॅट टर्बोपॉवर चार्जिंग आणि १५ वॅट वायरलेस चार्जिंग आहे.

## डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड योजनेचा शुभारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

डीएसपी म्युच्यूअल फंडने डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड ऑफ फंड या मुदतमुक्त श्रेणीतील योजनेचा शुभारंभ केला आहे. म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून चांदी या मौल्यवान धातूमध्ये अतिशय सुटसुटीत आणि सुनियोजित पद्धतीने गुंतवणूक करण्याचा मार्ग हा फंड गुंतवणूकदारांना प्रदान करत आहे. ही नवीन फंड ऑफ फंड प्रकारची योजना डीएसपी सिल्व्हर इटीएफच्या युनिटसमध्ये गुंतवणूक करणार असून, त्याव्दारे स्थानिक बाजारपेठेत चांदीच्या कामगिरीनुरूप परतावा प्रदान करणार आहे. योजनेचा एनएफओ प्राथमिक गुंतवणूकीसाठी खुला झाला असून, येत्या ९ मे २०२५ रोजी बंद होणार आहे.

चांदीचे दर हे अमेरिकी डॉलरमध्ये निश्चित केले जात असल्यामुळे डॉलरच्या मूल्यातील घसरणीचा लाभ


DSP MUTUAL FUND

भारतीय गुंतवणूकदारांना मिळण्याची शक्यता आहे. अमेरिकी डॉलरमधील किमतीच्या तुलनेत रुपयातील चांदीच्या किंमतीने गत काही वर्षांत सरस कामगिरी बजावलेली आहे. विशेषतः रुपया कमजोर पडल्यानंतर चांदीने गुंतवणूकदारांना अतिरिक्त लाभ प्रदान केलेला आहे. व्यवहारांसाठी डिमॅट खाते उघडण्याच्या आवश्यकतेविना डिजिटल स्वरूपात अतिशय सुटसुटीत पध्दतीने चांदीसारखा मौल्यवान धातूची मालकी प्राप्त करण्याचा फायदा डीएसपी सिल्व्हर फंड ऑफ फंडमुळे मिळणार आहे.

## ॲक्सिस फायनान्सने केले दिशा गृहकर्ज लाँच

**नाशिक :** भारतातील वेगाने वाढणाऱ्या नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी एक असलेल्या ॲक्सिस फायनान्स लिमिटेड (एएफएल) ने काल अक्षयतृतीयेच्या शुभ मुहूर्तावर ॲक्सिस फायनान्स दिशा गृहकर्ज लाँच करण्याची घोषणा केली. हे उत्पादन आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्ग (ईडब्ल्यूएस) आणि कमी उत्पन्न गट (एलआयजी) विभागातील गृह खरेदीदारांच्या गरजा पूर्ण करेल.

विविध भौगोलिक क्षेत्रांमध्ये कस्टमाइज्ड गृह कर्ज उपाय प्रदान करण्याचे दिशा गृह कर्जाचे




उद्दिष्ट आहे. कर्जाच्या संपूर्ण काळात एका उत्तम अनुभवासह - सर्वोत्तम दर्जाच्या आणि लवचिक प्रणालींचे पाठबळ मिळून कर्जाच्या अंमलबजावणीमध्ये गती आणि ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यास ते प्राधान्य देतात. या कर्जामुळे सगळ्या उत्पन्न गटातील लोकांची सोय होते. यात पगारदार (निवासी आणि अनिवासी भारतीय) आणि स्वयंरोजगार असलेल्या ग्राहकांचा समावेश आहे. ज्यांच्याकडे आपल्या व्यावसायिक उत्पन्नाची अधिकृत कागदपत्रे आहेत, आणि त्यांना आर्थिक मदतीची अपेक्षा आहे, अशा व्यक्तींच्या गरजा हे पूर्ण करते. तयार/ बांधकामाधीन / पुनर्विक्री मालमत्ता, प्लॉट + बांधकाम, घर नूतनीकरण / विस्तार आणि यासह बऱ्याच गोष्टींसाठी कर्ज मिळू शकते.

# चार श्रम संहितांना कामगार संघटनांचा विरोध का?

**केंद्रीय कामगार संघटना आणि स्वतंत्र क्षत्रिय संघटनांच्या संयुक्त मंचाने १८ मार्च २०२५ रोजी दिल्ली येथे आयोजित केलेल्या कामगारांच्या राष्ट्रीय संमेलनात केंद्र व राज्य सरकार यांच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी, देश विरोधी धोरणे व त्याला अनुषंगून केंद्र सरकारने हुकूमशाही पद्धतीने मंजूर केलेल्या चार श्रमसंहितांना तीव्र विरोध करण्याचे जाहीर केले आहे.**

**कामगार दिन विशेष**

**डॉ.डी.एल. कराड**
९८२२०१३६७०

केंद्र सरकार १ एप्रिल २०२५ पासून कामगार विरोधी व कार्पोरेट धार्जिणे ४ श्रमसंहिताची अंमलबजावणी करणार असल्याचे वारंवार जाहीर करत आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत या चार श्रमसंहितांच्या नियमांना मंजुरीही देण्यात आली आहे. त्यामुळे या चार श्रम संहिता कुठल्याही क्षणी राज्यात लागू होऊ शकतात व यामुळे कामगार संघटना व कामगारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. देशाच्या सव्वाशे वर्षाच्या कामगार चळवळीच्या संघर्षानंतर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीमुळे देशात २९ कामगार कायदे लागू करण्यात आले होते, या कायद्यामध्ये नंतरच्या काळात भरही पडली होती व कामगार वर्गाला काही प्रमाणात संरक्षण देण्याचा प्रयत्न झालेला होता. आज जो मध्यमवर्ग तयार झाला आहे त्यामागे या कामगार कायद्याचे भक्कम पाठबळ हे महत्त्वाचे कारण आहे, परंतु नव उदारवादी धोरणाच्या अंमलबजावणीनंतर विशेषतः २०१४ मध्ये भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर हे कामगार कायदे बदलण्याच्या प्रक्रियेला वेग आला. परंतु बहुमत नसल्यामुळे जुने कामगार कायदे रद्द करता आले नाहीत, फक्त २०१९ मध्ये वेतनविषयक कायदे रद्द करून वेतनविषयक श्रमसंहिता मंजूर करण्यात आली, नंतर २०२० मध्ये कोविडसाठीच्या काळामध्ये विरोधी पक्षाचा एकही प्रतिनिधी सभागृहात नसताना फक्त साडेतीन तासांच्या चर्चा नंतर उर्वरित जुने कामगार कायदे रद्द करण्यात आले व तीन श्रमसंहिता मंजूर करण्यात आल्या. त्यावेळीही कामगार संघटनांनी या सबंध बदलाला तीव्र विरोध केला होता!

शेकडो वर्षांच्या कामगार वर्गाच्या लढ्याच्या परिणामी संसदेमध्ये शेकडो तास चर्चा होऊन मंजूर झालेले २९ कामगार कायदे साडेतीन तासांच्या चर्चेनंतर तेही विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीमध्ये रद्द होणे आणि चार श्रम संहिता मंजूर होणे हे लोकशाही तत्त्वांना हरताळ फासणारे होते हे स्पष्टच आहे. या पार्श्वभूमीवर कामगार संघटना व कामगार वर्गाचा या चार श्रमसंहितांना असलेला विरोध लक्षात घ्यायला हवा.

**चार श्रम संहितांबाबतचे आक्षेप**

कामगारांचे कामाचे तास, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, संघटित होण्याचा अधिकार, युनियनला मान्यता मिळवून घेण्याचा अधिकार, सामूहिक वाटाघाटीच्या माध्यमातून मागण्या मान्य करून घेण्यासाठी संप व लढाई करण्याचा मूलभूत अधिकाऱ्यावर या श्रमसंहितांमुळे गदा येणार आहे. या श्रमसंहिता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून कॉर्पोरेट मालकांचे भले करण्यासाठी कामगारावर लादण्यात येणारी गुलामी आहे.

**चार श्रमसंहितांचे परिणाम**

पूर्वीच्या २९ कामगार कायद्यामधल्या हक्क व सुरक्षा बाबतच्या तरतुदी नवीन संहितांमध्ये अगदी सौम्य केले आहेत किंवा पूर्णपणे काढून टाकले आहेत. तसेच नवीन चार संहितांमध्ये अत्यंत कामगार विरोधी तरतुदीचा समावेश करण्यात आला आहे. औद्योगिक संबंध संहिता म्हणते की व्यक्ती जी पर्यायवेक्षक म्हणून नेमले आहे आणि जिचा पगार १८००० रुपये किंवा शासनाने अधिसूचित केलेल्या



मर्यादेपेक्षा जास्त असेल तिला ही संहिता लागू होणार नाही. फिक्स टर्म रोजगाराच्या करारामध्ये तो ठराविक कालावधी पूर्ण झाल्यानंतर मालक त्या कामगारांना परत कामावर घेऊही शकतात किंवा कोणतीही भरपाई न देता कामावरून कमी करू शकतात, त्यामुळे कायम नोकरीची संकल्पनाच मोडीत निघत आहे. ज्या आस्थापनेमध्ये ३०० पेक्षा कमी कामगार आहेत त्यांना कामावरून कमी करणे, लेऑफ देणे, कामगार कपात करणे, ताळेबंदी लागू करणे यासाठी पूर्वीप्रमाणे सरकारची पूर्वपरवानगी घेण्याची गरज नाही. परिणामी, ७० टक्क्यांपेक्षा अधिक औद्योगिक आस्थापना आणि ७४ टक्क्यांहून अधिक औद्योगिक कामगार हायर अँड फायरमध्ये ढकलले जाणार आहेत. ज्या आस्थापनामध्ये ३०० पेक्षा जास्त कामगार काम करतात अशा औद्योगिक आस्थापनांना स्थायी आदेशामधील तरतुदी लागू होतील. त्यामुळे ७४% औद्योगिक कामगार आता आपल्या सेवाशर्ती ठरवण्याच्या बाबतीत मालकाच्या लहरीवर व मर्जीवर अवलंबून राहतील.

एखाद्या औद्योगिक आस्थापनेतील किंवा उद्योगातील एकूण कामगारांपैकी किमान १० टक्के किंवा १०० कामगार यापैकी जी संख्या कमी असेल तितके कामगार सदस्य झाल्याशिवाय कामगार संघटनेची नोंदणी करता येणार नाही. कामगारांना त्यांच्या निवडीप्रमाणे युनियनचे नेतृत्व निवडण्याच्या लोकशाही अधिकारावर कठोर निर्बंध घातले आहेत. संघटित क्षेत्रामध्ये पदाधिकाऱ्यापैकी एक तृतीयांश किंवा पाच यापैकी जी संख्या कमी असेल तितकेच बाहेरच्या व्यक्ती पदाधिकारी म्हणून घेण्याची मर्यादा आहे. कामगारांनी विवाद नोंदवण्याची कालमर्यादा आता ३ वर्षांवरून २ वर्षांवर करण्यात आली आहे. सर्वच आस्थापनामध्ये संप करण्या अगोदर नोटीस देणे बंधनकारक केले आहे. समिटाची प्रक्रिया न्यायासन सुरू असताना किंवा तिचा निष्कर्ष आल्यावर ६० दिवसापर्यंत संप करण्यावर बंदी आणली आहे. त्याचबरोबर कथाकथित बेकायदेशीर संप करणाऱ्या कामगारांना किंवा त्यांना भडकवणाऱ्या किंवा पाठिंबा देणाऱ्यांना देखील प्रचंड मोठ्या दंडाची आणि कैदेची शिक्षा सुनावण्याची तरतूद करण्यात आली आहे. व्यावसायिक सुरक्षा आरोग्य व कामाची परिस्थिती या संहितेत कारखान्याची व्याख्या करताना वीज वापरत असल्यास २० कामगार आणि वापरत नसल्यास ४० कामगार असल्यास त्याला उत्पादनाचे युनिट मानले जाईल अशी व्याख्या केली आहे.


५० पेक्षा कमी कंत्राटी कामगारांना कामाला लावणाऱ्या कंत्राटदारांना आता कोणताही परवाना घेण्याची आवश्यकता नाही.

कायमस्वरूपी व बारामाही कामांमध्ये कंत्राटी कामावर प्रतिबंध घालण्याची संकल्पना संहितामधून काढून टाकण्यात आली आहे. कोअर ॲक्टिव्हिटी वगळता इतरत्र सर्वत्र कंत्राटी कामगार लावण्यास मुभा देण्यात आली आहे. संहितेमध्ये कंत्राटी कामगार केंद्रीय त्रिपक्षीय सल्लागार मंडळ जे कंत्राटी कामगारांच्या तक्रारी हाताळत होते. त्याला पूर्णपणे बरखास्त करून टाकले आहे. संहिता लागू होण्यासाठीची आस्थापनेतील स्थलांतरित कामगारांची किमान संख्या पाचवरून दहा केली आहे. पूर्वीच्या फॅक्टरी कायद्यात ज्याप्रमाणे जादा कामावर मर्यादा घालण्यात आली होती तसा कोणताही स्पष्ट उल्लेख या साहित्यात नाही. या साहित्यामध्ये तपासणी व निरीक्षक या दोहोची भूमिका पार मिळमिळीत करून टाकली आहे. निरीक्षकाच्या अंमलबजावणी अधिकारी म्हणून असलेल्या भूमिकेला सौम्य करून त्यांचे नामकरण निरीक्षक तथा सुकरता असे करण्यात आले आहे.कामगार किंवा त्यांच्या युनियनच्या तक्रारीच्या आधारावर कोणतीही तपासणी होणार नाही. संहितेचे कार्यक्षेत्र किंवा कार्यक्षेत्रात येणाऱ्या कोणत्याही प्रश्नावर दिवाणी न्यायालयात सुनावणी करण्यावर बंदी घातली आहे.

# गांवकरी आरोग्य

गुरुवार, दि. १ मे २०२५

**मानसिक आरोग्याबद्दलचा कलंक म्हणजे समाजात असलेली एक नकारात्मक मानसिकता. जेव्हा एखादी व्यक्ती मानसिक आजारामुळे त्रस्त असते, तेव्हा समाज तिला अनेक वेळा कमजोर म्हणून पाहतो.**



## मानसिक आरोग्य आणि समाजातील कलंक

### जागरूकता आणि बदलाची गरज

(भाग १)

कीर्ती रणशूर

**उपचार घेण्यात अडचण :**

मानसिक आजारावरील कलंकामुळे लोक उपचार घेण्यास संकोच करतात. मानसिक आजारांविषयी पारंपरिक समजुतीमुळे काही व्यक्ती मानसिक आरोग्य तज्ज्ञांकडे जाण्याऐवजी पारंपरिक उपचार करणाऱ्या लोकांकडे मदत मागतात.

एखाद्या व्यक्तीला झोप लागत नाही किंवा विचित्र विचार सतत डोक्यात येतात - हे सगळं डिप्रेशन किंवा ॲन्झायटीचे लक्षणं असू शकतात. कोणाची वाईट नजर लागली आहे. भूतबाधा झाली आहे, कुणाचा वाईट सावली आपल्यावर पडली आहे. पारंपरिक किंवा धार्मिक समजुतींमुळे, ती व्यक्ती डॉक्टरकडे जाण्याऐवजी बाबा-बुवा, झाडफुंक करणारे किंवा विशेष पूजा करणाऱ्यांकडे जाते.

**होणारे नुकसान**

तिला योग्य वैद्यकीय उपचार मिळत नाहीत. आजार वाढत जातो आणि मानसिक आरोग्याविषयीचा कलंक अजून गडद होतो, अनेक उच्चशिक्षित व्यक्तींना मानसिक आजारावर चर्चा करणे, तज्ज्ञांकडे जाणे किंवा उपचार घेणे यासाठी भिती वाटते. ज्यामुळे व्यक्ती मदतीसाठी पुढे येत नाहीत. शिक्षित असताना देखील अविचार आणि चुकीच्या समजुतीमुळे मानसिक आरोग्याच्या समस्यांवर योग्य उपचार घेण्यास लोक संकोच करतात. कित्येक उच्चशिक्षित व्यक्तींना मानसिक आरोग्याची औषधे घेण्याची भीती आणि साशंकता असते. ते यासंबंधीच्या काही चुकीच्या समजुतींमुळे मदत घेण्यास कचरतात.

**शिक्षित व्यक्तींसाठी मानसिक आरोग्यावरील कलंकाचे कारणे :**

चुकीच्या समजुती आणि अज्ञान : शिक्षित असले तरी अनेक लोकांना मानसिक आजारांबद्दल चुकल्या-चुकल्या समजुती असतात. उदाहरणार्थ, काही लोक मानतात की डिप्रेशन किंवा आत्महत्या करण्याचे विचार म्हणजे वैकल्य किंवा कमजोरी आहे. अशा समजुतीमुळे त्यांना मानसिक तज्ज्ञांकडे जाण्यास लाज वाटते.

**सामाजिक दबाव आणि प्रतिष्ठा :**

भारतात सामाजिक प्रतिष्ठा आणि घराण्याची इज्जत खूप महत्त्वाची असते. उच्चशिक्षित व्यक्तींसाठी मनाच्या आरोग्याची समस्या हे एक समाजासमोर अपमानकारक मानले जाते. त्यांना असं वाटतं की, जर ते मानसिक तज्ज्ञांकडे गेले, तर समाज त्यांना विकारग्रस्त किंवा वेगळं म्हणून पाहील.

(क्रमशः)

## आयुर्वेद सर्वांसाठी..

(भाग २)



**माघपासून पौषपर्यंत दोन दोन महिन्यांचे सहा ऋतू आहेत. शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद व हेमंत. सूर्याच्या स्थितीनुसार वर्षाचे दोन भाग केले जातात. शिशिरादी तीन ऋतूंनी उत्तरायण होते व त्याला आदान काळ म्हणतात. ग्रीष्म हा आदान काळाचा शेवटचा ऋतू आहे.**




ग्रीष्म ऋतुचर्या अवलंबणे आरोग्यासाठी हितकर आहे. उन्हात फिरणे, कडक चहा कॉफी घेणे, तिखट चमचमीत मसालेदार, खारट, आंबट पदार्थ, तेलकट पदार्थ खाणे, अधिक प्रमाणात जेवणे, कोरडे पदार्थ, मिल्कशेक आणि दही टाळावेत.

या ऋतूमध्ये भूक असेल तेव्हा आणि तेवढ्याच प्रमाणात जेवण करावे. फळभाज्या अधिक असाव्यात. गोड, पचनाला हलके, स्निग्ध, शीत व पातळ अशा आहारांचे सेवन करावे. अल्कोहोल घेणे टाळावे कारण याच्या सेवनाने जळजळ, शरीरात कोरडेपणा आणि अशक्तपणा येऊ शकतो.

फ्रीजचा अतिरिक्त वापर टाळावा. माठातले नैसर्गिक प्रक्रियेने थंड झालेले पाणी पिणे अधिक योग्य. त्यात धने, जिरे घातल्यास उन्हाळ्यात होणारा लघवीचा त्रास कमी होते. नारळ पाणी, विविध फळांचा रस, कैरीचे पन्हे, सोलकढी, गूळपाणी यांचा वापर करावा. वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते, त्यासाठी रसदार फळ कलिंगड, डाळिंब यांचे सेवन करावे. हे फळ ताजी खावी. मिक्स्ड फ्रूट प्लेट, फ्रूट कस्टर्ड यांचा वापर टाळावा. गुलकंद, मोरावळा, मोरांबा, आवळा कँडी, लिंबाचे गोड लोणचे, सरबत यांचा आहारात उपयोग करावा.

उन्हाळ्यात रात्री लहान असल्याने इतर ऋतूत दुपारी झोपणे आयुर्वेदात वर्ज्य आहे पण उन्हाळ्यात दिवसा थंड ठिकाणी थोडा वेळ झोपने फायदेशीर ठरते.

डॉ. किरण कातकाडे
एमडी आयुर्वेद (मुंबई)
८६६८९९७४९२



अंघोळीसाठी थंड पाण्याचा वापर करावा. विविध प्रकारच्या सुगंधी द्रव्यांचा जसे चंदन, वाळा यांचा शरीरावर लेप करावा किंवा अत्तरे वापरावीत. या ऋतूत जास्त श्रम आणि कठोर व्यायाम टाळावा. निसर्गात थंडावा देणारे परफ्यूम वापरा.

आयुर्वेदात सांगितलेली पंचकर्म चिकित्सा ही उन्हाळ्यात निषिद्ध आहेत, परंतु लेप चिकित्सा, अभ्यंग, शिरोधारा, पादाभ्यंग या क्रिया जरूर कराव्यात.

## मधुमेह म्हणजे काय? तो कसा होतो?




मधुमेह एक अशी समस्या आहे, ज्यात रक्तामध्ये साखरेचा स्तर नियंत्रित राहत नाही. आता तुमच्या मनात हा प्रश्न आला असेल की अचानक कशी साखर नियंत्रित होणे बंद होते? आपल्या शरीरात स्वादुपिंड नावाची एक ग्रंथी असते. यातून इन्सुलिन नावाचं हार्मोन तयार होत असतं. हेच इन्सुलिन आपली शरीरातील रक्तात तयार होणाऱ्या ग्लुकोज वा साखरेची मात्रा नियंत्रित ठेवण्याचं काम करतं. पण शारीरिक बदलासह पेंक्रीयाझ इन्सुलिन तयार करू शकत नाही आणि साखरेचा स्तर वाढत जातो. शेवटी तो मनुष्य मधुमेहाला बळी पडतो.

**मधुमेह कसा त्रास देतो?**

रक्तात ग्लुकोजची मात्रा वाढल्याने रक्तात उपस्थित घटकांचं संतुलन बिघडतं. जसं की रक्तात पांढऱ्या रक्त पेशी आणि लाल रक्तपेशी असतात. यांच्यासोबतच प्लाझ्मासुद्धा असतो. ऑक्सिजन सुद्धा रक्त प्रवाहासोबत शरीरात प्रवाहित होत असतं. पण जेव्हा रक्तात ग्लुकोजचा स्तर वाढत जातो तेव्हा लाल रक्तपेशी ज्या जखमेला लवकर भरण्याचं काम करतात. त्या ग्लुकोजची मात्रा वाढल्याने आपलं काम नीट पार पडू शकत नाहीत. पांढऱ्या पेशी ज्या आपल्या शरीराला रोगप्रतिकार शक्ती प्रदान करतात त्यांचा प्रभाव सुद्धा अतिग्लुकोजमुळे कमी होतो. यामुळे मधुमेहासोबत इतरही आजार आणि व्याधी शरीराभोवती विळखा घालू लागतात.

**मधुमेहाची प्राथमिक लक्षणं**


- खूप भूक लागणे आणि थकवा जाणवणे
- वजन झपाट्याने कमी होणे
- खूप तहान व भूक लागणे
- वारंवार लघवीला होणे
- अतिशय थकवा जाणवणे
- सतत इन्फेक्शन होणे
- जखम लवकर बरी न होणे
- दृष्टीदोष, धुरकट दिसणे
- मधुमेह प्रकार
- इन्सुलिनवर अवलंबून नसणारे
- इन्सुलिनवर अवलंबून राहणारे

## फॅटी लिव्हर

### एक वाढती समस्या

डॉ. शरद देशमुख
एमडी मेडिसिन डीएनबी
गॅस्ट्रोएंटेरो-लॉजिस्ट व लिव्हर स्पेशलिस्ट

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत फॅटी लिव्हर म्हणजेच यकृतामध्ये चरबीचे प्रमाण वाढणे ही एक सामान्य, पण दुर्लक्षित होणारी समस्या ठरत आहे. ही स्थिती सुरुवातीस सौम्य असते, परंतु वेळेवर उपचार न झाल्यास गंभीर यकृत विकारांचे कारण ठरू शकते. यकृतामध्ये जेव्हा ५ ते १० टक्क्यांपेक्षा अधिक चरबी जमा होते, तेव्हा त्याला फॅटी लिव्हर असे म्हणतात. ही अवस्था दोन प्रकारांची असते अल्कोहोलीक फॅटी लिव्हर डिसीज जी अतिमद्यपानामुळे होते आणि नॉन अल्कोहोलीक फॅटी लिव्हर डिसीज जी मद्यपान न करताही होते. फॅटी लिव्हर होण्याची अनेक कारणं आहेत. अनियमित आणि तेलकट आहार, वजनवाढ, मधुमेह, कोलेस्ट्रॉल व ट्रायग्लिसराइड्सचे वाढलेले प्रमाण, शारीरिक हालचालींचा अभाव, दिवसातून एकदाच खाणे किंवा उपाशी राहणे यामुळे फॅटी लिव्हर होतो. अल्कोहोलीक फॅटी लिव्हर डिसीजमध्ये मद्यपान मुख्य कारण ठरते.



भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये नॉन अल्कोहोलीक फॅटी लिव्हर डिसीज ही एक उदयोन्मुख आरोग्य समस्या आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार, जवळपास २५ ते ३० टक्के प्रौढ भारतीयांमध्ये फॅटी लिव्हर आढळतो. स्थूल लोकांमध्ये हे प्रमाण ६० टक्क्यांहून अधिक आहे, तर मधुमेही रुग्णांमध्ये हे प्रमाण ७० ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचते. विशेषतः लहान वयात ही स्थिती वाढत असल्याचे निरीक्षण आहे.

फॅटी लिव्हर टाळण्यासाठी नियमित व्यायाम अत्यंत गरजेचा आहे. रोज किमान ३० मिनिटे ब्रिस्क वॉक, योग किंवा व्यायाम करावा. आहारात कमी तेल, कमी साखर आणि कमी मीठ यांचा समावेश असावा. वजन नियंत्रणात ठेवणे, मधुमेह व कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवणे, धूम्रपान आणि मद्यपान टाळणे तसेच पुरेशी झोप घेणे आणि तणाव कमी ठेवणे हे प्रतिबंधात्मक उपाय महत्वाचे ठरतात.

सुरुवातीच्या टप्प्यावर फॅटी लिव्हर हा आजार केवळ जीवनशैली बदलून पूर्णपणे सुधारू शकतो. आहार आणि व्यायामावर भर देणे ही उपचारांची पहिली पायरी आहे. काही वेळेस जर यकृतामध्ये दाह झाल्यास औषधोपचारांची गरज भासू शकते. यकृत कार्य चाचण्या व सोनोग्राफीच्या मदतीने रुग्णाचे नियोजनबद्ध निरीक्षण गरजेचे आहे. गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टच्या मार्गदर्शनाखाली यासाठी योग्य उपचार घेतले पाहिजेत.

फॅटी लिव्हर दीर्घकालीन स्वरूप धारण करू शकतो. यामध्ये यकृतदाह, फायब्रोसिस, सिरोसिस आणि शेवटी लिव्हर कॅन्सरपर्यंत स्थिती जाऊ शकते. काही रुग्णांना यकृत प्रत्यारोपणाचीही गरज भासू फॅटी लिव्हर वेळीच ओळखून, योग्य जीवनशैली आणि उपचार पद्धतींचा अवलंब केला तर ती सहजपणे नियंत्रणात ठेवता येते. आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा स्वीकार करा आणि आपल्या यकृताचे संरक्षण करा - हीच काळाची गरज आहे.

## चक्कर येणे


**साध्या कारणामुळे चक्कर आली असली तर त्यावर घरगुती उपचार करता येतील**

- पित्त वाढल्यामुळे चक्कर येत असली तर ताज्या आवळ्याचा रस चार चमचे त्यात चमचाभर खडीसाखर मिसळून घेतल्यास बरे वाटते.
- रक्तदाब कमी झाल्याने चक्कर येत असली तर आल्याचा चमचाभर रस व चमचाभर मध हे मिश्रण थोडे थोडे चाटून खाण्याचा उपयोग होतो.
- मानसिक क्षोभामुळे, अस्वस्थतेमुळे चक्कर येत असली तर कोहळ्याचा रस चार चमचे व चमचाभर खडीसाखर असे मिश्रण घेता येते.
- ऊन लागल्यामुळे चक्कर येत असली तर नाकात दुर्वांच्या रसाचे २-३ थेंब टाकण्याचे तसेच टाळूवर आवळकाठीच्या चूर्णात पाणी मिसळून तयार केलेला लेप लावून ठेवण्याने बरे वाटते.
- फार अशक्तपणा जाणवत असला व चक्कर येत असली, बरोबरीने तोंडाला चव नसली तर मनुका खाण्याचा उपयोग होतो. मनुका थोडेसे सैंधव लावून थोड्याशा तुपावर परतून घेतल्या व काही दिवस रोज खाल्ल्या तर गुण येतो.



- कोणत्याही कारणाने शुक्रक्षय झाला असला (हस्तमैथुन, अतिमैथुन, स्वप्नदोष वगैरेमुळे) व त्यामुळे अशक्तपणा येऊन चक्कर येत असली तर रोज अर्ध्या नारळाचे ओले खोबरे वाटून त्यातून निघालेले दूध चवीनुसार साखर टाकून पिण्याचा उपयोग होतो.
- ताप चढल्यामुळे चक्कर येत असली तर कपाळावर रिठ्याच्या पाण्याच्या घड्या ठेवण्याने बरे वाटते. यामुळे ताप उतरण्यासही मदत मिळते. बरोबरीने तापावर योग्य उपचार करणे आवश्यक होय.
- डोक्यात सर्दी साठून म्हणजे डोके जड होऊन चक्कर येत असली तर सुंठीचे बारीक चूर्ण तपकिरीप्रमाणे नाकाद्वारा ओढल्याने बरे वाटते.
- रक्तातील साखर कमी झाल्याने चक्कर आली असता पटकन साखर-पाणी देण्याचा उपयोग होतो.
- भूक लागली असूनही बराच वेळ काही खाणे झाले नाही तरी चक्कर येऊ शकते. असा वेळी साळीच्या लाह्या, दूध, साखर असे मिश्रण खाण्याने लगेच बरे वाटते.
- गाडी लागल्यामुळे चक्कर येण्याची सवय असणाऱ्यांना प्रवासाच्या आधी व प्रवासात थोड्या थोड्या वेळाने साळीच्या लाह्या खाण्याचा उपयोग होताना दिसतो.
- विरळ हवेच्या उंच ठिकाणी जाताना सुती कापडात कापूर, वेलची, ओवा, वेखंड यांच्या पुरचुंडीचा अधूनमधून वास घेण्याने चक्कर येण्यास प्रतिबंध होऊ शकतो.

## गोमुखासन



**योगासनाचा एक प्रकार. गोमुख याचा अर्थ गाईचे तोंड. या आसनात साधकाच्या पायांची रचना गाईच्या मुखासारखी, तर पाऊले तिच्या कानांसारखी भासतात म्हणून या आसनास गोमुखासन म्हणतात. . हे आसन संवर्धनात्मक आसनांमध्ये मोडते.**

**गोमुखासन**

**कृती :**


प्रथम जमिनीवरील मऊ आसनावर दोन्ही पाय सरळ व समोर ठेवून दंडासनात बसावे. उजवा पाय डाव्या मांडीखालून घेऊन टाच डाव्या नितंबास लावून ठेवावी. डावा पाय उजव्या गुडघ्यावरून उजवीकडे नेऊन डावी टाच उजव्या नितंबास खेटून ठेवावी. हात दोन्ही गुडघ्यांवर ठेवून गुडघे एकमेकांवर येतील असे ठेवावेत अथवा प्रचलित पद्धतीनुसार डावा हात वर करून पाठीमागे न्यावा. उजवा हात उजव्या बाजूने वळवून पाठीमागे न्यावा. दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंफावीत. डावे कोपर मस्तकाच्या मागे ठेवावे. ताठ बसूनसमोर बघावे व डोळे बंद करावेत. श्वास कोंडून ठेवू नये. स्थिर व शांत बसावे. श्वासाकडे साक्षीवृत्तीने पाहावे. हे आसन अर्धा ते एक मिनिट करावे.

लाभ : या आसनाचे पाठीच्या कण्याचा वरचा भाग, फुफ्फुसे, कटिप्रदेश व गुडघे यांवर चांगले परिणाम होतात. या आसनामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते. मानेच्या मणक्यांचा त्रास व पाठदुखी असल्यास हे आसन उपयोगी ठरते. कुबड असल्यास किंवा येऊ नये म्हणून हे आसन व भुजंगासन लाभकारक ठरते.

योगाचार्य
डॉ. काजल पटणी

या आसनामुळे छातीच्या वरचा भाग, मान, खांदे यांच्या स्नायूंना चांगला ताण मिळतो. आळस दूर होतो. मनोदौर्बल्य व मरगळ दूर होते. मनाची शांती व एकाग्रता वाढते.

विधिनिषेध : या आसनात एक हात पूर्णतः पिरगळला जातो. खांद्यांची लवचिकता किती आहे याचा अंदाज करूनच हे आसन करावे. ओढाताण वा जबरदस्ती केल्यास खांद्याला दुखापत होण्याचा संभव असतो. अंतिम स्थितीत पाठीचा कणा ताठ ठेवावा. तरच या आसनाचे लाभ प्राप्त होतील. या आसनात श्वसनाची क्रिया उदराऐवजी छातीपर्यंतच होते. साधकाने हे आसन सहजतेने व सुखद होईल याची काळजी घ्यावी.



## मोबाइल टॉयलेटमध्ये घेऊन जाता?

### वेळीच व्हा सावध!

**आजकालच्या डिजिटल लाइफस्टाइलमध्ये टॉयलेट हे केवळ शरीराच्या स्वच्छतेचं ठिकाण न राहाता, स्क्रॉलिंग झोन देखील बनलं आहे. अनेक लोकांना टॉयलेटमध्ये आपला मोबाइल घेऊन जाण्याची सवय असते, त्यामुळे होतं काय लोक टॉयलेटवर २०-२५ मिनिटांपर्यंत देखील बसून राहातात.**



ही सवय तुमच्यासाठी अत्यंत हानिकारक असून, या सवयीमुळे तुमचं इतकं नुकसान होऊ शकतं, ज्याचा तुम्ही कधी अंदाजदेखील लावू शकणार नाहीत. याबाबत आता आरोग्य तज्ज्ञांकडून देखील धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. आरोग्य तज्ज्ञांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार तुम्हाला जर टॉयलेटमध्ये मोबाइल घेऊन जाण्याची सवय असेल तर तुम्हाला पाइल्स, बद्धकोष्ठता आणि किडनीशी संबंधित आजार उद्‌भवू शकतात.

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार जेव्हा तुम्ही तुमचा मोबाइल घेऊन टॉयलेट सीटवर दीर्घकाळ बसून राहातात. तेव्हा तुमच्या गुदद्वाराच्या नसांवर दबाव पडतो. अशा स्थितीमध्ये आपण तिकडे दुर्लक्ष केलं आणि तसाच मोबाइल घेऊन बसलो तर हा दबाव आणखी वाढतो.

यातून तुम्हाला बद्धकोष्ठतेसारखा आजार होऊ शकतो. काही लोक तर टॉयलेट सीटवर एवढावेळ बसून राहतात की, त्यांना ती आरामदायक जागा वाटते. मात्र यामुळे तुमच्या पोटाच्या नैसर्गिक हालचाली प्रभावित होतात. त्यामुळे जर तुम्हालाही अशीच सवय असेल तर वेळीच सावध व्हा असं डॉक्टर सांगतात.

डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार काही लोकांना वीस ते पंचवीस मिनिटं टॉयलेट सीटवर बसण्याची सवय असते. मात्र त्यामुळे विविध आजारांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे टॉयलेटमध्ये पाच ते दहा मिनिटांपेक्षा जास्त बसू नका असा सल्ला डॉक्टर देतात.

जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास असेल तर तुम्ही तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आहारामध्ये बदल करा, पाईल्सचा त्रास असेल तर जास्त मसालेयुक्त पदार्थांचा समावेश आहारामध्ये करू नका, तुमच्या शरीराच्या गरजेनुसार पाणी पिण्यासदेखील सांगण्यात आलं आहे. टॉयलेटमध्ये मोबाइल नेण्याची सवय ही अत्यंत घातक असल्याचं डॉक्टरांनी म्हटलं आहे. त्यामुळे अशा सवयी टाळल्या पाहिजेत, ज्यामुळे तुमचं आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल.